




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, बुधवार २ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०






## शिवसेना कोणाची? आज सुनावणी

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्य मंत्रिमंडळ बैठक आणि मंत्रालयातील पूर्वनियोजित बैठका सोडून सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी दिल्लीत दाखल झाले. सर्वोच्च न्यायालयात बुधवार दि. २ सप्टेंबर रोजी शिवसेना फुटीच्या संदर्भात सुनावणी



होणार आहे. या पार्श्वभूमी शिंदे दिल्लीत आले असून ते केंद्रीय गृह मंत्री आणि भाजपचे नेते अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे समजते. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कार्यलयाकडून आजच्या त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाची माहिती देण्यात आली होती. त्यानुसार शिंदे हे आज मंत्रिमंडळ बैठकीत सहभागी होणार होते. याशिवाय शिंदे हे मुंबई महानगर क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचा बृहत आराखडा आणि बस परिवहन सेवेचा कायापालट करणे तसेच ठाणे विकास आराखडा सादरीकरणाच्या संदर्भात आयोजित बैठकीला उपस्थित राहणार होते. मात्र, या बैठकांकडे पाठ करून शिंदे आज तातडीने दिल्लीला रवाना झाले. दरम्यान, दिल्लीत पक्षाच्या राज्य प्रमुखांची बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीच्या निमित्ताने पदाधिका-यांची भेट होणार आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेल्या सुनावणीत ज्येष्ठ वकील बाजू मांडणार आहेत. त्यामुळे यावेळी वकिलांशी चर्चा होणार असल्याचे शिंदे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

## आजपासून अर्ध्या तिकिटाच्या सवलतीसाठी 'एनसीएमसी'कार्ड अनिवार्य

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने प्रवास करणा-या महिला प्रवासी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आज म्हणजेच १ सप्टेंबर पासून पासून एसटीने प्रवास करण्यासाठी एनसीएमसीकार्ड अनिवार्य करण्यात आले



आहे. जर तुमच्याकडे हे कार्ड नसेल तर तुम्हाला अर्ध तिकीट मिळणार नाही.एसटी महामंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार, या कार्डसाठी आतापर्यंत सुमारे १.११ कोटी प्रवाशांची एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी करण्यात आली आहे. सध्या या प्रक्रियेत महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य देण्यात आले असून, सरकारी सवलतीसाठी पात्र असलेल्या इतर प्रवर्गांचाही पुढील टप्प्यात एनसीएमसी प्रणालीमध्ये समावेश केला जाणार आहे. नव्या नियमानुसार, महिला प्रवाशांसह ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसमधून प्रवास करताना अर्ध तिकीट भरण्यासाठी एनसीएमसीकार्डचा वापर करावा लागणार आहे. जर हे कार्ड प्रवाशांकडे नसल्यास तिकीटाची संपूर्ण रक्कम आकारली जाउ शकते. त्यामुळे प्रवास करण्यापूर्वी कार्डमध्ये आवश्यक रक्कम उपलब्ध किंवा कार्ड टॉप-अप केलेले आहे, याची खात्री करण्याचे आवाहन महामंडळाने केले आहे. या नव्या व्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी सर्व एसटी आगारांना Standard Operating Procedure (SOP)देखील पाठवण्यात आली आहे.

**७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दिलासा-** दरम्यान, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना तूर्तास दिलासा देण्यात आला आहे. या प्रवर्गासाठी एनसीएमसीकार्डची सक्तीची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली आहे. नोंदणी प्रक्रियेदरम्यान काही ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः बायोमेट्रिकच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा बोटांचे ठसे व्यवस्थित नोंदवले जात नसल्याने ही समस्या निर्माण होत असल्याचे अधिका-यांनी सांगितले. एसटी महामंडळाकडून सवलतीच्या तिकीट व्यवस्थेचे डिजिटायझेशन आणि पात्र प्रवाशांची पडताळणी अधिक सुलभ करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या प्रवाशांनी अद्याप एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केलेली नाही, त्यांनी जवळच्या एसटी आगाराशी लवकरात लवकर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सामूहिक बलात्काराच्या गुन्हावरही पडदा टाकतील

**नोएडा :** येथे एका धावत्या बसमध्ये अल्पवयीन मुलीवर झालेल्या कथित सामूहिक बलात्काराच्या घटनेवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारवर जोरदार टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडील गृहखात्यावर कोणतीही जबाबदारी निश्चित



होण्याची शक्यता नाही, कारण या गुन्ह्यावरही नेहमीप्रमाणे पडदा टाकला जाईल, असे राहुल गांधी म्हणाले.दिल्ली-एनसीआर महिलांसाठी इतके असुरक्षित झाले आहे की ग्रेटर नोएडा ते दिल्ली अशा ४७ किलोमीटरच्या प्रवासादरम्यान स्लीपर बसमध्ये एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. संपूर्ण दिल्ली पोलिसांना किंवा नोएडा पोलिसांना या घटनेची पुसटशीही कल्पना नव्हती, ही अत्यंत आश्चर्यकारक बाब आहे, असे गांधी यांनी एक्स वर केलेल्या एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे. ही बस नोएडा-ग्रेटर नोएडा एक्सप्रेसवे, दिल्लीचा रिंग रोड, सीमा झ हे सर्व पार करत गेली, पण एकाही चेकप?ईंटवर तिला एकदाही अडवले गेले नाही. बसच्या सीटवर पडदे ओढलेले होते जेणेकरून आत काय चालले आहे ते कोणालाही दिसू नये आणि गुन्हेगारांना तर प्रशासनाची जराही भीती नव्हती असे ते म्हणाले.निर्भया प्रकरणाला एवढी वर्षे उलटून गेल्यानंतरही आणि अशा अनेक घटना घडल्यानंतरही, अशा प्रकारच्या बसेसची तपासणी आणि देखरेख करण्याच्या नियमांचे पालन अद्याप का केले जात नाही, असा सवाल राहुल गांधी यांनी विचारला. ते पडदे फक्त त्या एका बसवरच ओढलेले नव्हते झ तर प्रशासनाच्या अपयशावर वर्षानुवर्षे सरकारकडून टाकल्या जाणा-या पडद्यांचाच हा परिणाम आहे. ज्यामुळे देशाच्या राजधानीतही महिलांना सुरक्षितपणे प्रवास करणे शक्य राहिलेले नाही अशा कडक शब्दात राहुल गांधी यांनी गृहखात्याच्या कारभारावर ताशेरे ओढले. केंद्र आणि राज्य सरकारे ही व्यवस्था सुधारण्यापूर्वी आणखी किती महिला आणि मुलींना या अत्याचाराला सामोरे जावे लागेल, असा गंभीर प्रश्नही त्यांनी विचारला. अमित शहा यांच्या अखत्यारीतील दिल्ली पोलिस किंवा आदित्यनाथ यांच्या अखत्यारीतील उत्तर प्रदेश पोलिसांची काही जबाबदारी निश्चित होईल का? अजिबात नाही. या गुन्ह्यावरही नेहमीप्रमाणे फक्त पडदा टाकला जाईल असे ते म्हणाले.

## उपोषणादरम्यान पाटलाची तब्येत बिघडली!

**वडीगोद्री/जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज चौथा दिवस



असून, आज दुपारी दीडच्या सुमारास त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. जरांगे पाटील यांना उलटी आणि मळमळ होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आंदोलनस्थळी उपस्थित असलेल्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. उपोषणाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. त्यांना मळमळ आणि उलटीचा त्रास झाल्याने आरोग्य पथकातील डाक्टरांनी त्यांची तपासणी करण्याचा प्रयत्न केला.आंदोलनस्थळी तैनात असलेल्या आरोग्य पथकातील डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती तपासण्यासाठी दोन-तीन वेळा प्रयत्न केला. मात्र, जरांगे पाटील यांनी वैद्यकीय तपासणी करून घेण्यास नकार दिल्याची माहिती आहे. त्यामुळे डॉक्टरांना त्यांच्या प्रकृतीबाबत आवश्यक वैद्यकीय निरीक्षण नोंदवता आले नाही. उपोषणामुळे शरीरावर होणारे परिणाम लक्षात घेता डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. मात्र, जरांगे पाटील यांनी तपासणीस नकार दिल्याने आरोग्य पथकासमोरही अडचण निर्माण झाली आहे.



## जेवणात पाल

## आश्रमशाळेतील 29 विद्यार्थ्यांना विषबाधा

**चंद्रपूर /प्रतिनिधी :** जिवती तालुक्यातील नगराळा येथील श्री. अंबरू नाईक माध्यमिक आश्रमशाळेत २९ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विद्यार्थ्यांना दिलेल्या दुपारच्या जेवणात पाल पडल्याचा आणि तेच अन्न शिजवून विद्यार्थ्यांना वाढण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. जेवणानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि चक्कर येण्याचा त्रास सुरू झाल्याने एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, आश्रम शाळेत नेहमीप्रमाणे दुपारच्या जेवणाची तयारी करण्यात आली. मात्र, अन्न तयार करताना त्यात पाल पडल्याचे सांगण्यात येत आहे. या गंभीर प्रकाराची योग्य ती दखल न घेता तेच अन्न विद्यार्थ्यांना देण्यात आले. भोजन केल्यानंतर काही वेळातच अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडू लागली.

रुग्णालयात दाखल विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि चक्कर येण्यास सुरुवात झाल्यानंतर शाळा प्रशासनाने तातडीने हालचाली करून बाधित विद्यार्थ्यांना उपचारासाठी राजुरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार सुरू करण्यात आले असून, २९ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. सध्या त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे वैद्यकीय अधिका-यांकडून सांगण्यात आले.

**चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ, पालकांचा आरोप-**या घटनेनंतर पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या भोजनाच्या गुणवत्तेची (पान २ वर)



## सोने खरेदी थांबवा, परदेशवारी टाळा

**मॉस्को/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हीडीओ शेअर करत देशाचा आर्थिक विकास दर ७.८ टक्क्यांवर गेल्याचा दावा केला आहे. एकीकडे हा दावा करत असताना दुसरीकडे पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना काही सल्लेही दिले आहेत. त्यामुळे आर्थिक विकास दराच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.




भारताने नोंदवलेल्या ७.८ टक्के आर्थिक विकासदराबद्दल देशवासीयांचे अभिनंदन. भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी स्वदेशीचा मंत्र स्वीकारणे आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. नागरिकांनी अनावश्यक खरेदी टाळावी आणि गरज नसेल तर सोने खरेदी करू नका असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. आत्मनिर्भर भारत बनणे अत्यंत आवश्यक आहे. स्वदेशीचा मंत्र आणि लोकल फार व्होकलचा विचार स्वीकारला पाहिजे. परदेशात केवळ फिरण्यासाठी जाणे टाळावे. तसेच लग्नसमारंभासाठीही परदेशाऐवजी भारतालाच प्राधान्य द्यावे. मेड इन इंडियाचा मंत्र प्रत्यक्ष जीवनात अंगीकारण्याची गरज असल्याचे मोदींनी सांगितले. भारताच्या आर्थिक प्रगतीला आणखी वेग देण्यासाठी आत्मनिर्भरता महत्त्वाची आहे. नागरिकांनी स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देउन देशात तयार होणा-या वस्तूंना प्राधान्य द्यावे. गरज नसलेल्या वस्तूंची खरेदी टाळून देशाची अर्थव्यवस्था मजबूत करणा-या सवयी अंगीकारण्याची गरज असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. परदेशात लग्न करण्याऐवजी भारतातच लग्नसमारंभ आयोजित करण्याला प्रोत्साहन द्यावे. देशात मोठ्या प्रमाणावर होणा-या लग्नसमारंभांमुळे पर्यटन, हॉटेल, केटरिंग, कापड, दागिने यांसह विविध व्यवसायांना फायदा होउ शकतो. अशा आयोजनांमुळे देशातील वेगवेगळ्या भागांतील व्यावसायिक, कारागीर आणि कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे नागरिकांनी शक्य तितका खर्च देशातच करण्याची सवय लावून घ्यावी, असा सल्ला पंतप्रधान मोदींनी दिला आहे.

### मंत्रिमंडळाचे 4 मोठे निर्णय

## सरकारी बैठकांमध्ये अधिकारी-कर्मचा-यांना मिळणार पौष्टिक आहार

**मुंबई/प्रतिनिधी :**शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम व उपाहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीत शासकीय अधिकारी व कर्मचा-यांना बैठका, कार्यक्रम आणि प्रशिक्षणाच्या वेळी संतुलित व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषक आहाराची सवय ही शासकीय कर्मचा-यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, या उद्देशाने सर्व विभागांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत. बैठका, कार्यक्रम, प्रशिक्षण संस्था, परिषदा तसेच उपाहारगृहांमध्ये अल्पोपहार अथवा भोजन देताना आरोग्यदायी पर्यायांचा समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये हंगामी फळे, केळी, सफरचंद, पेरू, पपई यांसारखी फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली-सांबार, मागणीनुसार गरम दूध, साखरविरहित ग्रीन टी, नाचणीची भाकरी, ज्वारी-बाजरीची भाकरी, ताक, कोशिंबीर, विविध भाज्या, डाळी व उसळी यांसारख्या पौष्टिक पदार्थांना प्राधान्य देण्यात येणार आहे.



**हंगामी फळे, केळी, सफरचंद, पेरू, पपई, उकडलेली अंडी मिळणार**

अल्पोपहारामध्ये तेलकट व अति-प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्याबरोबरच पौष्टिक घटक असलेल्या स्थानिक व पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. जेवणामध्ये डाळ, उसळ, पालेभाज्या, ताक, कोशिंबीर, भाजी आणि आवश्यकतेनुसार संतुलित धान्यांचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली आहे. संबंधित कार्यालयांच्या नवीन खानपान (केटरिंग) करारामध्ये आरोग्यदायी मेनूचा समावेश करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयाची योग्य अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित शासकीय तसेच निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचा-यांशी आरोग्यविषयक भूमिकेबाबत चर्चा करावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. शासकीय व निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचा-यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहाराबाबत आवश्यक जनजागृती करावी तसेच संतुलित आहाराचे मेनू उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात. आरोग्यदायी मेनू निश्चित करताना ICMR-NIN यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करता येणार आहे. मंत्रालयातील उपाहारगृहात सध्या फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली-सांबार, गरम दूध आणि ग्रीन टी यांसारखे आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध करून देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पोपहारातील तेलकट खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली असून, डाळ, उसळ, पालेभाजी, ताक, कोशिंबीर, पुलाव यांसारख्या पौष्टिक पदार्थांचाही जेवणात समावेश करण्यात येत आहे.

**मंत्रिमंडळाने घेतलेले इतर ३ निर्णय**

पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.

सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील जुना पुणे नाका ते बोरामणी नाक्यापर्यंतच्या चार पदरी उन्नत मार्गिकेस आवश्यक निकडीचा सार्वजनिक प्रकल्प (पान २ वर)

## सुभाष चंद्रांच्या कर्जप्रकरणी सेटलमेंटला स्थगिती

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) मंगळवारी झी समूहाचे अध्यक्ष सुभाष चंद्रा यांच्या दिवाळखोरीच्या प्रकरणातील २५ ऑगस्टच्या आदेशाला स्थगिती दिली. इतकेच नव्हे तर, न्यायाधिकरणाने निर्देश दिले की, जामीनदार म्हणून त्यांनी आपली मालमत्ता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे इतर कोणालाही हस्तांतरित किंवा विकू नये. प्रकरणाची सुनावणी करणा-या तीन सदस्यांच्या आदेशांमध्ये मतभेद झाल्यामुळे, हे प्रकरण आता एनसीएलटीच्याच सदस्यीय विशेष खंडपीठासमोर ठेवण्यात आलेले आहे.



झी समूहाचे संस्थापक सुभाष चंद्रा यांच्या २२ हजार कोटींच्या कर्जाची अवघ्या साडेसहा कोटींमध्ये सेटलमेंट करण्याच्या राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाच्या निर्णयास कर्जदार बँकांनी तीव्र विरोध केला होता. यामध्ये एलआयसी हौसिंग फायनान्स, एचडीएफसी, युनियन बँक ऑफ इंडिया, ॲक्सिस बँक, कॅनरा बँक, आरबीएल बँकेने लवादाच्या निर्णयाला कंपनी कायदा अपीलीय न्यायाधीकरणाकडे आव्हान दिले होते. त्यानंतर एनसीएलएटीने त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची तयारी दर्शवली होती. मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी सुरू केलेल्या विशेष खंडपीठाने नमूद केले की, पूर्वीच्या आदेशांमध्ये विसंगती होती आणि अंमलबजावणी करता येईल असे कोणतेही स्पष्ट बहुमताचे मत नव्हते. न्यायाधिकरणाने या प्रकरणातील सर्व संबंधित पक्षांना नोटीस बजावली आहे. २२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या दाव्यांनंतरही, चंद्रा यांना सुमारे ६.२५ कोटी रुपये भरून त्यांची दिवाळखोरीची प्रक्रिया मिटवण्याचा मार्ग मोकळा करणा-या एनसीएलटीच्या आदेशानंतर काही दिवसांतच ही घडामोड समोर आली आहे.

## सुटे तेल विक्रीला वर्षाची मुदतवाढ

**मुंबई :** सनदी अधिकारी तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून राज्यात खाद्यपदार्थातील भेसळ कमी झाली आहे. खाद्यपदार्थातील भेसळ, निकृष्ट दर्जाचे जेवण आढळताच तुकाराम मुंढे थेट कारवाई करताना दिसत आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी सुट्ट्या तेलाची विक्री बंद केली. खाद्यतेलाची विक्री करताना तेलकंपन्यांना नियमांचे पालन करावे लागेल, असे तुकाराम मुंढे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयामुळे छोटे व्यावसायिक, व्यापारांना मोठा फटका बसत आहे, असा दावा केला जात होता. असे असतानाच आता राज्य सरकारने तुकाराम मुंढे यांनी घेतलेला निर्णय फिरवला आहे.



## बाप्पांच्या किमतीत 30 टक्क्यांपर्यंत वाढ

**पुणे/प्रतिनिधी :**गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येउन ठेपल्याने नारायणगाव परिसरात गणेशमूर्ती विक्रीच्या दुकानांची लगबग वाढली आहे. विविध आकार, आकर्षक रंगसंगती आणि वेगवेगळ्या रूपांतील गणेशमूर्ती विक्रीसाठी



उपलब्ध झाल्या असून, घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मूर्ती खरेदीसाठी दुकानांमध्ये गर्दी होताना दिसत आहे. यंदा मूर्ती बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल, रंग, वाहतूक तसेच मजुरीच्या खर्चात वाढ झाल्याने काही प्रमाणात गणेशमूर्तींच्या किमती वाढल्या आहेत. महागाई वाढल्याने गणेशमूर्तींच्या किमतीमध्ये २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दुकानदार सांगत आहेत. शाडू मातीच्या तुलनेत प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींना मोठी मागणी असल्याचे मूर्तिकार व विक्रेत्यांनी सांगितले. शाडू मातीची मूर्ती तयार करण्यासाठी अधिक वेळ, मेहनत आणि खर्च लागतो. त्याच तुलनेत प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती साच्याच्या माध्यमातून कमी वेळेत तयार करता येत असल्याने मोठ्या प्रमाणावर मूर्ती तयार करणे शक्य होते. मात्र, पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे आवाहन विविध स्तरांतून करण्यात येत आहे. त्यामुळे काही भाविकांकडून शाडू मातीच्या मूर्तींनाही पसंती दिली जात आहे.गणेशमूर्ती विक्री करणा-या एका दुकानदाराने सांगितले की, गणेशोत्सव जवळ येत असल्याने गेल्या काही दिवसांपासून ग्राहकांची संख्या वाढली आहे. घरगुती गणपतीसाठी मध्यम आकाराच्या मूर्तींना मोठी मागणी आहे. (पान २ वर)

## पहिल्याच दिवशी महागाईचा बॉम्बस्फोट

**नवी दिल्ली/ मुंबई : प्रतिनिधी-**दहीहंडी, पोळा आणि गणेशोत्सव हे महत्त्वाचे सण तोंडावर असतानाच महागाईचा बॉम्ब फुटला आहे. सप्टेंबर महिना सुरू झाला तो महागाई आणि दरवाढ घेउनच! दोन आठवड्यांपासून साखर किलोमागे तब्बल २० रुपयांनी महागली आहे, गूळ, वेलची अगोदरच महागले आहे. हे कमी म्हणून की काय मंगळवारपासून एक लिटर दुधासाठी आता ९ रुपये जास्त मोजावे लागत आहेत. शिवाय व्यावसायिक गॅस सिलिंडर, पाईपलाईनने पुरवला जाणारा गॅस, सीएनजी, रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेही महागले आहे. यात महागलेल्या कुरिअर डिलिव्हरीचाही समावेश करावा लागेल.



१ सप्टेंबरपासून देशाच्या विविध भागांत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर, सीएनजी आणि पीएनजीच्या दरात वाढ लागू झाली आहे. तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत प्रति सिलिंडर ९.५० रुपये एवढी वाढ केली आहे. ही वाढ लगेचच लागू झाली आहे. दिल्लीमध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आता २,७३८ वरून वाढून २,७४७.५० रुपये झाली आहे. चेन्नईमध्ये ही किंमत वाढून २,९१६.५० रुपये झाली आहे. तसेच ५ किलोच्या मानक एलपीजी सिलिंडरच्या दरातही २ रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम रेस्टॉरंट, हॉटेल, ढाबे, मिठाईची दुकाने आणि स्वयंपाक तसेच इतर कामांसाठी व्यावसायिक एलपीजी वापरणा-या अशाच प्रकारच्या इतर व्यवसायांवर होईल. १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर वाढलेले नाहीत.

**सीएनजी २ रुपयांनी महागले**

मुंबईत सीएनजी आणि घरगुती पीएनजीचे (पाईपलाईन गॅस) दरही वाढले आहेत. मुंबईतील सीएनजी आणि पीएनजी दरातील वाढीचे कारण इनपुट गॅसच्या (कच्च्या गॅसच्या) वाढत्या किमतीत आहे. महानगर गॅस लिमिटेडने मुंबई आणि आसपासच्या परिसरातील सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांनी वाढ केली आहे. ही दरवाढ सोमवार (३१ ऑगस्ट) मध्यरात्रीनंतर लागू झाली आहे. परिणामी, मुंबई आणि लगतच्या भागात सीएनजीचा नवीन दर आता प्रति किलो ८८ रुपये झाला आहे. पश्चिम आशियातील संकटामुळे गॅसच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे ही दरवाढ करावी लागत असल्याचे महानगर गॅस लिमिटेडकडून सांगण्यात येते.

**दूध ९ रुपयांनी महागले**

मुंबई दूध उत्पादक संघटनेने म्हशीच्या सुट्या दुधाच्या दरात कधी नव्हे एवढी विक्रमी वाढ जाहीर केली आहे. आतापर्यंत ९३ रुपये प्रति लिटर मिळणारे दूध आता थेट १०२ रुपये प्रति लिटर झाले आहे.



पशुखाद्य आणि चा-याचे दर तब्बल २५ टक्क्यांनी वाढल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. हे दर १ सप्टेंबरपासून २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत लागू राहतील. त्यामुळे चहा, मिठाई आणि रोजच्या दुधावर याचा मोठा आर्थिक भार पडणार आहे.

**पीएनजीच्या युनिटमध्ये रुपयाची वाढ**

मुंबईत पाईपलाईनने पुरवला जाणारा घरगुती गॅसच्या दरातही प्रति स्टँडर्ड क्युबिक मीटर एक रुपयाची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीचा परिणाम सुमारे ३० लाख घरगुती पीएनजी ग्राहकांवर होईल. गॅसच्या वाढत्या खर्चामुळे पीएनजीच्या दरात बदल करणे आवश्यक असल्याचे महानगर गॅस लिमिटेडने स्पष्ट केले आहे. रिक्षा आणि टॅक्सीच्या दरात देखील १ सप्टेंबरपासून वाढ करण्यात आली आहे. काळी-पिवळी टॅक्सीचे पहिल्या १.६ किलोमीटरसाठी ३१ रुपयांवरून ३३ रुपये करण्यात आले आहे. शिवाय प्रति किलोमीटरच्या टप्प्यावरही किरकोळ दरवाढ लागू झाली आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कासदेच का? जितू जेसवाणींना 'आदिवासी प्रेम' अचानक एवढे का जागले?

## -गाजीपूरच्या एका गटासाठी प्रशासनाच्या दारात धाव; मग परिसरातील इतर कथित गैरव्यवहारांवर मौन का?

## ९९ वर्षांच्या कथित भाडेपट्ट्यांपासून उत्खनन परवान्यांपर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित; 'निवडक' तक्रारीमागचा हेतू काय?

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला** : आदिवासी बांधवांच्या जमिनीचे संरक्षण हा निश्चितच संवेदनशील आणि गंभीर विषय. मात्र, एखाद्या विशिष्ट आदिवासी जमीनधारकाच्या जमिनीपुरताच हा कळवळा मर्यादित असेल, तर त्यामागील भूमिका काय, असा सवाल उपस्थित होणारच! अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गाजीपूर-रुधाडी परिसरातील सध्याच्या घडामोडींनी नेमका हाच प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक ३५ मधील आदिवासी जमीनधारक भीमराव कासदे यांच्या मालकीच्या शेतजमिनीवर गैरआदिवासी व्यक्ती संतोष शेंडे यांच्याकडून क्रशर उभारण्यात आल्याचा आरोप करीत जितू जेसवाणी यांनी जिल्हा प्रशासनातील विविध अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत. या तक्रारीत आदिवासी बांधवांवर अन्याय होत असल्याचा आणि शासनाची फसवणूक होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रार खरी असल्यास तिची चौकशी होऊन दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. मात्र प्रश्न असा आहे की, गाजीपूरच्या आदिवासी जमिनींच्या प्रश्नावर एवढी आक्रमक भूमिका घेणारे जेसवाणी याच परिसरातील इतर कथित व्यवहारांबाबत आतापर्यंत कुठे होते? हा प्रश्न आता नागरिकांच्या चर्चेचा विषय बनला आहे.गाजीपूर आणि रुधाडी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून खदान आणि क्रशर व्यवसाय सुरू आहे. या व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी जमिनींचे




कथित भाडेपट्टे, करारनामे, उत्खनन परवाने, जड वाहतूक, ब्लास्टिंग आणि जमीन वापराबाबत विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही प्रकरणांबाबत शासकीय स्तरावर चौकशी किंवा अहवाल झाल्याचे सांगितले जाते. शासनाच्या अभिलेखात जर या व्यवहारांबाबत गंभीर नोंदी असतील, तर त्यांचीही चौकशी होणे अपेक्षित आहे. मग कासदे यांच्या गट क्रमांक ३५ बाबतच प्रशासनाच्या दारात धाव का? आदिवासी हिताचा मुद्दा असेल तर गाजीपूरमधील प्रत्येक आदिवासी जमीनधारकाच्या हक्कासाठी समान भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा, 'निवडक आदिवासी प्रेम' नेमके कोणाच्या हितासाठी? असा सवाल उपस्थित होणे अपरिहार्य आहे.

### 'आदिवासी हित' की निवडक हस्तक्षेप?

कासदे यांच्या गट क्रमांक ३५ बाबत तक्रार झाली आहे. गट क्रमांक ३५ चुकीचा असेल तर कारवाई झालीच पाहिजे; पण त्याच निकषाने गट क्रमांक २७, ३६, ३७, ३८ आणि परिसरातील इतर तक्रारी झालेले संशयित व्यवहारही तपासले गेले पाहिजेत. एक गट तपासून फाईल बंद करण्याऐवजी संपूर्ण परिसरातील आदिवासी जमीन व्यवहारांची तपासणी करायला पाहिजे. जमिनींचे फेरफार, भाडेपट्टे, करारनामे, उत्खनन परवाने, क्रशर परवानग्या, गौण खनिज रॉयल्टी, पर्यावरणीय मंजुरी, ब्लास्टिंग परवानग्या आणि प्रत्यक्ष लाभार्थी या सर्व बाबींचे एकत्रित परीक्षण झाले तरच गाजीपूरमधील वास्तव समोर येईल. अन्यथा, एका प्रकरणावरून प्रशासनाची यंत्रणा कामाला लावायची आणि त्याच परिसरातील इतर कथित गंभीर बाबींवर डोळेझाक करायची, असा संदेश जाऊ शकतो. परिणामी आदिवासी हिताचा झेंडा उचलला असेल, तर तो एका गट क्रमांकावर न थांबवता या संपूर्ण परिसरात असलेल्या आदिवासी बांधवांच्या हिताचा असावा अशी मागणी जोर धरत आहे.

### ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यांचा 'जनक' कोण ?

गाजीपूर आणि रुधाडी हा गौण खनिजांनी समृद्ध आणि आदिवासीबहुल परिसर. या भागात २००९ नंतर खदान व क्रशर व्यवसायाला मोठी चालना मिळाल्याचे सांगितले जाते. याच काळात आदिवासी जमीनधारकांच्या जमिनींबाबत दीर्घ मुदतीचे कथित भाडेपट्टे आणि करारनामे अस्तित्वात आल्याची चर्चा आहे. ९९ वर्षांचा कथित भाडेपट्टा करण्याची पद्धत या परिसरात प्रथम कोणी आणली? करार कोणी केला? कोणाच्या फायद्यासाठी केला? त्याला कायदेशीर आधार काय? संबंधित आदिवासी जमीनधारकांना प्रत्यक्ष किती मोबदला मिळाला? करारानंतर जमिनीचा प्रत्यक्ष वापर कोण करत आहे? शासनाच्या कोणत्या विभागाने त्याची पडताळणी केली? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय गाजीपूरच्या जमीन व्यवहाराचे चित्र स्पष्ट होणार नाही. जर अशा करारांबाबत शासकीय नोंदींमध्ये आक्षेप किंवा अनियमिततेचे उल्लेख असतील, तर त्या नोंदी बाहेर काढून संपूर्ण व्यवहाराची चौकशी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

### भूमी अभिलेख विभागही प्रश्नांच्या भोवऱ्यात-

गट क्रमांक ३५ संदर्भातील मोजणी प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. स्पष्ट मोजणी आदेश नसताना मोजणी शुल्क स्वीकारण्यात आले का? शुल्क स्वीकारण्याचा अधिकार कोणत्या आदेशावर आधारित होता?

मोजणीची मागणी करणाऱ्या व्यक्तीचा संबंधित जमिनीशी कायदेशीर संबंध काय होता? आदेश असेल तर तो दाखवा; आदेश नसेल तर शुल्क स्वीकारले कसे? या प्रश्नांची उत्तरे भूमी अभिलेख विभागाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण जमीन मोजणीसारख्या संवेदनशील प्रक्रियेत नियमबाह्य पद्धतीचा किंचितही संशय निर्माण होणे प्रशासनासाठी गंभीर बाब ठरू शकते.

### जितूभाऊ, आता 'या' प्रश्नांनाही हात घाला!

गट क्रमांक ३५ बाबत तक्रार करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यामुळे आता नागरिकांची अपेक्षा आहे की, आदिवासी हितासाठी हाच आक्रमक पवित्रा गाजीपूर-रुधाडीतील इतर प्रकरणांतही दिसावा. मग या प्रश्नांची उत्तरे मिळवून देण्यासाठी पुढाकार कधी?

१. गट क्रमांक २७ व ३८ वरील क्रशरबाबतचे कथित भाडेपट्टे व करारनामे वैध आहेत का?

२. गट क्रमांक ३७ वरील दुसऱ्या क्रशरसंदर्भातील कथित बॉंड/करारनाम्याचा कायदेशीर आधार काय? ३. परिसरातील मॅगझिनची सुरक्षा व्यवस्था आणि परवानग्या तपासल्या आहेत का?

४. खदान परिसरात सुरू असल्याचा आरोप असलेल्या ब्लास्टिंगला आवश्यक परवानग्या आहेत का? ५. पोपटखेड-गाजीपूर जोडणाऱ्या पुलाची अवजड वाहतुकीमुळे झालेली दुरवस्था कोणाच्या जबाबदारीची? ६. क्रशर व जड वाहनांमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत असल्यास त्याचे पंचनामे आणि भरपाई झाली का? ७. २००९ पासून अस्तित्वात असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या ९९ वर्षांच्या कथित भाडेपट्ट्यांची चौकशी कधी होणार? ८. दारिद्र्यरेषेखालील आदिवासींच्या नावावर उत्खनन परवाने असल्यास प्रत्यक्ष उत्खनन कोण करीत आहे?

९. आदिवासींच्या नावावर जमीन असली तरी प्रत्यक्ष आर्थिक लाभ कोण घेत आहे, याचा तपास झाला आहे का?

हे प्रश्न उपस्थित करण्याची वेळ आता आली आहे. कारण एकाच आदिवासी कुटुंबाच्या जमिनीपुरता न्याय आणि उर्वरित आदिवासी बांधवांच्या जमिनींबाबत मौन, अशी स्थिती राहिली तर प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहणार आहे.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात

# प्रसिद्ध आहार तज्ञ डॉ.ऋतुजा देशमुख यांचे मार्गदर्शन




**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयामध्ये पोषण सप्ताहानिमित्त प्रसिद्ध आहार तज्ञ डॉक्टर ऋतुजा देशमुख यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. बदलत्या जीवनशैलीचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रसिद्ध आहार तज्ञ,डॉक्टर, पॅथॉलॉजिस्ट असणाऱ्या आणि नुकत्याच इनोव्हा या वॉल कट कंपाउंड अमरावती येथे सुरू झालेल्या हेल्थ केंद्राच्या संचालक डॉक्टर ऋतुजा देशमुख यांनी आजच्या बदलत्या धावपळीच्या काळात विद्यार्थ्यांनी आरोग्याची घ्यावयाची काळजी, त्या दृष्टीने आहार,पुरेशी झोप, व्यायाम यांचे नियोजन कसे करावे यासाठी छोट्या छोट्या आणि महत्त्वाच्या टिप्स देऊन मार्गदर्शन केले. ा ि ा ा ि ा ा ६ ा घटकांमधून,खाद्यपदार्थांमधून मिळणारे पोषक घटक, विटामिन्स,प्रथिने शरीर निरोगी ठेवण्याच्या दृष्टीने कसे आवश्यक असतात, ध्येयाकडे पोहोचताना शरीर स्वास्थ्याला असलेले महत्त्व याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. शरीराला संपूर्ण पोषण मिळावे यासाठी सकाळच्या नाश्त्यामध्ये, जेवणामध्ये कोणते पदार्थ घ्यावेत, त्यासाठी वेळ कोणती असावी तसेच आहाराबरोबरच तितकेच महत्त्व व्यायाम, योगासन यांना असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून दिलखुलास असा संवाद त्यांनी साधला.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर स्मिता देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये जीवनामध्ये आरोग्याचे महत्व व त्यामागे असणारे यशाचे रहस्य जपण्याकरिता आहार व फिजिकल फिटनेस चे महत्व प्रतिपादित केले. आयुष्यातील स्वप्नांची पूर्तता करताना, ध्येयाकडे वाटचाल करताना आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही तर त्याला महत्त्व देणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक ममता राऊत यांनी जान है तो जहान है या म्हणीनुसार आयुष्यामध्ये आरोग्याला प्रथम स्थानी ठेवून आयुष्याची वाटचाल करण्याचे आवाहन केले. पोषण सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे आदित्य गावंडे यांनी केले. आरोग्य व शारीरिक शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

## १ व १० वरिल उर्वरित

### जेवणात पाल

आणि स्वच्छतेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित केला जात आहे. अन्नामध्ये पाल पडूनही त्याच अन्नाचा विद्यार्थ्यांना पुरवठा झाला असेल, तर हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी केलेली गंभीर तडजोड असल्याची भावना पालकांनी व्यक्तकेली आहे. आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या भोजनाची नियमित तपासणी होते का? स्वयंपाकगृहातील स्वच्छता आणि अन्नसुरक्षेचे निकष पाळले जातात का? भोजन तयार करताना संबंधित कर्मचा-यांकडून आवश्यक दक्षता घेतली जाते का, असे अनेक प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाले आहेत.

**दोषींवर कठोर कारवाईची मागणी**

घटनेची सखोल चौकशी करून दोषी आढळणा-या कर्मचा-यांवर तसेच संबंधित संस्थाचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पालक आणि स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेत कोणतीही हलगर्जीपणा किंवा निष्काळजीपणा सहन केला जाउ नये, अशी मागणीही करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती संबंधित शिक्षण विभाग आणि पोलिसांना देण्यात आली असून, अन्नातून विषबाधा नेमकी कशामुळे झाली, भोजनात पाल पडली होती का आणि विद्यार्थ्यांना तेच अन्न देण्यात आले होते का, यासह विविध बाबींचा तपास सुरू आहे. चौकशीनंतरच या घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

अन्नाचे नमुने तपासणीसाठी घेणार?

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या भोजनाचे नमुने तसेच स्वयंपाकगृहातील अन्नपदार्थ तपासणीसाठी घेउन त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्याची आवश्यकता आहे. अन्नसुरक्षेतील त्रुटी समोर आल्यास जबाबदारांवर कारवाई होणार का, याकडे आता पालकांचे लक्ष लागले आहे..आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रकार प्रशासनाने गांभीर्याने घेउन दोषींवर कठोर कारवाई करण्यासोबतच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी भोजन व्यवस्थेची तातडीने तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

### सरकारी बैठकांमध्ये अधिकारी-

( ज्द्यड्ड्ढ घ्ड्डथ्ड्ड़ घ्द्धदृड्ड्ड़द्य) म्हणून घोषित करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे प्रकल्पासाठी विविध शासकीय विभागाच्या जमिनी कोणताही भोगवटा मूल्य न आकारता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला हस्तांतरित होणार असल्यामुळे हा प्रकल्प गतीने पूर्ण होण्याचा मार्ग खुला झाला आहे.

नशामुक्तभारत अभियानात महाराष्ट्र राज्याने पुढचे पाउल टाकले आहे. २०२९ पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. व्यापक जनजागृती आणि अंमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदा-यांचे वाटप करण्यात आले आहे. नशामुक्तमहाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.

### बाप्पांच्या किमतीत ३०

यंदा मूर्ती तयार करण्याचा खर्च वाढल्यामुळे काही मूर्तींच्या किमतीत वाढ झाली आहे. मात्र, ग्राहकांच्या बजेटनुसार विविध किमतींच्या मूर्ती उपलब्ध करून दिल्या आहेत.

**बाप्पाच्या आगमनाची भक्तांना उत्सुकता-** गणेशोत्सव जवळ आल्याने नारायणगाव परिसरातील वातावरण गणेशमय होउ लागले आहे. गणेशमूर्ती विक्रीची दुकाने आकर्षक पद्धतीने सजविण्यात आली असून, सकाळपासून सायंकाळपर्यंत या दुकानांमध्ये भाविकांची ये-जा सुरू आहे. आपल्या घरातील गणपतीची मूर्ती निवडताना कुटुंबातील सदस्यांकडून विविध मूर्तींची पाहणी केली जात आहे.

### सराईत गुन्हेगार 'निक्कु'वर

एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव पुढे पाठविला. पोलिस उपायुक्त व(मुख्यालय) प्रांजली सोनवणे आणि गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एमपीडीए सेलने गोपनीय प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावावर विचार करून पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानबद्धतेचा आदेश पारित केला. त्यानंतर गाडगेनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी गायकवाडचा शोध घेऊन त्याला स्थानबद्धतेचा आदेश बजावला. या कारवाईत गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे, पोहेकॉ विनोद इंगळे, सचिन मोहोड व इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तसेच गुन्हे शाखेच्या एमपीडीए सेलचे सहायक पोलिस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस उपनिरीक्षक अजय मिश्रा आणि पोलीस कर्मचारी चेतन कराडे यांनी प्रस्ताव तयार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

आगामी सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस आयुक्तालयाने अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली आहे. अशा गुन्हेगारांच्या हालचाली व गुन्हेगारी अभिलेखाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार एमपीडीए कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### माझ्या वडिलांना न्याय द्या!

वन अधिकारी सामाजिक वनीकरण पुसद प्रणिता पारधी, वन अधिकारी शंकर मडावी, पुसदचे सहायक वनसंरक्षक तथा सामाजिक वनीकरणचा अतिरिक्त प्रभार असलेले प्रभाकर शामराव ठोंबरे आणि वनरक्षक सुनील चिकणे हे जबाबदार असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला. या चौघांवर गुन्हा दाखल करून चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

शुक्ला यांच्या अंत्यविधीच्या काळातही कुटुंबीय पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी धावपळ करीत होते. त्यानंतर जिल्हा पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली असता समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही, असा आरोप पलक पाठक यांनी केला. उलट, 'आत्महत्या करण्याची काय आवश्यकता होती?' अशा आशयाचे प्रश्न विचारून पीडित कुटुंबाचे खच्चीकरण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, सोमवारी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेऊन कुटुंबीयांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. यावेळी संबंधित आरएफओचे रेकॉर्ड सील करून स्वतंत्र चौकशी समिती नेमण्याची मागणी पंजाब भोकरे यांनी केली. वन विभागात बोगस वाउचर, बोगस बिले व मस्टरच्या माध्यमातून निधीचा गैरवापर, तसेच नातेवाईकांना कामे देऊन आर्थिक अनियमितता होत असल्याचा आरोपही पत्रकार परिषदेत करण्यात आला. संबंधित कागदपत्रांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. याचवेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेली काही हस्तलिखित कागदपत्रे आपल्या वडिलांच्या हस्ताक्षरातील नसल्याचा दावा पलक पाठक यांनी केला. बोगस कागदपत्रांच्या आधारे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्यास न्यायालयीन लढा देण्याचा इशारा त्यांनी दिला. मृतक शुक्ला यांच्या कुटुंबाला सानुग्रह मदत, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई आणि ३३३९ वनमजुरांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. त्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण, ११ पानी पत्रातील आरोपांची सत्यता काय आणि प्रशासन आता प्रत्यक्ष कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तडीपार 'डॉन' चाकू घेऊन दहशत

माहिती मिळाली. फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महादेवखोरी येथील मैदानात तडीपार इसम श्रवण ऊर्फ डॉन हा हातात चाकू घेऊन ये-जा करणाऱ्या नागरिकांना धमकावत दहशत निर्माण करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पथक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांचे पथक येताच संशयिताला पळून जाण्याची संधी न देता शिताफीने घेराव घालून ताब्यात घेण्यात आले. झडती घेतली असता त्याच्या ताब्यात धारदार लोखंडी चाकू आढळून आला. पोलिसांनी हा चाकू जप्त केला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कलम ४/२५ आर्म्स ॲक्ट तसेच महाराष्ट्र पोलिस कायद्यातील कलम १४२, १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, श्रवण ऊर्फ डॉन याच्यावर यापूर्वीच प्रतिबंधात्मक कारवाई करून त्याला तडीपार करण्यात आले होते. असे असतानाही तो शहरात आढळून आल्याने पोलिसांनी त्याच्यावर पुन्हा कारवाई केली आहे.

### सहकारी शेतकी खरेदी विक्री

माजी अध्यक्ष मानकचंद जैन यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून सभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष परीक्षित ढेकेकर यांनी मानकचंद जैन यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर सभेला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम मागील वर्षाचे प्रोसिडीग वाचून कायम करण्यात आले. संस्थेचे सण २५-२६ या आर्थिक वर्षाचे व्यापारी पत्रक नफा तोटा वाचन करून पुढील आर्थिक वर्षाचे नियोजना विषयी माहिती देण्यात आली. याशिवाय मयत झालेल्या सभासदांचे जागी कुटुंबातील एका व्यक्तीला सभासद म्हणून घेण्याकरता नियमानुसार कार्यवाही करून संस्थेचे सभासद करण्यात येईल असे ठरविण्यात आले. पुढील आमसभेमध्ये वारसदाराच्या नावाची यादीला आमसभेची मंजुरात घेण्यात येईल. या निर्णयावर उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त केले .संस्थेतर्फे सभासदाला भेट वस्तूचे वाटप करण्यात आले तसेच अध्यक्ष परीक्षित ढेकेकर यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगती विषयी माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष परीक्षित ढेकेकर, उपाध्यक्ष भालचंद्र रोहनेकर, संचालक विजय पाटेकर, बळीराम वाट, प्रभाकर काळमेघ, संजय देवतळे ,समीर दहातोंडे ,सुरेंद्र खापरी, पुंडलिक रिठे, दिनेश गिरी, देवेंद्र काळबांडे, स्मिता सावदे याशिवाय संस्थेचे सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. याशिवाय व्यवस्थापक अमोल खंडार, रमेश पांडे, स्वप्निल रिठे ,प्रमोद ,श्याम कणसे, देवेंद्र बोरकर, गौरव टोंगळे या कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### चाकू घेऊन दहशत निर्माण

आदींनी केली. आरोपी विरुद्ध भारतीय शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

### रानडुकरावर झाडली गोळी,

आनंदवाडी येथे शोधमोहीम राबवून दोघांनाही ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान सुरुवातीला आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कसून चौकशीनंतर दोघेही रानडुकराच्या शिकारीसाठी चिंचोली काळे शिवारात गेल्याची कबुली त्यांनी दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. रानडुकरावर गोळी झाडल्यानंतर तिचे छरे जमिनीवर आदळून उडाले आणि त्यातील एक छरा फिर्यादी मोहोड यांच्या मांडीला लागल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक पंकज कांबळे करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत सपोनि पंकज कांबळे यांच्यासह पोलिस कर्मचारी रविंद्र बावणे, आशीष राऊत, ज्ञानेश्वर गवई आणि वैभव आकोटकर यांनी सहभाग घेतला.

### ग्रामपंचायत युनियनचे जिल्हा

अधिकृत चित्रीकरण व सोशल मीडियावर होणाऱ्या बदनामीला आळा घालावा. संवेदनशील आणि वाददग्रस्त ग्रामपंचायतीच्या बैठकीसाठी प्रशासनाने सशस्त्र व निःशुल्क पोलीस बंदोबस्त पुरवावा. कृषी, आरोग्य, समाज कल्याणसह इतर विभागांच्या योजनांचे प्रशासकीय व अंमलबजावणीचे काम संबंधित विभागाकडे सोपवावे. लाभार्थी निवड पद्धतीत सुधारणा करावी या सह इतर मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. आंदोलन करणाऱ्यांमध्ये युनियनचे कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### शेख कासीम हत्याकांडात आणखी

आरोपी अन्सार खान रोशन खान याने आपल्या साथीदारांना बोलावले. काही वेळातच इरफान खान रोशन खान, जिया, फराज सह इतर युवक दुकानाच्या आत शिरले. आरोपींकडे चाकू, लोखंडाच्या पट्ट्या आणि लाकडी दांडके होते. त्यांनी दोन्ही युवकांना घेरून मारहाण करण्यास सुरुवात केली.आरोपी अन्सार खानने लाकडी दांडक्याने मृतक शेख कासीमच्या डोक्यावर वार केला, तर आरोपी इरफान खानने शोएब शाहच्या पोटावर वार केला. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.दोघांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान शेख कासीम शेख शकीम याचा मृत्यू झाला, तर शोएब शाह उर्फ गुड्डू याची प्रकृती अजूनही चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर पोलिसांनी दारूच्या दुकानातील आणि आसपासच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. यामध्ये दुकान परिसरातील वाद आणि त्यानंतर युवकांवर हल्ला केल्याची संपूर्ण घटना कैद झाली असून हे फुटेज आता व्हायरल झाले आहे. बडनेरा पोलिसांनी ८ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. घटनेनंतर लगेचच मुख्य आरोपी अन्सार खानला अटक करून न्यायालयात हजर केले असता, त्याला ४ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अन्सार खानच्या अटकेनंतर बडनेरा ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार यांच्या नेतृत्वा खालील पथकाने आणखी ४ आरोपींना ताब्यात घेतले.या प्रकरणात आता अटकेतील आरोपींची संख्या ५ झाली असून, फरार असलेल्या इतर ३ आरोपींचा पोलीस कसून शोध घेत आहेत.

### म्हशींना वाचवण्याच्या प्रयत्नात

अपघाता नंतर ट्रक मध्ये भरलेली गिट्टी आणि दगड रस्त्यावर विखुरले गेले. त्यामुळे काही काळ हायवेवरची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.माहितीनुसार, ट्रक चालके भरधाव वाहन चालवत होता. त्याच दरम्यान रस्त्यावर अचानक एक म्हैस आडवी आली. तिला वाचवण्यासाठी चालकाने अचानक स्टेअरिंग वळवले. यामुळे वाहनाचा तोल बिघडला आणि ट्रक रस्त्याच्या कडेला पलटी झाला.

अपघातात ट्रकच्या काचा फुटल्या असून वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे. ट्रकमधील माल रस्त्यावर पडला होता. अपघातानंतर घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. रस्त्यावर गिट्टी-दगड पसरल्याने वाहनांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण झाला. घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा केला.सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी नाही झाली.

### लोंबकळणा-या फायबर केबलमुळे

२७ सीएच ९३८९ क्रमांकाच्या दुचाकीवरून एक महिला जात असताना ही फायबर केबल दुचाकीला अडकली. अचानक केबल अडकल्याने दुचाकीचा तोल गेला.यामुळे महिला वाहनासह रस्त्यावर पडली. महिला गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना गंभीर अवस्थेत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर शहरातील फायबर केबलचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विविध चौक, रस्त्याच्या कडेला असलेले विद्युत पोल आणि पुलावरून लटकलेल्या केबल्समुळे भविष्यात मोठा अपघात कोणाची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे लवकरात लवकर याचा बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## राहुल गांधींवरील एफआयआरच्या निषेधार्थ वाशिम जिल्हा काँग्रेसचा भव्य मोर्चा

### लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा काँग्रेसचा निर्धार ; पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

खासदार तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या एफआयआरच्या निषेधार्थ वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव ॲड. दिलीपराव सरनाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार अमित झनक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मोर्चा पार पडला.



मोर्चात जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी, तालुका व शहर काँग्रेसचे पदाधिकारी, विविध सेलचे पदाधिकारी, युवक काँग्रेस, एनएसयूआयचे कार्यकर्ते तसेच काँग्रेसप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राहुल गांधी यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या एफआयआरचा तीव्र निषेध नोंदविला. लोकशाही, संविधान आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी काँग्रेसचा संघर्ष अविरत सुरू राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

मोर्चात प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव जावेद सौदागर, चंद्रकांत साठे, एससी सेल प्रदेश कमिटीचे मधुकर जुमडे, काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष किसनराव मस्के, सरचिटणीस परसरामजी भोयर, मंगरूळपीर तालुकाध्यक्ष दिलीप मोहनावाले, उपाध्यक्ष डॉ. श्याम गाभणे, तालुकाध्यक्ष गजानन गोटे, शहराध्यक्ष सागर गोरे, कारंजा तालुकाध्यक्ष विजयराव देशमुख, शहराध्यक्ष अब्दुल राजिक शेख, रिसोड तालुकाध्यक्ष रामेश्वर देवकर, पी. पी. अंभोरे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वैभव सरनाईक, एनएसयूआयचे अध्यक्ष शिवम वाघ, मानोरा तालुकाध्यक्ष रामनाथ राठोड, एससी सेलचे जिल्हाध्यक्ष मनीष भालेराव यांच्यासह संध्या सभादिंडे, उज्वल देशमुख, संजयराव देशमुख, सुरेश रत्नपारखी, प्रा. दादाराव देशमुख, सय्यद गुलाब, सय्यद मनवर, जावेद शेख, राजू घोडी, संतोष तात्या गावंडे, माधवराव उंडाळ, यांच्यासह जिल्ह्यातील असंख्य काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मोर्चादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ तसेच लोकशाही व संविधानाच्या रक्षणाच्या घोषणा दिल्या. एफआयआरच्या माध्यमातून विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप उपस्थितांनी केला. जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष आक्रमकपणे आवाज उठवत राहील, असेही यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन उज्वल देशमुख यांनी केले. प्रा. दादाराव देशमुख व सुरेश रत्नपारखी यांनी आभार मानले. 'लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेसचा संघर्ष अविरत सुरू राहील', या निर्धाराने मोर्चाचा समारोप करण्यात आला.

## रिसोड बाजार समितीला मोठा दिलासा

### पणनमंत्र्यांकडून समितीच्या निर्णयांना महत्त्वपूर्ण पाठबळ

■ प्रतिनिधी | रिसोड ■

कृषी उत्पन्न बाजार समिती, रिसोडच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या दोन प्रकरणांमध्ये राज्याचे पणनमंत्री मा. जयकुमार रावल यांनी बाजार समितीच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिल्याने समितीला मोठा दिलासा मिळाला आहे.

पहिल्या प्रकरणात बाजार समितीच्या मुख्य यार्डातील सर्वे नं. १०/२ मधील १० भूखंड व सर्वे नं. १०/६ मधील १ भूखंड, असे एकूण ११ भूखंड २९ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्याच्या निर्णयाला पणनमंत्र्यांनी मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे दूरदर्शनच्या जागेचे उत्पन्न ६३००० हजार रुपयावरून बाजार समितीच्या उत्पन्नात ?१ कोटी ६९ लाख ३९ हजार ३७० इतकी वाढ झाली असून, बाजार समितीच्या आर्थिक बळकटीकरणासह भविष्यातील विकासकामांसाठी मोठा आर्थिक आधार उपलब्ध होणार आहे.

बाजार समितीच्या उपलब्ध मालमत्तेचा योग्य व परिणामकारक वापर करून समितीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाला शासनस्तरावरून मिळालेली ही मान्यता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वाढीव उत्पन्नाचा उपयोग बाजार समितीच्या पायाभूत सुविधा, शेतकरी व व्यापारी हिताच्या विविध विकासकामांसाठी करता येणार आहे. दरम्यान, मागील काळात काही तक्रारींच्या आधारे बाजार समितीच्या कामकाजाबाबत विविध बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, संबंधित बाबींची वस्तुस्थिती, अधिकृत कागदपत्रे व शासनस्तरावरील निर्णय समोर आल्यानंतर वस्तुस्थिती अधिक स्पष्ट झाली आहे. ठोस व विश्वसनीय पुराव्याअभावी केवळ तक्रारींच्या आधारे प्रसिद्ध झालेल्या काही वृत्तांमुळे बाजार समितीच्या कामकाजाबाबत गैरसमज निर्माण झाले होते. त्यामुळे भविष्यात कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी संबंधित अधिकृत कागदपत्रे व शासनाचे निर्णय तपासून वस्तुनिष्ठ वृत्तांकन करण्यात यावे, अशी बाजार समितीची अपेक्षा आहे. दुसऱ्या प्रकरणातही बाजार समितीने दाखल केलेला रिव्हिजन अर्ज मंजूर करण्यात आला असून, संबंधित चौकशी समिती गठित करण्याचा आदेश तसेच चौकशी समितीचा दिनांक २५ मे २०२६ रोजीचा चौकशी अहवाल स्थगित ठेवण्याचा निर्णय पणनमंत्र्यांनी दिला आहे. या दोन्ही निर्णयांमुळे बाजार समितीच्या आर्थिक हिताचे संरक्षण, उत्पन्नवाढीला चालना, उपलब्ध मालमत्तेचा योग्य वापर आणि विकासकामांसाठी आर्थिक क्षमता वाढविण्याच्या प्रयत्नांना मोठे बळ मिळाले आहे.

बाजार समितीच्या वतीने या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करण्यात येत असून, शेतकरी, व्यापारी, अडते व बाजार समितीच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून पारदर्शक, कायदेशीर व विकासाभिमुख कामकाज सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## मालनेश्वर संस्थानवर हरिनाम भागवत सप्ताहास प्रारंभ; भक्तिमय वातावरणात दुमदुमली नगरी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील शिव चौक येथील प्राचीन असलेले श्री मालनेश्वर संस्थान येथे ५३ वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरेनुसार याहीवर्षी अखंड हरिनाम भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून आज दिनांक १ सप्टेंबर मंगळवार रोजी अखंड हरिनाम भागवत सप्ताहाला मालेगांव नगरीत कलशयात्रा काढून सुरुवात झाली आहे कालशयात्रेमध्ये भागवत वाचक भागवताचार्य ह भ प श्री संदीप महाराज पोफळे शास्त्री आळंदीकर, श्री जगतगुरु संत तुकाराम महाराज भजनी मंडळ ईरळा, श्री मालनेश्वर महिला भजनी मंडळ तसेच मालनेश्वर संस्थानचे सर्व सेवेकरी मंडळी यांची उपस्थिती होती. आज दिनांक १ सप्टेंबर पासून या सप्ताहाला सुरुवात झाली असून भागवत वाचन भागवताचार्य ह भ प श्री संदीप महाराज पोफळे शास्त्री आळंदीकर यांच्या मधुर वाणीतून सकाळी १० ते १ व दुपारी ३ ते ५ या वेळेत होत असून दररोज रात्री आठ ते दहा भजनाचे आयोजन करण्यात आले.


## चॅम्पियन चेस अकॅडमीचे घवघवीत यश

### चार वर्षांच्या धून देवानीचा 'सर्वात कमी वयाची उत्कृष्ट खेळाडू' पुरस्काराने गौरव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथे आयोजित ऑल इंडिया ओपन फिडे रॅपिड रेटिंग चेस टूर्नामेंट २०२६ मध्ये चॅम्पियन चेस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. सुमारे ४०० खेळाडूंच्या सहभागाने झालेल्या या स्पर्धेत अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध गटांत दमदार कामगिरी केली.

अनरेटेड खेळाडूंच्या गटात चॅम्पियन चेस अकॅडमीत अवघ्या दोन महिन्यांचे प्रशिक्षण घेतलेल्या चार वर्षीय कु. धून मोहिता निकुंज देवानी हिने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे



लक्ष वेधून घेतले. अवघ्या चार वर्षांच्या धूनने आत्मविश्वासाने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने डाव खेळत 'सर्वात कमी वयाची उत्कृष्ट खेळाडू' हा विशेष पुरस्कार पटकाविला. तिच्या बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाचे उपस्थित मान्यवर, आयोजक, पालक व बुद्धिबळप्रेमींनी कौतुक केले.

याच स्पर्धेत कु. दित्या अंकिता सौरभ सोमानी हिने ११ वर्षांखालील मुलींच्या गटात सातवा क्रमांक मिळवत पारितोषिक पटकाविले. तसेच मास्टर विवांश माधुरी रोशन बंग, मास्टर विभुम पुनम रामेश्वर बाहेती आणि मास्टर आरुष श्रीता अश्विनकुमार हाके यांनीही दमदार कामगिरी करत स्वर्णपदक प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना चॅम्पियन चेस अकॅडमीच्या संचालिका हेमा सोमानी यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ दोन महिन्यांचे प्रशिक्षण मिळाले आहे. अल्पावधीत विद्यार्थ्यांना बुद्धिबळातील मूलभूत तंत्र, डावपेच, नियोजन, एकाग्रता आणि स्पर्धात्मक खेळाची तयारी करून देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या नियमित सरावासोबतच पालकांचे प्रोत्साहन आणि अकॅडमीचे मार्गदर्शन त्यांच्या यशासाठी महत्त्वपूर्ण ठरले.

## मुंगळा बिटमध्ये चोरीच्या घटनात वाढ

### पोलीसांचे दुर्लक्ष; छडा लावण्याची मागणी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मुंगळा बिट बिट मध्ये चोरीच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून नागरिकां मध्ये भितीचे वातावरण पसरले आहे बिट मधील कर्मचा-याची गस्त वाढवावी आणी बिट मंदिर वाढत्या चो-या, अवैध धंदे, व गुन्हेगारी वर आळा घालण्याची मागणी केली जात आहे

मुंगळा बिट मधील पांगरी कुटे शेत शिवारातील ७ ते ८ शेतकऱ्यांच्या शेतातील मोटार पंपाच्या केबल वायर, सोलर अंटीना, केबल वायर, झटका मशीन, शेत अवजारे चोरीला गेली आहेत या बाबत पोलीसात तक्रार दाखल करुनही अद्यापही बहुतांश घटनांचा छडा अद्यापही लागला नाही बिट मध्ये नेमणूक असलेले कर्मचारी महिन्यातील ठराविक वेळेतच गांवात दिसून येतात अन्यथा ते गांवात ढुकुंनही बघत नसल्याने चो-या सह गुन्हेगारीच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचा आरोप नागरिकां मधुन केला जात आहे सलग होणा-या चो-या मुळे शेतकरी व व्यापारी वर्गात दहशत पसरली आहे.

> मुंगळा बिट मधिल पांगरी कुटे येथील ७ ते ८ शेतकऱ्यांच्या शेतातील शेती उपयोगी अवजारे चोरीला गेली आहेत अद्यापही या घटनांचा छडा लागला नाही बिट मधील कर्मचा-याची नियमित गस्त वाढवावी, चोरी, अवैध धंद्यासह गुन्हेगारी वर वचक निर्माण करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल,
>
> **प्रदीप कुटे**
> माजी तालुका प्रमुख
> शिवसेना (शिंदे ) मालेगाव

## कांबळे यांच्या प्रदीर्घ सेवेला भावपूर्ण निरोप

### निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्ती गौरव समारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महसूल विभागातील कर्तव्यदक्ष कर्मचारी धनंजय कांबळे यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील योगदानाचा गौरव करीत त्यांचा सेवानिवृत्ती गौरव समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांच्या अध्यक्षतेखाली भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी कांबळे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गजानन उगले यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश तसेच धनंजय कांबळे यांच्या सेवाप्रवासाचा आढावा घेतला. उपविभागीय अधिकारी कार्यालयातील सहायक



महसूल अधिकारी श्रीराम गवई यांनी मनोगत व्यक्त करताना कांबळे यांच्यासोबतच्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि मनमिळावू स्वभावाचे त्यांनी कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांनी धनंजय कांबळे यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक केले. कांबळे यांनी आपल्या सेवाकाळात प्रशासकीय जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि वेळेत पार पाडत आदर्श कर्मचारी म्हणून काम केले. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे प्रशासनाला त्यांची उणीव नक्कीच भासेल, असे त्यांनी नमूद केले. सत्काराला उत्तर देताना धनंजय कांबळे यांनी सेवाकाळात वरिष्ठ अधिकारी तसेच सहकारी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सेवाप्रवासात सहकाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे आभार मानले.

या निरोप समारंभाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ॲड. महामुनी, नायब तहसीलदार घोडे, नायब तहसीलदार अर्चना घुगे, नायब तहसीलदार डांगे, तात्यासाहेब नवघरे यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी गजानन उगले यांनी आभार मानले. उपस्थितांनी धनंजय कांबळे यांना पुढील आनंदी, निरोगी व दीर्घ सेवानिवृत्त आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमली शिवर नगरी

**अकोला :** 'हर हर महादेव'च्या जयघोषाने शिवर नगरी दुमदुमून गेली. भक्तीचा उत्साह, सजविलेल्या कावडी आणि महादेवाच्या जयघोषात न्हाऊन निघालेल्या वातावरणात दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी शिवर येथे कावड महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. विशेष म्हणजे सर्वधर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत या सोहळ्यातून सामाजिक एकोपा व बंधुभावाचा संदेश दिला.

श्री शिव चॅरिटेबल ट्रस्ट, शिवरद्वारा संचालित मानाची कावड, जय भोलेनाथ कावड मित्र मंडळ, शंभुराजे मित्र परिवार कावड मंडळ तसेच तांडव सेना कावड मित्र मंडळ यांच्या सहभागातून कावड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

## वाशिम जिल्हा चॉकबॉल संघाचा राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नागपुर येथे २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या १५व्या राज्यस्तरीय ज्युनिअर चॉकबॉल स्पर्धेत वाशिम जिल्हा चॉकबॉल संघाने अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक कमावले.

संघाने दमदार खेळ करत प्रतिस्पर्धी संघांना नमवले. अंतिम सामन्यात अतिशय चुरशीच्या लढतीत वाशिम संघाने आपली विजयी कामगिरी कायम ठेवली. त्यांच्या या विजयामुळे राज्यस्तरावर मान ऊंचवली. मुलीचा संघाने विजेतेपद पटकावत प्रथम क्रमांक पटकावला तर मुलांच्या संघाने उत्तम कामगिरी केली.प्रशिक्षकांचे मन जिंकले. वाशिम संघाने आपली विजयी कामगिरी कायम ठेवली. त्यांच्या या विजयामुळे वाशिमचा झेंडा ऊंचावला.



**कु. नेहा जामनिक बेस्ट प्लेयर :** या कामगिरीने जिल्ह्याचा मान उंचावला असून पुढील काळात राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेहा कडून मोठ्या अपेक्षा आहेत.

**प्रशिक्षक व व्यवस्थापनाचे योगदान :** विजयी संघाच्या मागे प्रशिक्षक व्यवस्थापकांचा मोलाचा वाटा आहे. मुलिंचा संघाचे प्रशिक्षक रोहित पुंडगे तर व्यवस्थापक राहुल कंठाळे यांनी संघाला योग्य मार्गदर्शन केले. मुलींच्या संघाचे प्रशिक्षक रोहित पुंडगे यांनीही मुलींना प्रोत्साहन देत उत्कृष्ट तयारी करून घेतली.

**जिल्हा संघटनेचे अभिनंदन :** या यशानंतर वाशिम जिल्हा चॉकबॉल संघटनेचे सचिव अजय अंभोरे व अध्यक्ष अनमोल पुंडगे यांनी संघांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, 'वाशिमच्या खेळाडूंनी या स्पर्धेत दाखवलेली जिद्द आणि मेहनत

कौतुकास्पद आहे. हे यश भविष्यातील अधिक मोठ्या विजयांची पायाभरणी ठरेल.

## पोलिस असल्याची बतावणी; २५ हजारांची अंगठी लंपास

■ प्रतिनिधी | रिसोड ■

आम्ही पोलिस आहोत, काल गांजा पकडला आहे. त्यामुळे चेकिंग सुरू आहे,' अशी बतावणी करून दोन अनोळखी व्यक्तींनी वृद्ध शेतकऱ्याची सोन्याची अंगठी हात चलाखीने लंपास केल्याची घटना रिसोड तालुक्यातील साखरा फाट्या नजिक २९ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडली घडली. याप्रकरणी रिसोड पोलिस ठाण्यात दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध विविध पध्दतिने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरजहागीर येथील सीताराम संभाजी गरकळ हे २९ ऑगस्ट रोजी दुपारी साखरा फाट्याजवळून रिसोड शहरात जात होते. त्यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना अडवून आपण पोलिस असल्याचे सांगितले. 'काल गांजा पकडला आहे, त्यामुळे चेकिंग सुरू आहे,' असे सांगत त्यांनी गरकळ यांच्या बोटातील सोन्याची अंगठी काढून रुमालात ठेवण्यास सांगितले.

गरकळ यांनी बोटातील अंगठी काढून रुमालात ठेवली. याच संधीचा फायदा घेत आरोपींनी हात चलाखी करून रुमालातील अंगठी लंपास केली आणि तेथून निघून गेले. सदर अंगठीचे वजन अंदाजे ८ ते १० ग्रॅम असून, तिची किंमत सुमारे ४० ते ४५ हजार रुपायचे अंगटी नगदी रोक रक्कम घेवून पोबरा झाले ह्या घटनेमुळे भितीचे वातावरण पसरले आहे.

## शेतकरी-शास्त्रज्ञ संवादातून आधुनिक व शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा जागर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या सहकार्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (POCRA) निवड झालेल्या गावांमध्ये शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद मंचाच्या माध्यमातून तंत्रज्ञान प्रसार व शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नियमित उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी आयोजित करण्यात येणाऱ्या शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमांतर्गत दि. १ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय, दापुरी खुर्द येथे शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर एल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे विषयतज्ज्ञ डॉ. एस. के. देशमुख तसेच पोक्रा प्रकल्पाचे समूह सहाय्यक अमोल राठोड उपस्थित होते.



यावेळी डॉ. एस. के. देशमुख यांनी सध्याच्या हवामान व पीक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी अवलंबावयाच्या एकात्मिक पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी नैसर्गिक शेतीचे शास्त्रीय महत्त्व, जमिनीचे आरोग्य संवर्धन, जैविक निविष्ठांचा संतुलित वापर, जैविक व एकात्मिक कीड व्यवस्थापन, पीक निरीक्षण तसेच उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. रासायनिक निविष्ठांचा अनावश्यक वापर टाळून स्थानिक पातळीवर उपलब्ध जैविक संसाधनांचा शास्त्रीय पद्धतीने वापर केल्यास उत्पादन खर्च कमी करण्यासोबतच जमिनीची सुपीकता व पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

अमोल राठोड यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची व उपलब्ध सुविधांची सविस्तर माहिती दिली. शेतकरी उत्पादक गट व सामूहिक उपक्रमांच्या माध्यमातून औजारे बँक, गांडूळखत निर्मिती बेड, चारा निर्मिती केंद्र यांसारख्या सामुदायिक सुविधांचा लाभ घेऊन त्यांचा जास्तीत जास्त वापर गावातील इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. सामूहिक पद्धतीने कृषी यंत्रसामग्री व निविष्ठांचा वापर केल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन शेतीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमानंतर शास्त्रज्ञांनी शेतकरी श्री. अशोक प्रल्हाद जाधव यांच्या शेतास भेट देऊन बेड पद्धतीने लागवड केलेल्या सोयाबीन पिकाची तसेच हळद पिकातील आंतरपीक म्हणून घेतलेल्या सोयाबीन पिकाची प्रक्षेत्र पाहणी केली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७६ ■ बुधवार, २ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मोई ग्रामपंचायत कार्यालयातच 'नशेचा तांडव'

## सरकारी फाईली भिरकावल्या, अधिकाऱ्यांसमोर तासभर धुडगूस

**आष्टी शहीद जनमाध्यम :** मोई तांडा ग्रामपंचायत कार्यालयात मध्यधुंद अवस्थेतील एका व्यक्तीने घुसून तब्बल तासभर धुडगूस घातल्याची धक्कादायक घटना घडली. जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरची पाने फाडण्यासह शासकीय फाईली आणि कागदपत्रे भिरकावण्यात आल्याने सरकारी कार्यालयाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार ग्रामपंचायत अधिकारी आणि पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांसमोरच घडल्याची माहिती आहे.

मोई तांडा ग्रामपंचायतीची मासिक सभा सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे तहकूब झाल्यानंतर सरपंच सुषमा चव्हाण घरी गेल्या. त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी ठाकरे, विस्तार अधिकारी कालोकर आणि पंचायत समितीचे कर्मचारी नरवाडे कार्यालयात उपस्थित होते.

याचवेळी गावातील एक व्यक्ती कथितरित्या मध्यधुंद अवस्थेत कार्यालयात घुसला. सुरुवातीला त्याने कार्यालयातील साहित्याची नासधूस सुरू केली. त्यानंतर फाईलींचे गठ्ठे उचलून फाडून कार्यालयात फेकले. जन्म-मृत्यू नोंदणीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या शासकीय नोंदी असलेल्या रजिस्टरची पानेही फाडल्याचा आरोप आहे.



सुमारे तासभर सुरू असलेल्या या धुडगुसामुळे अधिकारी आणि कर्मचारी भयभीत झाले. काही ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. या प्रकाराचा काही भाग कॅमेऱ्यात कैद झाल्याचीही माहिती आहे. घटनेनंतर ग्रामपंचायत प्रशासनाने आष्टी पोलिसांत तक्रार दाखल केली असून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

### सरकारी कागदपत्रे फाडणाऱ्यांना लगाम कधी

शासकीय अभिलेखांची नासधूस हा किरकोळ प्रकार नसून प्रशासनाच्या कामकाजावर थेट आघात आहे. त्यामुळे पोलिसांनी घटनेची सखोल चौकशी करून नुकसान झालेल्या अभिलेखांची पाहणी करावी आणि दोषीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे. सरकारी कार्यालयात अधिकारीच सुरक्षित नसतील तर सामान्य नागरिकांनी दाद मागायची कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# सुरक्षारक्षकांचा संताप अनावर; १६ मागण्यांसाठी सोलर प्लांटचे कामबंद आंदोलन

## किमान १७ हजार वेतनासह पीएफ, बोनस, विमा अन् मूलभूत सुविधांची मागणी

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** मौजा इंदरमारी येथील 'ग्रीन वॉल्ट सोलर पॉवर प्लांट'मध्ये सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या सुरक्षारक्षकांनी विविध १६ मागण्यांसाठी ३१ ऑगस्टपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या स्थानिक सुरक्षारक्षकांच्या मागण्यांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सीटीआरएलएस प्रशासन आणि इम्पिरियल सिक्युरिटी फोर्सच्या कथित मनमानीविरोधात सुरक्षारक्षकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

सुरक्षारक्षकांना दरमहा किमान १७ हजार रुपये वेतन मिळावे, पगार वेळेवर द्यावा, पीएफ खात्यात नियमित रक्कम जमा करावी, बोनस आणि ओव्हरटाईमचा योग्य मोबदला द्यावा, तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याला अधिकृत जॉईनिंग लेटर आणि पेमेंट स्लिप द्यावी, अशी प्रमुख मागणी आहे.

**उन्हात-पावसात ड्युटी; सुविधांच्या नावाने मात्र उपेक्षा**

सुरक्षारक्षकांना उन्हापासून आणि पावसापासून संरक्षणासाठी निवारा, हिवाळ्यात जॅकेट, बूट अथवा गमबूट आणि दोन गणवेश उपलब्ध करून द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. यासोबतच आरोग्य आणि अपघात विम्याची सुविधा देण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

**जुन्यांना डावलून नव्यांना संधी देण्याचा आरोप**

दोन ते तीन वर्षांपासून सेवा देणाऱ्या जुन्या सुरक्षारक्षकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून नव्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचा प्रयत्न केला जात असल्याचाही



आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे सुरक्षारक्षकांमध्ये असंतोष अधिक तीव्र झाला आहे.

सुपरवायझर आणि अधिकाऱ्यांकडून ड्युटीवरून कमी करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही सुरक्षारक्षकांनी केला आहे. नाईट ड्युटीदरम्यान अनावधानाने झोप लागल्यास थेट कामावरून कमी करण्याऐवजी संबंधित कर्मचाऱ्याला आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी मागणी आहे.

१६ मागण्या केवळ कागदावर न ठेवता कंपनी प्रशासनाने तातडीने आंदोलकांशी चर्चा करून न्याय्य तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा सुरक्षारक्षकांनी दिला आहे.

# एनडीपीएसमधील फरार सराईत आरोपी नागपुरातून अटक

**वर्धा जनमाध्यम :** अंमली पदार्थविरोधी कारवाईला वेग देत वर्धा पोलिसांनी एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल तीन गंभीर गुन्ह्यांमध्ये दीर्घकाळापासून फरार असलेल्या सराईत आरोपीला नागपूर शहरातून अटक केली. राजेंद्र उर्फ लड्डू राजाभाऊ किराड (४१), रा. महेश नगर, स्वामीनारायण मंदिरामागे, नागपूर, असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

किराड हा हिंगणघाट पोलिस ठाण्यातील दोन, तर रामनगर पोलिस ठाण्यातील एका अशा तीन एनडीपीएस गुन्ह्यांमध्ये फरार होता. हिंगणघाट पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक ९९२/२६ मध्ये कलम ८(क), २०(ब)(गग), २९ एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल असून, या प्रकरणात त्याला अधिकृतरीत्या अटक दर्शविण्यात आली आहे. तसेच अपराध क्रमांक १०००/२६ मध्ये कलम ८(क), २०(ब)(गग), २९ आणि रामनगर पोलिस ठाण्यातील अपराध क्रमांक ५५७/२५ मध्ये कलम ८(क), २०(ब), २१(), २९ एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हे दाखल आहेत.



आरोपी नागपूर शहरात लपून बसल्याची गुप्त माहिती हिंगणघाट पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने नागपुरात सापळा रचून किराडला शिताफीने ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला हिंगणघाट पोलिस ठाण्यातील अपराध क्रमांक ९९२/२६ अंतर्गत अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक पद्माकर मुंडे, पोलिस हवालदार सुनील मेंढे आणि पोलिस नाईक नरेंद्र आरेकर यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# कराळेंच्या जामिनावर आज फैसला?

## जातीवाचक टिप्पणी प्रकरण; पोलिसांचा अभिप्राय दाखल, तक्रारकर्त्याची बाजूही ऐकणार

**वर्धा जनमाध्यम :** सोशल मीडियावरील व्हिडीओतून एका विशिष्ट समाजाविषयी जातीवाचक टिप्पणी केल्याच्या आरोपात अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ता नितेश कराळे यांच्या जामीन अर्जावर बुधवार, २ सप्टेंबरला सुनावणी होणार आहे. ?ट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्यांना अमरावती येथून अटक केली होती. सध्या कराळे न्यायालयीन कोठडीत आहेत.

शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमरावतीतून कराळे यांना ताब्यात घेतले. न्यायालयात हजर केल्यानंतर त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली. त्यानंतर त्यांच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला. १ सप्टेंबरला होणारी सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून आता २ सप्टेंबरला त्यावर सुनावणी होणार आहे.

दरम्यान, पोलिसांनी जामीन अर्जासंदर्भातील आपला अभिप्राय न्यायालयात सादर केला आहे. बुधवारी तक्रारकर्त्याची बाजूही न्यायालयाकडून जाणून घेतली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कराळेंना जामीन मिळतो की कोठडी कायम राहते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# भूमिपूजन झाले, रस्ता मात्र खड्ड्यात, कानगाव-हिंगणघाट मार्गावर 'विकास' बेपत्ता

## प्रभाताई विचार मंचाचा प्रशासनाला अल्टिमेटम, महिनाभरात काम सुरू न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**हिंगणघाट जनमाध्यम :** कानगाव ते कुटकीमार्गे नांदगाव, हिंगणघाट ते माढळी तसेच हिंगणघाट ते कोरा मार्गे चिमूर या रस्त्यांची दुरवस्था नागरिकांच्या जीवावर उठली आहे. सन २०२२ मध्ये या रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन तत्कालीन पालकमंत्री सुनील केदार यांच्या हस्ते झाले. २०२४ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन असतानाही काम रखडले असून दोनदा मुदतवाढ देऊनही कंत्राटदार कामाला हात लावत नसल्याचा आरोप प्रभाताई विचार मंचाने केला आहे.

रस्त्यावर मोठमोठे खड्डे, चिखल आणि मातीचे साम्राज्य निर्माण झाले असून वाहनचालकांसह पादचाऱ्यांचीही मोठी कसरत होत आहे. अपघातांचे प्रमाण वाढत असून नागरिकांच्या जीविताचा प्रश्न गंभीर बनला आहे. विकासाच्या घोषणा आणि भूमिपूजनाचे फलक दिसतात मात्र प्रत्यक्ष रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्याने लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



आमदारांनीही या प्रश्नाकडे आता गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे, असा टोला मंचाने लगावला. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

महिनाभरात काम सुरू न झाल्यास सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रभाताई विचार मंचचे प्रवीण उपासे यांनी दिला. यावेळी शालिकराव डेहणे, डॉ. खुजे, गुणवता कोठेकार, प्रशांत गहुकार, गजानन बोरेकार, सुरेशराव अराडे, महेंद्र राऊत, प्रवीण धोटे, गजानन जाभूळे, अमित मांडवकर, किशोर धोटे, महेश नागपुरे व विनोद जाधव उपस्थित होते.

# शेतातील चारा जाळणाऱ्या महिलेला दोन वर्षांचा सश्रम कारावास

**देवळी जनमाध्यम :** शेताच्या धुऱ्यावर ठेवलेले इंधन व तुरीचे फन पेटवून नुकसान केल्याप्रकरणी आरोपी महिलेला न्यायालयाने दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती डोईफोडे यांनी हा निकाल दिला.

### १५ हजारांचा दंड; दंड न भरल्यास आणखी तीन महिने साधी कैद

माया सिद्धार्थ मानेकर (५८, रा. काजळसरा, ता. देवळी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात कलम ४३५ भादंवि अंतर्गत तिला दोन वर्षे सश्रम कारावास व १५ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंडाची रक्कम न भरल्यास तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. फिर्यादी रत्नमाला वासुदेवराव बावणकर यांनी बटईने केलेल्या शेताच्या धुऱ्यावर इंधन व तुरीचे फन ठेवले होते. आरोपीने ते पेटवून सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप होता. याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात २०२१ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस हवालदार मनोज नोंदुरकर यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी अभियोक्ता ढुंगे यांनी सरकारतर्फे कामकाज पाहिले. पैरवी अंमलदार सफौ. प्रवीण बोबडे यांनी साक्षीदारांना न्यायालयात हजर केले. ठाणेदार स.पो.नि. नितीन मदनकर यांनीही साक्षीदारांना मार्गदर्शन केले.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा जिल्हा कचेरीवर धडक मोर्चा

## शिवरेतील हल्ल्याचा निषेध, दोषींवर हत्येचा गुन्हा दाखल करून कठोर शिक्षेची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कार्यस्थळी सुरक्षित वातावरण मिळावे यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वर्धा जिल्हा शाखेने मंगळवारी जिल्हा कचेरीवर धडक दिली. जिल्हा परिषद कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मूक मोर्चा काढत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.



शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे १७ ऑगस्टला ग्रामसभेदरम्यान कर्तव्य बजावत असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर अमानुष हल्ला झाला.

हल्ल्यानंतर मानसिक व शारीरिक तणावामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने राज्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शिवरे घटनेतील सर्व आरोपींवर हत्येच्या कलमान्वये गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी. तसेच प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून दोषींना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी, बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या अनाधिकृत व्हिडीओ रेकॉर्डिंगवर बंदी घालावी आणि संवेदनशील ग्रामसभांना प्रशासनाने विनामूल्य पोलिस बंदोबस्त द्यावा, अशीही मागणी आहे. मोर्चाचे नेतृत्व संदीप भोसले, चंद्रकांत वघळे आणि विवेक धवड यांनी केले.

# मतदार यादी पुनरीक्षण कामाचा आढावा घेण्यासाठी मतदार यादी निरीक्षक ४ सप्टेंबरला जिल्ह्यात

**वर्धा जनमाध्यम :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रारुप मतदार यादीवरील दावे व हरकतींच्या कालावधीत मतदार यादीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी नागपूर विभागाच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची मतदार यादी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक ४ सप्टेंबर रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे.




राज्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार नुकतीच दिनांक ३१ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. या यादीवरील आक्षेप व हरकतींच्या कालावधीत मतदार यादी निरीक्षक वर्धा जिल्ह्याला एकूण तीन भेटी देणार आहेत. यापार्श्वभूमीवर पहिली भेट दिनांक ४ सप्टेंबर रोजी देणार असून जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील सभागृह क्र. २ मध्ये दुपारी १२.३० वाजता लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीसाठी वर्धा जिल्ह्यातील विद्यमान लोकप्रतिनिधी तसेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. मतदार यादी पुनरीक्षणाचे काम पारदर्शक आणि अचूक व्हावे या दृष्टीने या बैठकीत महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करून आढावा घेतला जाणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनिल गावीत यांनी कळविले आहे.

# उत्तमराव पाटील यांचे निधन

**आष्टी (शहीद) :** लहान आर्वी येथील ज्येष्ठ काँग्रेस नेते तथा मोर्शी रोडवरील श्रीराम मंदिर देवस्थानचे माजी अध्यक्ष उत्तमराव तुळशिरामजी पाटील यांचे आज सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. गेल्या दोन वर्षांपासून ते आजारी होते.



धार्मिक, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात त्यांचे योगदान राहिले. श्रीराम मंदिर देवस्थानच्या माध्यमातून त्यांनी विविध उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला. काँग्रेसचे गटनेते म्हणूनही त्यांनी संघटनात्मक कार्य केले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, जावई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने लहान आर्वी परिसरात शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पार्थिवावर आज बुधवार रोजी सकाळी ११ वाजता लहान आर्वी येथील भवानी माता मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# परिवाराची साथ, व्यवसायाची भरारी; महिलांच्या सहभागातून उद्योगाला नवी दिशा

## माहेश्वरी मंडळाच्या प्रेरणादायी चर्चासत्रात भगवतीदेवी बल्दवा यांचा यशाचा मंत्र

**वर्धा जनमाध्यम :** कुटुंबातील प्रत्येक सदस्याची साथ आणि महिलांचा सक्रिय सहभाग व्यवसायाला समृद्ध, सक्षम आणि दीर्घकाळ टिकविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन विश्वप्रसिद्ध उद्योजिका तथा एग्जोरियल ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या संस्थापिका भगवतीदेवी बल्दवा यांनी केले. माहेश्वरी मंडळ वर्धाच्या वतीने आयोजित विशेष चर्चासत्रात त्या बोलत होत्या.

बल्दवा म्हणाल्या की, महिलांना केवळ घराच्या चौकटीत न ठेवता व्यवसायाच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. परिवार, नाती आणि करिअर यांचा समतोल साधताना कुटुंबाचा विश्वास आणि सहकार्य हीच महिलांची मोठी ताकद आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी संकल्प आणि निष्ठा कायम ठेवली तर यशाचे शिखर गाठता येते. नवउद्योजकांनी सोशल मीडियावरील प्रत्येक ट्रेंडच्या मागे न धावता दीर्घकालीन गरज, विज्ञान आणि ग्राहकांची मागणी यांचा अभ्यास करावा. भांडवलापेक्षा विश्वासाचे नेटवर्क मोठे असून संबंध केवळ फायद्यासाठी नव्हे तर विश्वासासाठी जोपासावेत, असा सल्लाही त्यांनी दिला.



पुश्तैनी व्यवसायाकडे ओझे म्हणून न पाहता पूर्वजांचा अनुभव आणि नव्या पिढीचे तंत्रज्ञान यांची सांगड घालावी. आगामी काळात आयुर्वेद आणि हर्बल उद्योगाला मोठी संधी असून भारतीय ज्ञान आणि विज्ञान जगभर पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. नोकरी मागणारे नव्हे, नोकरी देणारे बना, हा संदेश देत त्यांनी तरुणांमध्ये उद्योगशीलतेची प्रेरणा निर्माण केली.

मंडळाचे समन्वयक राजकुमार जाजू यांनी भगवतीदेवी बल्दवा यांच्या संघर्षमय प्रवासाची माहिती देताना त्यांच्या 'शून्यापासून शिखरापर्यंत'च्या वाटचालीवर प्रकाश टाकला. हर्बल फार्मा क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती देत भारतीय वनस्पती आणि आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

चर्चासत्राची प्रस्तावना सचिव हरीश गांधी यांनी केली. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकांत गांधी होते. योगिता गोविंद राठी यांनी स्वागत केले, तर श्वेता अमित गांधी यांनी सूत्रसंचालन केले. उपस्थितांच्या प्रश्नांना सीए अभिषेक टावरी व सीए निमेष मुंदडा यांनी समर्पक उत्तरे मिळवून देण्यात भूमिका बजावली. प्रा. किरण उल्हास जाजू यांच्या हस्ते भगवतीदेवी बल्दवा यांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपात प्रा. डॉ. श्रीकांत गांधी यांनी मार्गदर्शन केले.

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# एका क्लिकवर मिळणार आता जमिनीचा 'सर्च रिपोर्ट'

**मुंबई/प्रतिनिधी :** महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार असून यामुळे राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीच्या महाभूमी स्टॅक प्रणालीचा राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याबाबत महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सादरीकरण केले. जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते. या सर्व विखुरलेल्या प्रणालीचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्याच्या महसूल आणि जमीनविषयक सुधारणामधील हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन**

राज्य शासनाने ईज ऑफ लिव्हिंग आणि ईज ऑफ डुईंग बिझनेस धोरण स्वीकारले आहे. महाभूमी स्टॅक प्रणाली या धोरणाच्या अनुषंगानेच आहे. महसूल विभागाने या प्रणालीचा अतिशय प्रभावीपणाने वापर करावा, त्याचबरोबर नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**महाभूमी स्टॅक प्रणालीतील अभिलेखांचे डिजिटल भांडार**

- ३.५ कोटींहून अधिक अधिकार अभिलेख (७/१२ व ८-अ)
- १.५ कोटीहून अधिक भू-नकाशे व मिळकत पत्रिका
- ४० कोटींहून अधिक ऐतिहासिक स्कॅन केलेले फेरफार व जुने अभिलेख
- नोंदणी विभागाचे दस्त क. २ च्या प्रती व महसूल न्यायालयीन प्रकरणांची अद्ययावत स्थिती

**प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य**

ग्रामीण भागासाठी सर्व्हे/गट क्रमांक आणि शहरी भागासाठी सी.टी.एस./सिटी सर्व्हे क्रमांक टाकताच, त्या विशिष्ट भू-खंडाशी संबंधित सर्व माहिती एकत्रित स्वरूपात प्राप्त होणार.

- त्या भू-खंडाचे सध्याचे वापरकर्ते व अधिकार अभिलेख (७/१२)
- त्या भू-खंडावर झालेले मागील सर्व फेरफार
- त्या भू-खंडाशी संबंधित नोंदणीकृत व्यवहार संदर्भ (दस्त क्र. २)
- भूमापन विषयक माहिती, गाव नकाशा व मोजणी तपशील उपलब्ध होणार

**पारदर्शकता व फसवणुकीस आळा**

कोणताही भू-खंड खरेदी-विक्रीपूर्वी नागरिक स्वतः च मोबाईलवर पडताळणी करू शकतात की, त्या भू-खंडाचे सद्य वापरकर्ते कोण आहेत, त्यावर कोणते बोजे आहेत का, कोणती न्यायालयीन प्रगती आहे का. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होईल.

**एकच खिडकी, अनेक सेवा**

७/१२ उतारा, ८-अ उतारा, नकाशा, फेरफार स्थिती, मोजणी अर्ज, दस्त शोध अशा विविध सेवांसाठी वेगवेगळ्या पोर्टलवर आणि कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

**वेळ, श्रम व खर्चाची बचत**

आवश्यक असलेले सर्व भूमी अभिलेख घरबसल्या उपलब्ध होतील. बँक कर्ज किंवा इतर शासकीय योजनांसाठी हेच अभिलेख डिजिटल पद्धतीने सुरक्षितपणे सामायिक करता येतील.

**ग्रामीण व शहरी दोन्ही क्षेत्रांसाठी समान सुविधा**

ग्रामीण नागरिकांना गट क्रमांकाने तर पुणे, मुंबईसारख्या शहरी भागातील नागरिकांना सी.टी.एस. क्रमांकाने त्यांच्या मिळकतीची माहिती सहज शोधता येईल.

**प्रशासन, संस्थांसाठी लाभ**

महसूल प्रशासनास पडताळणी व निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान करता येईल. बँका व वित्तीय संस्थांना कर्ज मंजुरीपूर्वी भू-खंडाच्या वापरकर्त्याची व व्यवहाराची त्वरित खातरजमा करता येईल. उद्योग व गुंतवणूकदारांना भूमी विषयक स्पष्टतेमुळे गुंतवणूक करणे अधिक सुलभ होईल.

## मोदींचा फोटो हटवला;
## अमित ठाकरेंसह 20 ते 25 जणांवर गुन्हा

**पुणे / प्रतिनिधी-** पुण्यातील शिवाजीनगर येथील शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवल्याच्या प्रकरणावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि भाजप यांच्यात वादाची ठिणगी पडली आहे. या प्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या २ पदाधिका-यांना अटक केली आहे. अमित ठाकरे यांच्या महाविद्यालयाच्या पाहणी दौ-यादरम्यान हा प्रकार घडला. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या शेजारी नरेंद्र मोदी यांचा फोटो लावण्यात आल्याचे एका विद्यार्थ्याने अमित ठाकरे यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर अमित ठाकरे यांनी महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांना याबाबत जाब विचारला. काही वेळातच मनसेच्या कार्यकर्त्यांनी मोदींचा फोटो भिंतीवरून खाली उतरवला. या घटनेचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वादाला सुरुवात झाली. फोटो हटवल्याच्या घटनेनंतर चतु:शृंगी पोलिसांनी अमित ठाकरे यांच्यासह मनसेच्या २० ते २५ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील प्रशांत कनोजिया आणि विक्रांत भिलारे या दोन पदाधिका-यांना रात्री उशिरा अटक केली. त्यामुळे आता अमित ठाकरे यांच्यावरही दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे मनसे आणि राज्य सरकारमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमित ठाकरे सोमवारी शिवाजीनगर येथील शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मिळणा-या सुविधा आणि महाविद्यालयातील व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी गेले होते.छत्रपती शिवाजी महाराज आणि डा. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या शेजारी मोदी यांचा फोटो लावण्यात आला असल्याचे विद्यार्थ्याने सांगितले.



## आता आयटीआयमध्येच शिकता येणार ड्रायव्हिंग!
### 165 संस्थांमध्ये सुरू होणार 'ड्रायव्हिंग स्कूल'

**यवतमाळ :** गाड्यांचे पार्ट्स दुरुस्त करायला शिकतानाच आता हाताखाली स्टिअरिंगही पकडता येणार आहे! यवतमाळसह राज्यातील तब्बल १६५ शासकीय आयटीआयमध्ये लवकरच अधिकृत वाहन चालक प्रशिक्षण शाळा सुरू होत आहेत. कौशल्य विकासासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ड्रायव्हिंगचे धडे देउन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे.



**नक्की काय आहे ही संकल्पना?-**तंत्रशिक्षण व कौशल्य विकास विभागाने आयटीआयच्या विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवण्यासाठी हे पाउल उचलले आहे. ज्या संस्थांमध्ये मेकॅनिक मोटार व्हेइकल हा ट्रेड उपलब्ध आहे, तिथे ही ड्रायव्हिंग स्कूल सुरू केली जाईल. ब-याचदा तांत्रिक ज्ञान असूनही ड्रायव्हिंग येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना काहीं नोक-या गमावाव्या लागतात. आता ही अडचण दूर होईल. केवळ आयटीआयचे नियमित विद्यार्थीच नाही, तर बाहेरचे तरुणही अल्प दरात इथे ड्रायव्हिंग शिकू शकतील.

**आरटीओची मान्यता अन् तयारी वेगात**

या उपक्रमासाठी आयटीआय प्रांगणात ड्रायव्हिंग ट्रॅक उभारले जात असून आवश्यक वाहनांची सोय केली जात आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून अधिकृत परवानगी मिळवण्यासाठीची कागदपत्रे आणि अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

**प्रवेश कसा मिळणार?-**आयटीआयच्या अधिकृत केंद्रावर जाउन ड्रायव्हिंग स्कूलचा अर्ज भरावा लागेल. आरटीओच्या नियमांनुसार सुरुवातीला लर्निंग लायसन्ससाठी (शिकाउ परवाना) ऑनलाइन परीक्षा द्यावी लागेल. लायसन्स मिळाल्यावर आयटीआय मधील प्रशिक्षित निदेशकांकडून प्रत्यक्ष ड्रायव्हिंगचे धडे मिळतील. चाचणी पूर्ण झाल्यावर पक्के लायसन्स हातात येईल.

**खासगी ड्रायव्हिंग स्कूल्सचा विरोध!-**शासकीय आयटीआयमध्ये अत्यंत रास्त दरात आणि अधिकृत ड्रायव्हिंग ट्रेनिंग मिळणार असल्याने आपल्या व्यवसायावर कु-हाड पडेल, अशी भीती खासगी ड्रायव्हिंग स्कूल चालकांना वाटू लागली आहे. त्यामुळे त्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवण्यास सुरुवात केली आहे.

यवतमाळ येथील आयटीआयचा प्रस्ताव आमच्याकडे आला असून त्याला लवकरच मंजुरी देण्यात येईल. ड्रायव्हिंग स्कूलसाठी परिवहन नियमानुसार ऑनलाइन अर्ज करावा लागतो. यासाठी दोन्ही बाजूंनी ब्रेक व क्लच असणारी (ड्युअल कंट्रोल) कार आणि नियमानुसार पात्र प्रशिक्षक असणे बंधनकारक आहे, अशी माहिती यवतमाळचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल सूर्यवंशी यांनी दिली.

## सर्वोच्च न्यायालयाने जंतर मंतर आंदोलनाशी संबंधित सर्व एफआयआर रद्द केल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**२० ते २५ जुलै दरम्यान कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांवर नोंदवलेल्या सर्व एफआयआर रद्द करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. गुन्हेगारी रेकार्ड असलेल्या आंदोलकांना या सवलतीचा लाभ मिळणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हा आदेश देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये नोंदवलेल्या प्रकरणांना लागू असेल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर CJP ने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीतील प्रस्तावित निषेध मोर्चा मागे घेतला. केंद्र सरकारचे आश्वासन आणि न्यायालयाच्या निर्णयानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने म्हटले आहे.



- **नवीन एफआयआर नोंदवल्या जाणार नाहीत**
- **CJP 5 सप्टेंबरचा मोर्चा काढणार नाही**

**न्यायालयाने म्हटले- विशेष अधिकार वापरले जेणेकरून दोन्ही पक्ष करारावर सहमत होतील.** सुनावणीदरम्यान, न्यायालयाने सांगितले की, या प्रकरणातील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थिती पाहूनच एफआयआर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, त्यामुळे इतर प्रकरणांसाठी तो एक उदाहरण आणि बंधनकारक निर्णय मानला जाणार नाही. दोन्ही पक्ष न्यायालयासमोर झालेल्या कराराचे पूर्णपणे पालन करतील या अटीवर घटनेच्या कलम १४२ नुसार आपल्या विशेष अधिकाराचा वापर केला जात असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.

**सरकारने सोमवारी अंतरिम अर्ज दाखल केला-**नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेले एफआयआर रद्द करण्याची मागणी करणारा अंतरिम अर्ज सरकारने ३१ ऑगस्ट रोजी दाखल केला.मुख्य खटल्याची/याचिकेची सुनावणी सुरू असताना तात्काळ किंवा तात्पुरता दिलासा मिळवण्यासाठी न्यायालयात दाखल केलेल्या अर्जाला अंतरिम अर्ज म्हणतात. सोमवारी दाखल केलेल्या आपल्या अर्जात सरकारने म्हटले आहे की, २५ जुलैच्या निर्णयानुसार, दिल्ली पोलिसांना कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनाशी संबंधित १३ एफआयआरचा पाठपुरावा करायचा नाही. २० जुलै रोजी दिल्लीत सीजेपीच्या नेतृत्वाखालील मोर्चादरम्यान आंदोलक आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यात संघर्ष झाला. संसदेच्या दिशेने पुढे जाणा-या जमावाला रोखण्यासाठी सुरक्षा कर्मचा-यांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर केला. यानंतर, विद्यार्थी आंदोलन अनेक शहरांमध्ये पसरले. तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही त्यांची मुख्य मागणी होती.हे आंदोलन २० जून रोजी जंतर मंतर येथे सुरू झाले. प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आणि सरकारने इतर मागण्या मान्य केल्यावर २५ जुलै रोजी हे आंदोलन मागे घेण्यात आले होते.

## डीलर्सला 2 हजार क्विंटल साखर साठा ठेवण्याची मुभा

**नवी दिल्ली/मुंबई :** देशात साखर लवकरच स्वस्त होउ शकते. केंद्र सरकारने साठेबाजी रोखण्यासाठी आणि सणांपूर्वी किमती नियंत्रणात आणण्यासाठी साखर व्यापा-यांसाठी साठा मर्यादा कमी करण्याची घोषणा केली आहे. खाद्य मंत्रालयाच्या नवीन आदेशानुसार, १५ सप्टेंबरपासून साखर व्यापारी आणि डीलर्स जास्तीत जास्त २,००० क्विंटल साठा ठेवू शकतील. हा नवीन नियम ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत देशभरात लागू राहील. दरम्यान नवीन नियमांनुसार, डीलर्सना आता साठा मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा जास्त काळ साखर ठेवण्याची परवानगी नसेल. याव्यतिरिक्त, ते देशात कोणत्याही ठिकाणी एका वेळी २००० क्विंटलपेक्षा जास्त साखर ठेवू शकणार नाहीत. साठेबाजी आणि सट्टेबाजीला आळा घालणे हा सरकारचा मुख्य उद्देश आहे, जेणेकरून बाजारात पुरवठा सुरळीत राहील आणि सामान्य ग्राहकांना योग्य दरात साखर उपलब्ध होईल. कोलकातासाठी जुनी ४००० क्विंटलची साठा मर्यादा कायम राहील. खरं तर, कोलकातामध्ये उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातून साखर येते आणि येथूनच पश्चिम बंगालसह संपूर्ण ईशान्य भारतात पुरवठा होतो. पुरवठा साखळीत कोणताही अडथळा येउ नये, यासाठी या क्षेत्रांना दिलासा देण्यात आला आहे.

**यापूर्वी होती ४ हजार क्विंटलची मर्यादा-**यापूर्वी सरकारने १ ऑगस्टपासून देशभरातील साखर व्यापा-यांसाठी ४००० क्विंटलची साठा मर्यादा लागू केली होती. परंतु बाजारात चुकीच्या पद्धतीने साठा जमा केल्याच्या तक्रारींनंतर सरकारने ती कमी करून निम्मी केली आहे. सरकार साखर कारखाने, व्यापारी आणि व्यापा-यांच्या गोदामांवर कठोर नजर ठेवत आहे आणि प्रत्यक्ष पडताळणी करत आहे, जिथे अनेक अनियमितता आणि अघोषित साठा पकडला गेला आहे.

**साखर २०% पर्यंत स्वस्त झाली-** सरकारच्या कठोर कारवाईमुळे आणि बाजारात पुरवठा सुधारल्यामुळे साखरेच्या घाउक (एक्स-मिल) किमती सुमारे २०% नी कमी झाल्या आहेत. यामुळे किरकोळ बाजारातही साखरेचे दर कमी होउ लागले आहेत. येत्या काही दिवसांत सामान्य जनतेला स्वस्त साखर मिळेल.

**वितरकांसाठी नवे निर्बंध आणि मर्यादा**

उत्पादनासाठी किंवा कच्चा माल म्हणून दरमहा १० मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखर वापरणा-या मोठ्या ग्राहकांना १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा साठा ठेवता येणार नाही.

## भारत-चीन सोबत मिळून पुतिन यांना बनवायचीय 'बँक'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** किर्गिझस्तानमधील बिश्केक येथे झालेल्या एससीओ शिखर परिषदेत बोलताना पुतिन म्हणाले की, प्रस्तावित एससीओ विकास बँक ही आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये एकतर्फी फायदा मिळवण्यासाठी आर्थिक साधनांचा वापर करणा-या देशांच्या वित्तीय प्रणालींपासून शक्य तितकी स्वतंत्र असावी असं त्यांनी म्हटलं. हा प्रस्ताव अशा वेळी आला आहे, जेव्हा रशिया आणि इराण कठोर पाश्चात्य निर्बंधांचा सामना करत आहेत. मॉस्को अमेरिकन डॉलर आणि पाश्चात्य नियंत्रित आर्थिक पायाभूत सुविधांवरील आपले अवलंबित्व कमी करू पाहत आहे.

**SCO विकास बँक म्हणजे कशी असेल?-** ही विकास बँक एक आर्थिक संस्था असेल, जी उर्जा, वाहतूक आणि इतर सीमापार गुंतवणुकीसारख्या दीर्घकालीन आर्थिक आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधी पुरवेल. एससीओसाठी प्रस्तावित बँक सदस्य राष्ट्रांमधील प्रकल्पांसाठी निधीचा एक सामान्य स्रोत म्हणून काम करू शकते आणि गटांतर्गत आर्थिक संबंध अधिक दृढ करू शकते. एससीओ बिझनेस कौन्सिल आणि इंटरबँक असोसिएशनने हाती घेतलेल्या प्रकल्पांप्रमाणेच ही संस्था संयुक्त, परस्पर फायदेशीर आर्थिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावू शकते असं पुतिन यांनी म्हटले आहे.



**SCO देशांसोबतच्या रशियाच्या व्यवहारांचा तपशील**

हा प्रस्ताव एससीओ सदस्य राष्ट्रांमधील आर्थिक आणि व्यावसायिक संबंध मजबूत करण्याच्या मोठ्या प्रयत्नांचा एक भाग आहे. युक्रेनवरील आक्रमणानंतर मास्कोवर निर्बंध लादल्यापासून रशियाने अमेरिकन डालर आणि पाश्चात्य वित्तीय प्रणालीवरील आपले अवलंबित्व कमी करण्याबद्दल आवाज उठवला आहे. गेल्या वर्षी एससीओ देशांसोबत रशियाची व्यापार उलाढाल ४०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होती. एससीओ सदस्य राष्ट्रांसोबतचे रशियाचे ९८% पेक्षा जास्त व्यवहार राष्ट्रीय चलनांमध्ये झाले असं पुतिन यांनी सांगितले. २००१ मध्ये रशिया, चीन, कझाकिस्तान, किर्गिझस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान यांनी स्थापना केल्यापासून एससीओ (SCO) मध्ये बरीच वाढ झालेली आहे. २०१७ मध्ये भारत आणि पाकिस्तान या संघटनेत सामील झाले तर इराण २०२३ मध्ये पूर्ण सदस्य बनला. ही संघटना येणा-या काळात जगातील एक वाढत्या प्रभावाचे केंद्र असेल. या संघटनेच्या सदस्यांनी व्यापारी संबंध अधिक दृढ करत राहिले पाहिजे, ज्यामुळे संपूर्ण प्रदेशात आर्थिक विकास आणि सार्वजनिक कल्याणाला चालना मिळेल असं आवाहन रशियाने केले.

**चीन-भारताची भूमिका काय?**

चीनने एससीओ अंतर्गत जास्त आर्थिक सहकार्यालाही पाठिंबा दिला आहे. परंतु या प्रस्तावाचे एका कार्यरत बँकेत रूपांतर करण्यात आव्हाने येउ शकतात. सदस्य राष्ट्रे पाश्चात्य वित्तीय प्रणालींच्या बाहेर काम करण्यासाठी तयार केलेली संस्था वापरण्यास तयार असतील का? असा प्रश्न आहे. तर एससीओ रशिया आणि इतर युरेशियन देशांशी आर्थिक संबंध दृढ करत असला तरी तो स्पष्टपणे पाश्चिमात्य विरोधी गट बनू नये. प्रस्तावित बँकेचा उद्देश एससीओला पाश्चात्य वित्तीय प्रणालीपासून पूर्णपणे वेगळे करणे हा नसावा, तर त्याऐवजी एक अतिरिक्त वित्तीय मार्ग तयार करणे हा असावा. ज्यामुळे सदस्य देशांना व्यापार आणि प्रकल्प वित्तपुरवठ्यासाठी अधिक संधी उपलब्ध होतील अशी भूमिका भारताने घेतली आहे.

## एसआरपीएफ जवानाने स्वतःवरच झाडून घेतली गोळी, मृत्यूशी झुंज सुरू

**बुलढाणा :** जेमतेम दीड वर्षापूर्वी राज्य राखीव पोलीस दलात निवड झाल्यावर त्याच्या सह परिवाराच्या आनंदाला पारावर उरला नाही. जन्माचे सार्थक झाल्याची भावना कुटुंबात निर्माण झाली. त्याचे गावातील मित्र मंडळी, गावकरी देखील आनंदित झाले होते. मात्र जेमतेम दीड वर्षात हे आनंददायी चित्र बदलले आणि त्याच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला, गावावर शोक कळा पसरली. त्याचा परिवार आणि संपूर्ण गाव दुःखाच्या सागरात बुडाले.



**गुंज गावाची शोकांतिका-** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात असलेल्या गुंज गावच्या २४ वर्षीय एसआरपीएफ जवानाने कर्तव्यावर असतानाच स्वतःवर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही धक्कादायक घटना मंगळवारी, १ सप्टेंबर रोजी सकाळी जालना येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या कॅम्पमध्ये घडली. या घटनेमुळे एसआरपीएफ कॅम्पसह जवानाच्या मूळ गाव गुंज (तालुका सिंदखेड राजा) येथे एकच खळबळ उडाली आहे. अजय माधवराव वाकोडे (वय २४, रा. गुंज, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा) असे गंभीर जखमी जवानाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजय सोमवारी रात्री जालना एसआरपीएफ कॅम्पमध्ये कर्तव्यावर होता. मंगळवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास त्याने कॅम्पमध्येच एसएलआर बंदुकीतून स्वतःवर गोळी झाडली. गोळी मानेत लागल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. गोळीचा आवाज ऐकताच कॅम्पमधील सहकारी जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अजयला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तिथे तो मृत्यूशी झुंज देत असल्याचे वृत्त आहे. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी कॅम्पमध्ये धाव घेत एसएलआर बंदूक ताब्यात घेतली. घटनास्थळाची परिस्थिती, शस्त्राचा वापर आणि अजयच्या सहका-यांचे जबाब घेण्यात आल्याचे समजते. अजय वाकोडे हा सुमारे दीड वर्षापूर्वीच एसआरपीएफमध्ये भरती झाला होता. तरुण वयात वयात नोकरी मिळाली असताना त्याने आत्मघातासारखे टोकाचे पाउल का उचलले? त्याच्यावर कोणता ताण होता? घटनेपूर्वी नेमके काय घडले? असे एक ना अनेक अनेक प्रश्न आता ऐरणीवर आले आहे नेमके कारण अद्याप उघड झाले नाही.

## नवी मुंबईत एक्सपायरी डेट बदलणा-या रॅकेटचा पर्दाफाश

**नवी मुंबई :** मुदत संपलेले खाद्यपदार्थ फेकून न देता, त्यांच्यावर नवीन तारखा छापून ते बाजारात विकणा-या एका मोठ्या रॅकेटचा अन्न व औषध प्रशासनाने आणि नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. तुर्भे परिसरातील एका गोदामावर टाकलेल्या छाप्यात तब्बल ७६ लाख रुपयांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.या कारवाईत दररोजच्या वापरातील अनेक लोकप्रिय खाद्यपदार्थांचा साठा सापडला आहे. यात नामांकित कंपन्यांचे वेफर्स, पोटॅटो चिप्स, नूडल्स, सूप, मायोनिज चे पॅकेट्स आणि नामांकित ब्रँड्सच्या शीतपेयांच्या कॅन्सचा समावेश आहे. हा सर्व माल ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळणारा होताकारवाईदरम्यान अधिका-यांना या ठिकाणी अतिशय धक्कादायक प्रकार पाहायला मिळाला. खाद्यपदार्थांच्या पॅकेटवरील मूळ उत्पादन तारीख आणि मुदत संपण्याची तारीख केमिकलच्या साहाय्याने पुसून टाकली जायची. त्यानंतर त्यावर नवीन तारखा छापून किंवा मूळ माहितीवर नवीन स्टिकर्स लावून मुदत संपलेला माल पुन्हा बाजारात विक्रीसाठी तयार केला जात होता.एफडीए आणि नवी मुंबई गुन्हे शाखेने २४ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट या काळात ही संयुक्त मोहीम राबवली. तुर्भे येथील मेसर्स साधना एंटरप्रायझेस या ठिकाणी हा बेकायदेशीर धंदा सुरू होता. मुंबई, नवी दिल्ली आणि नोएडा येथील सुमारे १० प्रमुख निर्यातदार कंपन्यांशी संबंधित उत्पादनांचे लेबल्स बदलण्याचे आणि रिपॅकिंगचे काम येथे चालू होते. या छाप्यात प्रशासनाने ७५ लाख २१ हजार २६९ रुपये किमतीचे ४,९४२ कार्टून्स (खोके) जप्त केले आहेत. याशिवाय, १ लाख ३० हजार ६०० रुपयांचा विनालेबलचा आणि मुदत संपलेला मालही हस्तगत केला आहे. आवश्यक एफएसएसएआय परवाना आणि खरेदीची बिले नसल्यामुळे काही उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तसेच या पेढीचा अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला आहे.



## डिझेलवरील सेस आणि विंडफॉल टॅक्समध्ये मोठी कपात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यात शुल्कात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. १ सप्टेंबरपासून लागू झालेल्या नवीन आदेशानुसार, डिझेल निर्यातीवरील निर्यात शुल्क प्रति लिटर ३ रुपयांवरून फक्त १ रुपया प्रति लिटर करण्यात आले आहे. डिझेल निर्यातीवरील विंडफाल टॅक्स देखील प्रति लिटर २४ रुपयांवरून १९ रुपये प्रति लिटरपर्यंत कमी करण्यात आला आहे.




सरकारच्या या निर्णयामुळे पेट्रोलियम उत्पादनांची निर्यात करणा-या कंपन्यांना दिलासा मिळत असल्याचे मानले जात आहे. निर्यात शुल्क आणि विंडफ?ल टॅक्समधील कपातीमुळे निर्यात करणा-या कंपन्यांवरील कराचा बोजा कमी होउ शकतो आणि त्यांच्या व्यवसायाचा खर्च व नफ्यावर सकारात्मक परिणाम होउ शकतो.एका सरकारी आदेशानुसार, पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीवरील शुल्क रचनेतील हा बदल १ सप्टेंबरपासून लागू झाला आहे. डिझेलवरील निर्यात शुल्क प्रति लिटर २ रुपयाने कमी करण्यात आले आहे. विंडफाल टॅक्समध्येही प्रति लिटर ५ रुपयाने कपात करण्यात आली आहे. दोन्ही शुल्कांचा विचार केल्यास, डिझेल निर्यातीवरील एकूण भार पूर्वीपेक्षा प्रति लिटर ७ रुपयाने कमी झाला आहे. याचा अर्थ असा नाही की देशांतर्गत बाजारात डिझेलची किंमतही प्रति लिटर ७ रुपयाने कमी होईल. निर्यात शुल्क प्रामुख्याने परदेशात पाठवल्या जाणा-या पेट्रोलियम उत्पादनांवर लागू होते, तर देशांतर्गत डिझेलची किंमत कच्च्या तेलाच्या किमती, शुद्धीकरण खर्च, कर आणि इतर अनेक घटकांवरून ठरवली जाते. जेव्हा बाजारातील असामान्य परिस्थितीमुळे एखादे क्षेत्र किंवा कंपनी सामान्यपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त नफा मिळवेल अशी अपेक्षा असते, तेव्हा सरकारकडून विंडफाल कर लादला जातो. पेट्रोलियम क्षेत्रात, जेव्हा आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये चढ-उतार होतो आणि रिफायनिंग मार्जिन वाढते, तेव्हा सरकार अशा अतिरिक्त करांच्या माध्यमातून या असामान्य नफ्याचा काही भाग वसूल करते. भारताने जुलै २०२२ मध्ये पेट्रोलियम उत्पादनांवर पहिल्यांदा विंडफाल कर लादला होता. नंतर तो रद्द करण्यात आला, परंतु जागतिक तेल बाजारातील मोठ्या उलथापालथीनंतर मार्च २०२६ मध्ये तो पुन्हा लागू करण्यात आला.

## नागपुरात महिंद्राचा सर्वात मोठा प्रकल्प

**नागपूर :** विदर्भाच्या औद्योगिक क्षेत्रासाठी महत्त्वाचा ठरणारा महिंद्रा अँड महिंद्राचा मोठा प्रकल्प नागपुरात आकार घेण्याच्या दिशेने आणखी एक पाउल पुढे पडले आहे. अतिरिक्त बुटीबोरी येथे प्रस्तावित १,५०० एकरवरील वाहन आणि ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे ८०० एकर जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया पुढे सरकली आहे. पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर येथे वर्षाला किती वाहने तयार होणार आणि रोजगारासाठी कोणाला संधी मिळणार, याकडे आता लक्ष लागले आहे. महिंद्राचा हा हरितक्षेत्र प्रकल्प अतिरिक्त बुटीबोरीतील सुमारे १,५०० एकर जागेवर विकसित केला जाणार आहे. कंपनीच्या माहितीनुसार, हा देशातील महिंद्राचा सर्वात मोठा सर्वसमावेशक वाहन आणि ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्प असेल. पहिल्या टप्प्यात सुमारे ८०० एकर जमीन ताब्यात घेण्याच्या दिशेने कंपनीची प्रक्रिया सुरू आहे. प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर येथे दरवर्षी ५ लाख वाहने आणि १ लाख ट्रॅक्टर, अशी एकूण सहा लाख वाहनांची उत्पादन क्षमता असेल. विविध प्रकारच्या उर्जास्रोतांवर चालणारी तसेच भविष्यातील तंत्रज्ञानावर आधारित वाहने येथे तयार करण्याचे नियोजन आहे.



# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## साखर अहवाल

साखर 'गोड' असली तरी तिचे अर्थकारण कायमच 'कडू' राहिले आहे. कधी ऊस उत्पादकाला भाव मिळत नाही, कधी कारखाने आर्थिक अडचणीत येतात तर कधी ग्राहकाला किलोभर साखरेसाठी खिसा अधिक रिकामा करावा लागतो. यंदा सणासुदीच्या तोंडावर याच अर्थकारणाची झळ सर्वसामान्यांना बसण्याची शक्यता निर्माण झाली होती. कारण, साखरेच्या भावातील अनपेक्षित वाढ. २० जुलैला देशातील साखरेचा सरासरी किरकोळ दर ४८.१८ रुपये प्रतिकिलो होता. २० ऑगस्टला तो ५५.७० तर ३० ऑगस्टला ६४.२४ रुपयांवर पोहोचला. सरकारी उपाययोजना सुरू होऊनही त्यांचा संपूर्ण लाभ ग्राहकापर्यंत पोहोचलाच नव्हता. भाववाढीचे प्रमुख कारण अपुरा पुरवठा हे असते; परंतु देशात साखरेची प्रत्यक्ष टंचाई नसल्याचे केंद्र सरकारने वारंवार सांगितले. तरीही साखरेच्या भावांनी उसळी खाल्ली. त्यामुळे उत्पादन किती आहे, यापेक्षा उपलब्ध साखर बाजारात किती प्रमाणात आणि किती वेगाने पोहोचते, हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. त्यानुसार सरकारने कारखान्यांतील साखरसाठ्यांची प्रत्यक्ष तपासणी केली.काही कारखान्यांकडे मासिक अहवालात घोषित प्रमाणापेक्षा अधिक साठा आढळला. काही कारखान्यांनी मंजूर मासिक कोट्यापेक्षा कमी साखर विकली. त्यामुळे सरकारने साखर विक्रीच्या जुन्या व्यवस्थेलाच हात घातला. आतापर्यंत कारखान्यांना महिन्याचा विक्री कोटा एकाच वेळी दिला जायचा. यात महिन्याच्या सुरुवातीला कागदोपत्री विकलेली साखर प्रत्यक्षात महिनाअखेरीपर्यंत कारखान्यात पडून असायची. व्यवहार झाला; पण साखर बाजारात आलीच नाही. कागदावर साखर विकली गेली. त्यातून कृत्रिम टंचाई निर्माण होऊ शकते. म्हणूनच सप्टेंबरपासून मासिक कोट्याऐवजी पंधरवड्याचा कोटा लागू केला आहे. १ ते १५ सप्टेंबर या १५ दिवसांसाठी सरकारने १३ लाख टन साखरेचा देशांतर्गत विक्री कोटा निश्चित केला आहे. ऑगस्टचा संपूर्ण महिन्याचा कोटा २२.५० लाख टन होता. त्या तुलनेत सप्टेंबरच्या पहिल्या १५ दिवसांसाठीच १३ लाख टन उपलब्ध करून देण्याचा निर्णय सणासुदीतील पुरवठ्याबाबत सरकार किती सावध आहे, हे दर्शवितो.यातील किमान ४० टक्के साखर पहिल्याच आठवड्यात विकावी लागेल. उर्वरित साखर पुढील आठवड्यात विकावी लागेल. विकलेली साखर व्यवहार झाल्यापासून सात दिवसांत कारखान्यातून प्रत्यक्ष रवाना करणे बंधनकारक आहे. विक्रीनंतरही साखर कारखान्यातच पडून, या प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न आहे. हा साधा प्रशासकीय फेरबदल नाही. साखर बाजारातील सरकारच्या हस्तक्षेपाचे स्वरूपच बदलत आहे. महिन्याचा कोटा दिल्यानंतर बाजाराकडे पाहत बसण्याऐवजी आता दर १५ दिवसांनी मागणी, पुरवठा आणि भावांचा आढावा घेणे शक्य होईल. गरज पडल्यास अतिरिक्त कोटा बाजारात आणता येईल. याद्वारे साखरेच्या पुरवठ्यावर 'रिअल टाईम?' नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न आहे. सणासुदीत सट्टेबाज किंवा साठेबाजांनी कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तर अतिरिक्त साखर विक्रीस खुली करून भाववाढीला उत्तर देता येईल. या कठोर पावलांची गरज का निर्माण झाली? केंद्र सरकारने १ ऑगस्टपासून साखर व्यापाऱ्यांसाठी ४०० टनांची साठा मर्यादा लागू केली असून ती ३० नोव्हेंबरपर्यंत आहे.व्यापाऱ्यांना आपला साठा दर आठवड्याला सरकारी पोर्टलवर जाहीर करावा लागतो. १ सप्टेंबरपासून मोठ्या औद्योगिक ग्राहकांनाही त्यांच्या १५ दिवसांच्या गरजेपेक्षा अधिक साखर साठवता येणार नाही. या निर्णयामागे साठेबाजी, सट्टेबाजीचे व्यवहार आणि प्रत्यक्ष मालाची हालचाल न करता होणाऱ्या कागदी व्यवहारांमुळे बाजारात कृत्रिम टंचाईची भावना निर्माण होत असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. याचा परिणाम दिसत आहे. गेल्या ८-१० दिवसांत उच्चांकी पातळीपासून कारखाना पातळीवरील साखरेचे भाव २० टक्क्यांनी खाली आले. किरकोळ भावही खाली येत आहेत. अर्थात, कारखान्याच्या दरातील घसरण आणि किरकोळ दुकानातील दरातील घसरण एकाच दिवशी होत नाही. वाहतूक, घाऊक व्यापार आणि आधीचे चढ्या दराचे साठे यामुळे त्यात काही काळ जातो. आता सरकारची खरी कसोटी साठीच्या पुढे गेलेली साखर ग्राहकाला किती लवकर आणि किती स्वस्त मिळते, ही असेल. दर नियंत्रणासाठी सरकारने आणखी एक अस्त्र वापरले ते म्हणजे १० लाख टन कच्च्या साखरेची शुल्कमुक्त आयात. ३१ ऑक्टोबरपर्यंत ती करता येणार आहे. १० वर्षांनंतर भारताने साखर आयातीचा मार्ग अवलंबला. मात्र, आयातीची घोषणा होताच देशांतर्गत कारखाना दर २० टक्क्यांनी कोसळल्याने प्रत्यक्ष आयात पाच लाख टनच राहू शकते यंदा साखर उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी आहे. २०२५-२६ हंगामाच्या अखेरीस सुमारे ३९ लाख टन साठा राहण्याचा अंदाज असून तो गतवर्षापेक्षा २५ टक्क्यांनी कमी आहे. १० लाख टन आयात पूर्ण झाली तर साठा ४० लाख टनांपर्यंत जाऊन देशांतर्गत खपासाठी उपलब्ध साठ्याचे संरक्षण २ महिन्यांपर्यंत वाढू शकते. म्हणूनच सध्याची दरवाढ साठेबाजीमुळे झाली, असे मानणे एकांगी ठरेल. उत्पादन कमी, सणापूर्वी मागणीत वाढ, उसाला हवामानाचा फटका, जागतिक बाजारातील पुरवठ्याची स्थिती आणि काही घटकांकडून साठेबाजी व सट्टेबाजी या सर्वांचा परिणाम झाल्याचे केंद्र सरकारने मान्य केले. साखर दरवाढीला इथेनॉलकडे वळविलेल्या उसाला जबाबदार धरण्याचे सरकारने नाकारले. २०२२-२३ मध्ये एकूण साखर उपलब्धतेपैकी १२ टक्के साखर-समतुल्य उत्पादन इथेनॉलकडे वळविले होते; २०२५-२६ मध्ये हे प्रमाण ९ टक्के आहे.देशात उत्पादित इथेनॉलपैकी तीनचतुर्थांश इथेनॉल धान्यापासून, विशेषतः मक्यापासून बनते. त्यामुळे सध्याची दरवाढ फक्त इथेनॉलचा परिणाम नाही. या व्यवस्थेच्या दुसऱ्या टोकाला ऊस उत्पादक आहे. ग्राहकाला स्वस्त साखर मिळाली पाहिजे म्हणून कारखान्यांचे भाव दबावाखाली ठेवणे आणि त्यातून शेतकऱ्यांची ऊस बिले रखडणे, हा उपाय असू शकत नाही. साखर उद्योगाला आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य भाव, शेतकऱ्याला उसाचा रास्त मोबदला आणि ग्राहकाला परवडणारी साखर या तिन्हींचा समतोल साधणे हेच सरकारचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. सरकारनेही ग्राहकांचे हित जपतानाच शेतकऱ्यांची देणी वेळेत मिळण्याची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. तातडीच्या दृष्टीने पुढील २ महिने निर्णायक आहेत. कर्नाटक आणि महाराष्ट्रातील कारखान्यांतून सप्टेंबरमध्ये सुमारे २ लाख टन अतिरिक्त साखर मिळू शकते. नवा गळीत हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू होऊ शकतो. ऑक्टोबरमध्ये नेहमीच्या ३ ते ४ लाख टनांऐवजी १० लाख टनांहून अधिक, तर नोव्हेंबरमध्ये सुमारे ४५ लाख टन साखर उत्पादन होण्याचा सरकारी अंदाज आहे. ही साखर वेळेत बाजारात आली तर दिवाळी आणि त्यानंतर पुरवठ्यावरील दबाव लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

# शेतीत महिलांचे योगदान मोठे, तरीही हक्कांपासून वंचित!

संयुक्त राष्ट्र संघाने महिलांचे कृषी आणि बागायती क्षेत्रातील योगदान अधोरेखित करण्यासाठी तसेच लैंगिक असमानता दूर करण्याच्या उद्देशाने २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्याचे घोषित केले आहे. हा निर्णय केवळ महिलांच्या कष्टांची दखल घेणारा नाही, तर शेतीच्या संपूर्ण व्यवस्थेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची संधीही देणारा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ४८.४ टक्के आहे. मात्र, शेती आणि बागायती क्षेत्रातील त्यांचा सहभाग यापेक्षा कितीतरी अधिक आहे.

ग्रामीण महिला घरातील जबाबदाऱ्या सांभाळत शेतीच्या कामात मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. बागायतीशी संबंधित कामांमध्ये त्यांचा सहभाग सुमारे ७९ टक्के, तर शेतीतील कामांमध्ये जवळपास ७५ टक्के असल्याचे विविध आकडेवारीतून दिसून येते. तरीही 'शेतकरी' म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर प्रामुख्याने पुरुषाचेच चित्र उभे राहते. शेतात राबणारी, पिकांची निगा राखणारी आणि घराचा संसारही सांभाळणारी महिला मात्र 'शेतकरी' या ओळखीपासून दूर राहते. हीच आपल्या कृषी व्यवस्थेतील मोठी विसंगती आहे.

उदारीकरण, खासगीकरण आणि औद्योगिकीकरणानंतर ग्रामीण भागातून पुरुषांचे शहरांकडे स्थलांतर वाढले. परिणामी, शेतीची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर महिलांच्या खांद्यावर आली. घर, मुलांचे संगोपन आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडतानाच त्या शेतीतही मेहनत करू लागल्या. आज शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाले असले, तरी भात लागवड, पेरणी, खुरपणी, कापणी, मळणी, साठवणूक, प्रक्रिया आणि चारा उत्पादन यांसारख्या श्रमप्रधान कामांमध्ये महिलांचा सहभाग मोठा आहे.

पशुपालन, मत्स्यपालन आणि बागायती क्षेत्रातही महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. २०२३-२४ च्या श्रमशक्ती सर्वेक्षणानुसार, ग्रामीण भागातील प्रत्येक तीन महिलांपैकी सुमारे दोन महिला कृषी समुदायाशी संबंधित आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांत तर जवळपास ८० टक्के महिला शेतीशी निगडित असल्याचे दिसून येते. लोकसभेत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, महिला कृषी कामगारांची संख्या वाढत असताना पुरुष कृषी कामगारांच्या संख्येत घट होत आहे.

शेतीतील एवढ्या मोठ्या योगदानानंतरही महिलांचे नाव महसूल अभिलेखांमध्ये शेतकरी म्हणून नसणे ही गंभीर बाब आहे.

**'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' साजरे करताना केवळ आकर्षक घोषणा करून भागणार नाही. महिलांना केवळ मजूर म्हणून नव्हे, तर शेतीच्या निर्णय प्रक्रियेतील सक्षम भागीदार म्हणून मान्यता द्यावी लागेल.**

२०११ च्या जनगणनेनुसार देशात सुमारे ३.६ कोटी महिला शेतकरी आणि ६.१५ कोटी महिला कृषी कामगार आहेत. मात्र, कृषियोग्य जमीन आणि महसूल अभिलेखांमध्ये नोंद असलेल्या महिला शेतकऱ्यांचे प्रमाण केवळ सुमारे १४ टक्के आहे. महिला कृषी कामगारांच्या बाबतीत ही नोंद तर सुमारे दोन टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहे. याचा थेट परिणाम महिलांच्या हक्कांवर होतो.

जमिनीची मालकी त्यांच्या नावावर नसल्याने अनेक सरकारी योजना, संस्थात्मक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड आणि कृषी अनुदान मिळवताना त्यांना अडचणी येतात. पंजाबसारख्या कृषीप्रधान आणि तुलनेने समृद्ध राज्यातही महिलांच्या नावावर कृषियोग्य जमीन असण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून दिसते. म्हणूनच प्रश्न केवळ महिलांनी शेतीत किती काम केले याचा नाही; त्या शेतीवर त्यांचा कायदेशीर आणि आर्थिक अधिकार किती आहे, हा खरा प्रश्न आहे.

महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न भारतापुरता मर्यादित नाही. जगभरातील कृषी क्षेत्रात महिलांचे मोठे योगदान असूनही जमिनीच्या मालकीमध्ये त्यांना समान स्थान मिळालेले नाही. विकसनशील देशांमध्ये मोठा लोकसंख्या वर्ग शेतीशी संबंधित असताना जमिनीच्या मालकीमध्ये महिलांचा वाटा अत्यल्प आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील लैंगिक असमानता ही जागतिक समस्या झाली आहे. भारतातही खसरा, खतौनी किंवा इतर महसूल अभिलेखांमध्ये महिलांचे नाव नसल्यामुळे त्यांना कृषी क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत अपेक्षित स्थान मिळत नाही. परिणामी, उत्पादन, कर्ज, बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांशी संबंधित निर्णयांमध्ये त्यांचा आवाज दुबळा राहतो.

शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कृषी यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र, महिलांच्या शारीरिक क्षमता, कामाची पद्धत आणि गरजा लक्षात घेऊन तयार केलेली कृषी उपकरणे अद्याप पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. महिलांसाठी सुलभ, सुरक्षित,



कमी श्रमात अधिक काम करणारी आणि परवडणारी कृषी यंत्रे विकसित करण्याची गरज आहे.

कृषी संशोधन संस्थांनी यासाठी स्वतंत्रपणे संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देणे आवश्यक आहे. महिलांच्या कृषी योगदानाकडे पाहताना त्यांच्या अवैतनिक घरगुती श्रमांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आवधिक श्रमशक्ती सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, स्वयंपाक, मुलांचे संगोपन आणि इतर घरगुती कामांमध्ये महिला पुरुषांच्या तुलनेत अडीच पटीहून अधिक वेळ खर्च करतात. या दुहेरी जबाबदारीमुळे महिलांना बाजारपेठेशी जोडलेल्या, अधिक उत्पन्न देणाऱ्या आणि मूल्यवर्धित कृषी कामांमध्ये सहभागी होण्यासाठी कमी वेळ मिळतो. त्यामुळे शेतीच्या मूल्यसाखळीत उत्पादनाच्या पुढील टप्प्यांमध्ये- प्रक्रिया, ब्रँडिंग, विक्री आणि बाजारपेठ- महिलांचा सहभाग मर्यादित राहतो.

भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ समानतेचा अधिकार देतो. त्यामुळे समान कामासाठी महिलांना समान वेतन मिळणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्ष कृषी मजुरीच्या क्षेत्रात महिलांना अनेकदा पुरुषांपेक्षा कमी मोबदला मिळतो. त्याचप्रमाणे अनुच्छेद २१ सन्मानाने जगण्याचा अधिकार देतो. कृषी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असंघटित असल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर आहे. कार्यस्थळी लैंगिक छळापासून संरक्षण देणाऱ्या २०१३ च्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ग्रामीण आणि असंघटित कृषी क्षेत्रात अनेकदा दिसून येत नाही. यामुळे शेतात काम करणाऱ्या महिलांना लैंगिक छळ, हिंसाचार आणि शोषणाला सामोरे जावे लागू शकते. न्याय मिळवण्यासाठी त्यांना अनेक अडथळे पार करावे लागतात. त्यामुळे कायद्याने दिलेले समानता आणि सन्मानाचे अधिकार प्रत्यक्ष जीवनात पोहोचणे अत्यावश्यक आहे.

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषदेने १९९६ मध्ये भुवनेश्वर येथे केंद्रीय महिला कृषी संस्था स्थापन केली. महिलांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी तंत्रज्ञान विकसित करणे आणि त्यांच्या उपजीविकेशी संबंधित संशोधन करणे हा त्यामागील महत्त्वाचा उद्देश आहे. स्वयं-सहायता बचत गटांनी ग्रामीण महिलांच्या आर्थिक सहभागाला मोठी चालना दिली आहे.

'नमो ड्रोन दीदी' योजनेमुळे महिला आधुनिक कृषी तंत्रज्ञानाशी जोडल्या जात आहेत, तर 'लखपती दीदी' उपक्रमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, नाबार्ड आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिझनेस सेंटर' योजनेतून महिला कृषी उद्योजकतेला संधी मिळत आहे. कृषी पायाभूत सुविधा निधीसह इतर योजनाही कार्यरत आहेत. मात्र, योजनांची संख्या वाढण्याबरोबरच त्यांचा लाभ प्रत्यक्ष महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो आहे का, याचे मूल्यमापन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

महिला रात्रंदिवस शेतात राबत असतील, तर त्यांना 'शेतकरी' म्हणून अधिकृत ओळखही मिळायला हवी. जमिनीचा मालकी हक्क, महसूल अभिलेखातील नोंद, संस्थात्मक कर्ज, विमा, अनुदान, कृषी तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे. यासाठी सरकार, खासगी संस्था आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे ठोस धोरणे आखण्याची आवश्यकता आहे. महिलांना केवळ शेतीतील मजूर म्हणून नव्हे, तर शेतीच्या निर्णय प्रक्रियेतील स्वतंत्र आणि सक्षम भागीदार म्हणून मान्यता द्यावी लागेल. महिला शेतकऱ्यांना औपचारिक कृषी शिक्षण, कौशल्य विकास, डिजिटल आणि आर्थिक साक्षरता, आधुनिक तंत्रज्ञान तसेच बाजारपेठेचे ज्ञान मिळाले, तर त्यांच्या योगदानाचे आर्थिक मूल्यही वाढेल.

महिला शेतकरी सक्षम झाल्या, तर केवळ त्यांचे कुटुंब नव्हे, तर देशाची कृषी अर्थव्यवस्था, पोषणसुरक्षा आणि ग्रामीण विकासही अधिक मजबूत होईल. २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्याचा खरा अर्थ केवळ कार्यक्रम आणि घोषणांमध्ये नाही. ज्या हातांनी देशाची शेती टिकवली, त्या हातांना मालकी, समान वेतन, सुरक्षितता, सन्मान आणि निर्णयाचा अधिकार देणे,हीच महिला शेतकरी वर्षाची खरी फलश्रुती ठरेल.

**मच्छिंद्र ऐनापुरे**

# उत्तरप्रदेशातील जातीय समिकरणे !

भारतातील सर्वात मोठ्या अशा उत्तरप्रदेशात येत्या सहा ते सात महिन्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत.उत्तरप्रदेशात विधानसभेच्या एकूण ४०३ जागा आहेत.२०२२ मध्ये झालेल्या उत्तरप्रदेश विधान सभा निवडणुकीत भाजपाने २५५ जागा जिंकून राज्याची सत्ता आपल्याकडे कायम राखण्यात यश मिळवले होते. मात्र २०१७ च्या तुलनेत त्या खेपेला भाजपाच्या जागा मोठ्या प्रमाणात कमी झाल्या होत्या.राज्यात प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाला ( सपा ) २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत १११ जागांवर विजय मिळाला होता.सपाची कामगिरी २०१७ मध्ये झालेल्या विधान सभा निवडणुकीच्या तुलनेत चांगली झाली होती.

या पार्श्वभूमीवर भाजपा,सपा,बसपा व कॉंग्रेस हे राज्यातील प्रमुख राजकीय पक्ष आपली रणनीती आखत आहेत. निवडणुकीत जातीय समीकरणांना खूपच महत्व असल्याने ती समिकरणे राजकीय पक्षांकडून जुळवली जात आहेत.आश्चर्याची गोष्ट म्हणजे या खेपेस राज्यातील ब्राह्मण समाजाच्या मतांना खूपच महत्व प्राप्त झालेले दिसत आहे.ब्राह्मण समाजाची मते मिळवण्या करता सपा, बसपा आणि इतर राजकीय पक्षांमध्ये चढाओढ लागलेली दिसत आहे.उत्तरप्रदेशात ब्राह्मण समाजाची संख्या साधारणपणे दहा ते बारा टक्के इतकी आहे.राज्यातील ब्राह्मण समाज मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर नाराज असल्याची चर्चा आहे.

इतके दिवस सपाने मुस्लीम यादव समिकरणाच्या जोरावर उत्तरप्रदेशात निवडणुका लढवल्या आणि बऱ्याच वेळा सत्ताही मिळवली.गेल्याखेपेस सपाने पीडीएचा (पिछडा,दलित आणि अल्पसंख्याक) फॉर्म्युला वापरून लोक सभा निवडणुकीत नेत्रदीपक कामगिरी केली.मात्र लवकरच होणाऱ्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत तो फॉर्म्युला निवडणुक जिंकण्यासाठी पुरेसा ठरणार नाही,याची जाणीव कदाचित सपाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांना झाली असावी, म्हणूनच त्यांनी लक्षणिय संख्या असलेल्या राज्यातील ब्राह्मण समाजाला आपल्या पक्षाकडे वळवण्याचा प्रयत्न चालवला आहे.




अखिलेश यादव हे आपल्या पत्रकार परिषदांत, ब्राह्मण माफीया डॉन विकास दुबे ( पंडितजी ) ज्याचे पोलिस कस्टडीत असताना एन काऊंटर किलिंग झाले ( जुलै २०२० ) त्या बाबत राज्यातील योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका करत आहेत.उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे क्षत्रिय समाजातून आले असून,ते आपल्या समाजातील लोकांना जास्त फेवर करत असल्याची भावना राज्यातील ब्राह्मण समाजात निर्माण झाली आहे.सरकारी नोकरीत व शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाची पदे क्षत्रिय समाजातील लोकांना दिली जात असल्याचा आरोप ब्राह्मण समाजा कडून केला जात आहे.यापुर्वी या क्षेत्रांत ब्राह्मणांची मेजॉरिटी होती.बसपाच्या सर्वेसर्वा मायावती या ब्राह्मण समाजाला आपल्या पक्षाकडे वळवण्याचा जोरदार प्रयत्न करत आहेत.

ब्राह्मण समाजाला आपल्या पक्षाकडे वळवण्यासाठी एआयएमआयएम या पक्षाचे सर्वेसर्वा असदुद्दिन ओवेसी हेही जोरदार प्रयत्न करत आहेत.गेली काही वर्षे असदुद्दीन ओवेसी हे उत्तरप्रदेशात आपल्या पक्षाचे पाय रोवण्यासाठी खूप प्रयत्न करत आहेत.ओवेसी यांनाही ब्राह्मण समाजाचे महत्त्व कळले असून राज्यातील मुस्लिम समाजाबरोबर ब्राह्मण समाजाला एकत्र आणल्यास त्याचा फायदा आपल्या पक्षाला विधान सभा निवडणुकीत मिळू शकेल असा विश्वास ओवेसी यांना वाटत असावा. ओवेसी यांनी असा आरोप केला आहे की योगी आदित्यनाथ यांचे सरकार ब्राह्मणांना टार्गेट करत आहे.आम्ही ब्राह्मण समाजाला योग्य तो सन्मान देऊ असे ओवेसींनी जाहीर केले आहे.ब्राम्हण समाजातील नेत्यांचे असे म्हणणे आहे की राज्यातील ब्राह्मण समाज हा उत्तर प्रदेश विधानसभेच्या एकूण ४०३ जागां पैकी ११५ जागांवर प्रभावी असून तेथील निकालांवर तो प्रभाव टाकू शकेल.एकंदरित लवकरच होणाऱ्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत, ब्राह्मण समाजाला महत्त्व प्राप्त झाले असून, ब्राह्मण समाजाला आपल्याकडे वळवण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा लागलेली दिसत आहे.

**अभय गोखले**

## घराणेशाहीचा वरदहस्त आणि पोरकट राजकारण...

महाराष्ट्राच्या राजकारणात 'ठाकरे' या नावाला एक वेगळा दरारा आणि धडाकेबाज वक्तृत्वाची मोठी परंपरा लाभली आहे. मात्र, आजच्या काळात पक्षाचे नेतृत्व करू पाहणारे आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे हे दोन्ही ज्युनियर बंधू राजकीय प्रगल्भतेच्या बाबतीत पूर्णपणे निष्प्रभ आणि पोरकट ठरताना दिसत आहेत. आदित्य ठाकरे यांच्या पाठीशी कॅबिनेट मंत्रीपदाचा आणि आमदारकीचा अनुभव असूनही, त्यांचे राजकारण अनेकदा वरवरच्या प्रसिद्धीपुरतेच मर्यादित राहिल्याचे दिसते. ट्विटर,सोशल मीडियावरील प्रतिक्रिया, वक्तव्यांमधील बालिशपणा आणि गंभीर राजकीय संकटांच्या वेळी परिपक्व रणनीती आखण्याऐवजी केवळ सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करणे, यातून त्यांची राजकीय अपरिपक्वताच उघडी पडते. दुसऱ्या बाजूला, अमित ठाकरे यांची अवस्था तर अधिकच केविलवाणी दिसते. सार्वजनिक व्यासपीठावर निवडणुकीत 'आम्ही निवडून आल्यावर काय करणार' याचे साधे व्हिजन मांडता न येणे, हे त्यांच्या कच्च्या वक्तृत्वाचे लक्षण आहे.

एका बाजूला स्वतःच्या बालेकिल्ल्यात नगरसेवक किंवा आमदार निवडून आणण्याची धमक नसणे आणि दुसऱ्या बाजूला केवळ फोटो-सेशन, आंदोलनांची स्टंटबाजी आणि पोरकट वक्तव्यांवर विसंबून राहणे यामुळे दोन्ही ज्युनियर बंधूंनी ठाकरे घराण्याच्या मूळ राजकीय वजनालाच तडे दिले आहेत.थोडक्यात सांगायचे तर, राजकारणाची सखोल जाण, मजबूत संघटनकौशल्य आणि लोककल्याणाचे ठोस धोरण नसल्यामुळे केवळ आडनावाच्या जोरावर राजकारण करू पाहणारे हे दोन्ही ज्युनियर ठाकरे बंधू आजच्या सुजाण आणि तरुण मतदारांच्या दृष्टीने पूर्णपणे अपरिपक्व आणि पोरकट ठरले आहेत.

**अविनाश देशपांडे**

**संवाद**

## या धर्मद्रोहयांना थांबवा !

आजपर्यंतच्या इतिहासात कुठल्याही पिढीने विरोधी पक्ष नेता इतका बेजजबाबदार पाहिला नसेल.भारताच्या राजकारणात आपले महत्त्वाचे स्थान असताना अर्धवट ज्ञानाने वक्तव्य करणे याला काय म्हणायचे? ही व्यक्ती एक तर मूर्ख आहे किंवा अति हुशार. परंतु संपूर्ण भारतीय जनता आपल्याविषयी काय विचार करेल याचा या व्यक्तीने कधी विचार केला का?या धर्मद्रोह्याने मनुस्मृतीमधील दोन ओळी उचलायच्या आणि त्यावर टीका टिपणी करायची, त्याद्वारे लोकांना भ्रमित करायचे, त्यांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करायचा.हिंदू धर्मामध्ये म्हटले आहे यंत्र नारी पूजन्ते रमण्ते तत्र देवता म्हणजे जिथे नारीची पूजा होते तिथे देवतेचा वास असतो. भारतात दोन्ही नवरात्रांमध्ये मुलींची पूजा करतात हे माहिती नसणारे अज्ञानी असे वक्तव्य करू शकतात. निवडणुकीच्या काळात हिंदू म्हणून मिरवणारे आणि इतर वेळेस अहिंदू असणाऱ्या व्यक्तीला कसे कळेल? इतर धर्मियांच्या तीन तलाक, हलाला याच्याविषयी आपण बोलून दाखववे. नाहीतर तुम्हाला मूर्ख म्हणून सोडून देतील. वक्तव्य करताना त्या त्या धर्माचा सखोल अभ्यास करावा, एवढेही न कळणारे राजकारणी भारताची जागतिक प्रतिमा डागाळत आहे.

**डॉ. भारती हेडाऊ,**
यवतमाळ

बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ग्रामसेवकांच्या सुरक्षेसाठी यवतमाळात मूक मोर्चा..!

## ‘शिवरे’ घटनेतील दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. १ :** ग्रामपंचायत अधिकारी स्व. पी.एन. पाटील यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेतील दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी ठोस कायदेशीर उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या यवतमाळ जिल्हा शाखेच्या वतीने मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) जिल्हा परिषद कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मूक मोर्चा काढण्यात आला. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे ग्रामपंचायतीत दि. १७ ऑगस्ट रोजी ग्रामसभा सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी स्व. पी.एन. पाटील यांच्यावर जमावाकडून हल्ला झाल्याचा आरोप आहे.

मानसिक व शारीरिक त्रासानंतर कर्तव्यावर असतानाच त्यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. या घटनेचा निषेध करीत युनियनने आक्रमक भूमिका घेतली आहे. मोर्चात शिवरे घटनेतील दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी, ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी, ग्रामसभेतील अनधिकृत चित्रीकरण व सोशल मीडियावरील बदनामीला आळा घालावा, संवेदनशील ग्रामसभांना मोफत पोलीस संरक्षण द्यावे, तसेच इतर विभागांच्या योजनांच्या ग्रामसभांची जबाबदारी संबंधित विभागांकडे सोपवावी, अशा मागण्या करण्यात आल्या. मोर्चाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष हिम्मत म्हातारमारे, जिल्हा सरचिटणीस मंगेश गाऊने, विभागीय उपाध्यक्ष संजय वानखडे, कार्याध्यक्ष तुकाराम राठोड, कोषाध्यक्ष प्रविण गावडे, उपाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, विकास बोबडे, संजय गिलबीले, प्रिया मेंढे, सहसचिव प्रशांत निमकर, जिल्हा संघटक निखिल येनगुवार, राजेश उगे, प्रकाश वाघमारे, कायदे सल्लागार ओमप्रकाश कोथळकर, प्रसिद्धी प्रमुख मनीष साळवे आदींनी केले.

# ‘चेहरा पाहून मुद्रांक’ देण्याचा आरोप..!

## विक्रेत्याचा परवाना रद्द करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी-जामणी, दि. १ :** झरी-जामणी तहसील कार्यालयातील मुद्रांक विक्रेता प्रभाकर वाघाडे यांच्यावर नागरिकांशी भेदभावपूर्ण वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यांचा मुद्रांक विक्रेता परवाना तत्काळ रद्द करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, मुद्रांक स्टॅम्प घेण्यासाठी गेलेल्या आशिष विठ्ठल उईक यांच्याकडून आधारकार्ड मागण्यात आले. आधारकार्ड दिल्यानंतर मुद्रांक विक्रेता प्रभाकर वाघाडे यांनी ते फेकून देत मुद्रांक देण्यास नकार दिल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या परिचयातील व्यक्तींना मात्र आधारकार्डकडे न पाहता मुद्रांक दिले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकाराबाबत निवासी नायब तहसीलदार पी. एल. राजगडकर यांची भेट घेऊन तक्रार करण्यात आली. त्यानंतर वाघाडे यांना केबिनमध्ये बोलावून मुद्रांक देण्यास सांगण्यात आले. मात्र, केबिनबाहेर आल्यानंतर “तुम्हाला मी देत नाही, तुमच्याकडून जे होते ते करा,” असे म्हटल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला आहे. या प्रकारामुळे मुद्रांक विक्रीत मनमानी सुरू असल्याचा आरोप करत वाघाडे यांचा परवाना रद्द करून कठोर कारवाई करावी, अन्यथा आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथेही देण्यात आली आहे. निवेदनावर आशिष विठ्ठल उईके, राहुल तुळशीराम धुर्वे, गौरव देविदास चिकराम, गजानन नथुजी भोयर व निलेश शालिकराम गेडाम यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सिंचन विहिरीचे अनुदान दोन वर्षांपासून रखडले..! शेतकरी मेटाकुटीला..

## पंधरा दिवसांत रक्कम न मिळाल्यास विहिरीत बसून ‘जलसमाधी’ आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**महागाव, दि. १ :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरीसाठी मंजूर झालेले अनुदान मागील दोन वर्षांपासून रखडल्याने लाभार्थी शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाच्या या योजनेत शेतकऱ्यांना सुरुवातीला स्वखर्चाने विहीर खोदून तिचे बांधकाम पूर्ण करावे लागते.

कामाची व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अनुदानाची रक्कम मिळणे अपेक्षित असताना निधीअभावी अनेक शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. सवना, ता. महागाव येथील लाभार्थी शेतकरी गोविंदराव देशमुख यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तहसीलदार, महागाव यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना लेखी निवेदन दिले आहे. पंधरा दिवसांत अनुदानाची रक्कम खात्यात जमा न झाल्यास स्वतःच्या विहिरीत पाण्यात बसून ‘जलसमाधी’ आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेले अनेक शेतकरी गेल्या दोन वर्षांपासून शासकीय कार्यालयांच्या चकरा मारत आहेत. विशेष म्हणजे मागील हिवाळी अधिवेशनातही या प्रश्नावर चर्चा झाली होती. संबंधित मंत्र्यांनी आठ दिवसांत अनुदान जमा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अद्यापही रक्कम मिळालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. योजनेचा लाभ मिळण्याऐवजी ससेहोलपटच अधिक होत असल्याची भावना लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये आहे.

# बेंबळा धरणावरील दोन्ही उपविभागीय कार्यालयांना कुलूप!

## अधिकाऱ्यांना मुख्यालयाची ‘ॲलर्जी’ शेतकऱ्यांना मात्र हेलपाटे इमारतीची दुरवस्था..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. १ :** बेंबळा धरणस्थळ थाळेगाव येथे असलेल्या पाटबंधारे विभागाच्या दोन्ही उपविभागीय कार्यालयांना कार्यालयीन वेळेतच कुलूप असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुख्यालयी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या अडचणींसाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची तक्रार तालुका विकास मंचाकडे करण्यात आली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने तालुका विकास मंचचे अध्यक्ष प्रकाश जानकर, पांडुरंग लांडगे व राजू पत्रे यांनी दुपारी प्रत्यक्ष कार्यालयाला भेट दिली. यावेळी दोन्ही कार्यालये बंद असल्याचे आढळून आले. दुपारी १२ वाजेपर्यंत एकही अधिकारी, अभियंता, कर्मचारी अथवा चौकीदार उपस्थित नसल्याचे मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्यालय थाळेगाव येथे असतानाही संबंधित अधिकारी यवतमाळ येथील कार्यकारी अभियंता कार्यालयातून कामकाज पाहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ‘कागदोपत्री कार्यालय सुरू, प्रत्यक्षात मात्र कुलूप’ अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे मंचचे म्हणणे आहे. तसेच मुख्यालयी वास्तव्यास असल्याचे दाखवून घरभाडे भत्ता घेतला जातो का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या कार्यालयाच्या इमारतीची दारे-खिडक्या फुटलेल्या अवस्थेत असून परिसरात गाई, म्हशी, बैल व शेळ्या चरताना दिसून आल्या. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा टिप्पर गॅस कटरने कापून चोरीला गेल्याचेही निदर्शनास आले असून, या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप आहे. कार्यालये बंद ठेवून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची चौकशी करून शासकीय मालमत्तेच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी तालुका विकास मंचने केली आहे.

# थोडक्यात



## ‘सेवा-ए-खल्क’मधून माणुसकीचा जागर..!

**रुग्णांना फळे, रुग्णालय कर्मचाऱ्यांना वह्यांचे वाटप**

**पांढरकवडा :** रबिउल अव्वल महिन्याचे औचित्य साधून जमात-ए-इस्लामी हिंद, शाखा पांढरकवडा आणि स्टुडंट इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया (SIO) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी शासकीय रुग्णालयात सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले, तर रुग्णसेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांना वह्यांचे वितरण करून त्यांच्या सेवाभावाचा गौरव करण्यात आला.

प्रेषित हजरत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी मानवसेवा, गरजूंना मदत आणि रुग्णांची विचारपूस करण्याचा संदेश दिला. याच विचारातून ‘सेवा-ए-खल्क’ या संकल्पनेअंतर्गत हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमातून धार्मिकतेसोबतच मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देण्यात आला. यावेळी मौलाना नदीम नदवी, अजीम शेख, युसुफ अली, हमीद शेख, माजिद खान, जावेद अली, अन्वर राणा, शाहरुख कुरेशी, मोईज अंसारी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## पैग़ाम-ए-रहमत-ए-आलम’ मोहिमेतून सामाजिक अनिष्ट प्रथाविरुद्ध जनजागृती..

**२ सप्टेंबर रोजी परिसंवादाचे आयोजन**

**यवतमाळ :** ‘वहदत-ए-इस्लामी हिंद’तर्फे रबी-उल-अव्वल महिन्याच्या निमित्ताने ‘पैग़ाम-ए-रहमत-ए-आलम’ या शीर्षकाखाली देशव्यापी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. स्त्री-भ्रूणहत्या, आत्महत्या, अमली पदार्थांचा गैरवापर तसेच पर्यावरण प्रदूषण यांसारख्या सामाजिक अनिष्ट प्रथा विरोधात जनजागृती करणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. या मोहिमेअंतर्गत यवतमाळ शहरात बुधवार, २ सप्टेंबर रोजी हॉटेल मिडटाउन येथे परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन होणार असून, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले हे मुख्य अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत.

‘वहदत-ए-इस्लामी हिंद’चे राष्ट्रीय अध्यक्ष जिया उद्दिन सिद्दीकी यांच्या विशेष उपस्थितीत आणि संघटनेचे सरचिटणीस डॉ. अनीस अहमद यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे. अब्दुल वहाब मलिक हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. समाजातील विविध अनिष्ट प्रवृत्तींबाबत जनजागृती करून सामाजिक सलोखा, जबाबदारी आणि सकारात्मक परिवर्तनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## आज उमरखेड येथे मातंग समाजाचा जनआक्रोश महामोर्चा !

**उमरखेड :** २ सप्टेंबर रोजी होऊ घातललेल्या अनुसुचित जाती उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ , सकल मातंग समाजाच्या वतिने जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले . मोर्चा नंतर सभेस मार्गदर्शन करण्यासाठी, माजी आमदार नामदेवराव ससाने , डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे , प्रदेशाध्यक्ष लहुजी शक्ती सेना कैलास खंदारे ,

सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक' डॉ अंकुश गोतावळे , सचिन बगाळे (पुणे ), राज्य समन्वयक संजय कंठाळे ( नागपूर) , राज्य समन्वयक विजय अंभोरे ( बुलढाणा ) , राज्य समन्वयक मारोती वाढेकर ( नांदेड ) , हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत .

अनुसुचित जातीमध्ये ५९ जातींचा समावेश आहे . या समाजाच्या विकासासाठी १३ टक्के आरक्षणाची तरतूद आहे . मात्र , आरक्षणाचा लाभ सर्वच जातींना समान प्रमाणात मिळाला नसून काही जाती आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत . त्यामुळे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या जातींना न्याय मिळवण्यासाठी अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण होणे गरजेचे आहे . मातंग समाज अनुसुचित जातीच्या यादीत लोकसंख्येच्या प्रमाणात दुसऱ्या क्रमांकावर आहे . या समाजाला आरक्षणाचा लाभ पाहिजे त्या प्रमाणात मिळाला नसल्यामुळे , अनुसुचित जातीतील अविकसित जातींचे अ , ब , क , ड , आशा पद्धतीने उपवर्गीकरण करण्यात यावे यासाठी समाजाचा जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले सदर महामोर्चा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातून सकाळी ११ वाजता निघेल व १२ वाजता उपविभागीय कार्यालया जवळ मोर्चाचे रूपांतर सभेत होणार आहे . या सभेस मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत . या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निवेदनाद्वारे सकल मातंग समाजाच्या वतिने करण्यात आले आहे .

# ‘गैरवर्तन सहन करू नका, आवाज उठवा!’

## राळेगावात विद्यार्थ्यांना ‘पॉक्सो’ कायद्याचे धडे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. १ :** अरविंद तेलंगे राळेगाव : बालकांच्या सुरक्षिततेसाठी कायदेशीर संरक्षणाची माहिती असणे ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर राळेगाव येथील स्कूल ऑफ ब्रिलियंटमध्ये ‘पॉक्सो’ कायदा व विधी साक्षरतेवर एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी गैरवर्तना विरोधात निर्भयपणे आवाज उठवावा, असा ठोस संदेश यावेळी देण्यात आला.

मुंबई उच्च न्यायालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यवतमाळ आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तालुका विधी सेवा समिती, राळेगाव, तालुका वकील संघ आणि स्कूल ऑफ ब्रिलियंट यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आणि तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष क. मु. पाटील होते. मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहणेही तितकेच आवश्यक असल्याचे सांगितले. कोणी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्यास, असुरक्षित वाटल्यास किंवा अनुचित स्पर्श झाल्यास घाबरून न जाता पालक अथवा शिक्षकांना तातडीने सांगावे, असे आवाहन त्यांनी केले. ॲड. वाय. बी. जोशी यांनी पॉक्सो कायदा-२०१२ मधील विविध तरतुदींची माहिती दिली. ॲड. स्वप्नील मेश्राम यांनीही विद्यार्थ्यांना कायद्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या संरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक अन्वरअली यांनी प्रास्ताविक केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी धनराज सेगेकर आणि आर. बी. पानसे यांनी परिश्रम घेतले. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

# शेतकऱ्यांच्या लुटीच्या आरोपांकडे भूमी अभिलेख अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष?

## कंत्राटी कर्मचाऱ्याच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. १ :** शेतकऱ्यांच्या जमिनीशी संबंधित महत्त्वाचे कामकाज पाहणाऱ्या भूमी अभिलेख कार्यालयात कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचे आरोप होत असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे भूमी अभिलेख कार्यालयातील कारभाराबाबत शेतकरी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

जमिनीची मोजणी, हद्द निश्चिती, नकाशे तसेच विविध अभिलेखांशी संबंधित कामांसाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना भूमी अभिलेख कार्यालयात वारंवार जावे लागते. मात्र, याच शासकीय प्रक्रियेचा गैरफायदा घेत कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याकडून शेतकऱ्यांकडून अतिरिक्त पैशांची मागणी केली जात असल्याचे आरोप करण्यात येत आहेत. या प्रकाराबाबत शेतकरी व नागरिकांकडून आवाज उठविला जात असतानाही संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अद्याप या आरोपांची गांभीर्याने चौकशी करून दोषींवर कारवाई का केली नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांकडून शासकीय कामाच्या नावाखाली अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्याचे आरोप खरे असतील तर हा प्रकार अत्यंत गंभीर असून, त्याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. मात्र, आरोप होऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. भूमी अभिलेख कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्याच्या कामकाजाची चौकशी करून मागील काळातील व्यवहार तपासण्यात यावेत, शेतकऱ्यांकडून नियमबाह्य रक्कम घेतली असल्यास ती परत करण्यात यावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसून, प्रशासनाने तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात घाटंजीचा डंका..!

## अतुल ठाकरे सहाव्या, तर नम्रता मंगाम दहाव्या क्रमांकावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



अतुल ठाकरे सर



नम्रता मंगाम मॅडम

**घाटंजी, दि. १ :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व गणिताची गोडी निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयोगशील उपक्रम राबविणाऱ्या घाटंजीतील शिक्षकांनी राष्ट्रीय स्तरावर आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. पुणे येथे GMRTच्या वतीने आयोजित ऑनलाइन राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात शि. प्र. मं. माध्यमिक कन्या शाळेच्या दोन शिक्षकांनी देशातील पहिल्या दहा क्रमांकांत स्थान मिळवत घाटंजीच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक वाढविला.

शाळेचे गणित शिक्षक अतुल सुरेशराव ठाकरे यांनी सादर केलेल्या ‘बेसिक मॅथ्स’ या प्रयोगाला देशभरातून सहावा क्रमांक मिळाला. या प्रदर्शनात ६०० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. एवढ्या मोठ्या स्पर्धेत सहावे स्थान मिळविणे ही घाटंजी साठी विशेष अभिमानाची बाब ठरली आहे. याच शाळेच्या विज्ञान शिक्षिका नम्रता मंगाम यांनी सादर केलेल्या ‘ॲक्टिव्हिटी बेस्ड सायन्स’ या प्रयोगाला दहावा राष्ट्रीय क्रमांक मिळाला. राष्ट्रीय स्तरावरील पहिल्या दहा क्रमांकांत स्थान मिळविणाऱ्या त्या घाटंजी तालुक्यातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या आहेत. या दोन्ही शिक्षकांच्या यशामुळे ग्रामीण भागातील शिक्षकांमध्येही कल्पकता, प्रयोगशीलता आणि गुणवत्तेची कमतरता नसल्याचे अधोरेखित झाले आहे. मर्यादित साधनसामग्रीतून राष्ट्रीय स्तरावर मिळविलेली ही कामगिरी विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

# एक शिक्षक, सात वर्ग अन् शिक्षणाचा बोजवारा!

## कळमना शाळेतील विद्यार्थ्यांचा थेट जि.प.वर धडक मोर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १ :** वणी तालुक्यातील कळमना (बु) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षकांची तीव्र कमतरता असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेत चार शिक्षकांची पदे मंजूर असताना सध्या केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्याने इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक भार एकाच शिक्षकावर पडला आहे.

याप्रकरणी वारंवार निवेदने देऊनही कार्यवाही न झाल्याने संतप्त विद्यार्थी, पालक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी मंगळवारी थेट जिल्हा परिषद कार्यालयावर धडक दिली. दि. २९ जून रोजी पंचायत समिती, वणी येथे शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, दोन महिन्यांहून अधिक काळ लोटूनही शिक्षक उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार विद्यार्थी जिल्हा परिषदेत दाखल झाले. “शिक्षक द्या सर, शिक्षक द्या!” अशी आर्त हाक देत विद्यार्थ्यांनी शिक्षण विभागासमोर आपली व्यथा मांडली. एकाच शिक्षकाकडून सात वर्गांचे अध्यापन होत असल्याने अभ्यासक्रम पूर्ण करणे, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे कठीण झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांनी केला. यावेळी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर सकारात्मक आश्वासन दिले. चालू शैक्षणिक सत्रात आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कोमल भोयर यांच्यासह पुरुषोत्तम बोबडे, सचिन कापसे, सचिन अंगिरकर, मंगेश थेटे, राजू बावणे, अमोल दुर्वे आदी पालक व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# मेळघाटच्या अतिदुर्गम प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीवर प्रश्न

## ३.५ कोटी मंजूर, पण जमिनीवरील परिस्थिती अजून चिंताजनक

**मेळघाट/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने मेळघाट परिसरातील प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला ३.५ कोटी रुपयांची मोठी रक्कम मंजूर केली आहे. यामध्ये धारणी तहाच्या ५० आणि चिखलदरा तहाच्या ५० प्राथमिक शाळांचा समावेश आहे. प्रत्येक शाळेसाठी ३.५ लाख रुपये दुरुस्तीचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

तथापि, परिसरातील अनेक प्राथमिक शाळा अत्यंत खस्ताहाल असल्या तरी बांधकाम विभागाकडून केवळ आंशिक दुरुस्तीच्या मर्यादित कामांचीच चर्चा आहे. अनेक गावांतील शाळा इमारती जर्जर अवस्थेत असल्या तरी कोणत्या शाळांमध्ये कोणत्या प्रकारचे काम होणार आहे हे स्पष्ट होत नाही.सर्वांत गंभीर बाब म्हणजे अतिदुर्गम आणि डोंगराळ भागातील शाळांना प्राधान्य न देता जवळच्या आणि सुलभ गावांना प्राधान्य देण्यात येत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मेळघाटसारख्या दुर्गम भागात अशा प्रकारची भूमिका मुलांच्या शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी धोक्याची बाब आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता, उपअभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांनी संबंधित गावातील शाळा समिती आणि मुख्याध्यापकांशी प्रत्यक्ष संवाद साधून वास्तव परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. मात्र, या दिशेने उपेक्षा आणि दुर्लक्ष आढळून येत आहे.ग्रामीणांची मागणी आहे की जिल्हा परिषदेचे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करावा, अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना द्याव्यात आणि

अतिदुर्गम भागातील शाळांना प्राधान्य द्यावे,दुरुस्ती कामाच्या गुणवत्तेवर कठोर देखरेख करावी,निधीचा वापर पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने व्हावा,मेळघाटतील ग्रामीण आणि पालक या विषयावर जिल्हा परिषदेने गंभीरपणे लक्ष देऊन खरी दुरुस्ती करावी अशी अपेक्षा करतात.

# नैसर्गिक शेती काळाची -पद्मश्री सुभाषजी शर्मा

**अमरावती/का.प्र.**

गोकुलम गोरक्षण संस्था अमरावती व कृषी विभाग अमरावती द्वारा आयोजित नैसर्गिक शेती कार्यशाळा गोकुलम गोरक्षण संस्था येथे संपन्न झाली.कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुदाम देशमुख, मार्गदर्शक म्हणून पद्मश्री सुभाष शर्मा, यवतमाळ, संतोष बोथे, पवन मिश्रा तसेच प्रमुख अतिथी डॉ. हेमंत मुरके मंचावर उपस्थित होते.



सर्वप्रथम दीपप्रज्वलन करून या कार्यशाळेचा प्रारंभ करण्यात आला। कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय किशोर देशमुख यांनी केले. पद्मश्री सुभाष शर्मा यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात शेतीचे नियोजन शेतकऱ्यांनी करणे आवश्यक आहे, याची माहिती देताना ते म्हणाले, ६५टक्के पिके, ३० टक्के झाडे, ०३टक्के पाणी व ०२टक्के पशुचारा याकरिता याप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याने नियोजन करावे.गाय ही शेतकऱ्याची आई आहे, त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने गोवंशाचे पालन-पोषण करावे. झाडे ही कीटकनाशकाचे काम करतात। शेतातील काडीकचरा शेतामध्येच टाकावा, ते बॅक्टेरियाचे काम करतात. आपल्या शेतातील एक थेंबही पाणी बाहेर वाया जाऊ देऊ नये, याकरिता शेतकऱ्यांनी नियोजन करावे.

सुभाषजी शर्मा म्हणाले, नैसर्गिक शेती करणे म्हणजेच कर्जमुक्त, भयमुक्त, रोगमुक्त, विषमुक्त शेती आहे। नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे, ती प्रत्येक शेतकऱ्याने करावी. नैसर्गिक शेतीचा अवलंब केल्यास एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही.पवन मिश्रा, वाशिम यांनी आपल्या भाषणात शेतीकरिता लागणाऱ्या बी-बियाण्यांचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, पूर्वी आपल्या भारतात परंपरागत शेती होती, तेव्हा कोणीही बी-बियाणे खरेदी करत नव्हते.आज मोठ्या प्रमाणावर शेतकरी बी-बियाणे खरेदी करत असल्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. बीज बँक हीच शेतकऱ्याची खरी बँक आहे. देशी बीजामुळे पाणी कमी लागते व दुष्काळाच्या स्थितीत टिकतात. आपल्या शेतातील चांगल्या झाडाची निवड करून आपणच आपल्या बीजाचे संगोपन करावे.

डॉ. संतोष बोथे यांनी आपल्या भाषणात आहार आणि जीवनपद्धती या विषयावर मार्गदर्शन केले. आज अनेक देशांमध्ये उपवास या विषयावर संशोधन होत आहे. उपवासाचे महत्त्व संशोधक सांगत आहेत; परंतु आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक ऋषी-मुनी, साधू-संतांनी उपवासाचे महत्त्व धार्मिक पद्धतीने हजारो वर्षांपूर्वी विशद केले होते. एकादशी केल्याने अनेक रोग होत नाहीत, हे आज विज्ञानाने सिद्ध केले आहे.

या कार्यशाळेला जिल्हा कृषी अधीक्षक अमरावती आर. एस. सातपुते, माजी कृषी अधिकारी अनिल बोंडे, माजी कृषी संचालक जयवंतराव महल्ले, किसान संघ पदाधिकारी नाना आखरे, गोकुलम ट्रस्ट डॉ. करुणा मुरके, माजी खासदार अनंत गुडे यासारखे अनेक मान्यवर या कार्यशाळेला उपस्थित होते.या कार्यशाळेत दुपारचे भोजन तयार करत असताना सर्व प्रकारचे अन्नधान्य, भाजीपाला, मसाले व तेल हे विषमुक्त होते.या कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ.सुनील सूर्यवंशी व आभार प्रदर्शन विनय बोथरा यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी अभिषेक मुरके, नंदू गांधी, नेहा जैन यांनी प्रयत्न केले.

# नवीन अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

## भातकुली तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षणाला प्रारंभ इयत्ता तिसरी व चौथीच्या ८० शिक्षकांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रात राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण तयार करण्यात आला असून, त्यानुसार नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भर, सक्षम आणि प्रभावी संवादक बनविण्यावर या नवीन अभ्यासक्रमात विशेष भर देण्यात आला आहे.



याच अनुषंगाने भातकुली तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षणास सुरुवात झाली आहे. हे प्रशिक्षण ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधीत अमरावती येथील जि. प. माध्यमिक मुलांची शाळा, सायन्सकोर येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात इयत्ता तिसरी व चौथीला अध्यापन करणारे सुमारे ८० शिक्षक व शिक्षिका सहभागी झाले आहेत.प्रशिक्षणासाठी इलियात खान इनायत खान, सतीश देशमुख, अर्चना गेडाम आणि अर्चना पर्वतकर हे सुलभक म्हणून मार्गदर्शन करीत आहेत. गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विषयतज्ज्ञ चंद्रकांत कडवे यांच्या नियंत्रणात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिक्षणाच्या प्रारंभीच्या टप्प्यात मातृभाषेचा मूलभूत आणि विशेषत्वाने विचार होणे आवश्यक असल्याचे अभ्यासक्रमाच्या प्रस्तावनेत स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना मातृभाषेतून आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची, स्वतःचे मत मांडण्याची तसेच त्यांच्या प्रतिभाशक्तीचा विकास करण्याची संधी मिळावी, हा नवीन अभ्यासक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे.राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षणातील मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे महाराष्ट्राचा अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्राची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा, स्थानिक वैशिष्ट्ये, विविध विचारसरणी आणि स्थानिक गरजा यांचाही अभ्यासक्रम निर्मितीत विचार करण्यात आला आहे.

# पालकमंत्र्यांकडून बाधित नवजात बालकांच्या प्रकृतीची विचारपूस

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा स्त्री रुग्णालयातील २४ ऑगस्ट रोजी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील बाधित बालकांची राज्याचे महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आस्थेने विचारपूस केली. त्यांनी पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (पीडीएमसी) तसेच मुरके हॉस्पिटलला भेट देऊन उपचाराधीन बालकांच्या आरोग्याची माहिती घेतली, तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनाग्रस्त नवजात अतिदक्षता विभागाची पाहणी केली.

पीडीएमसी आणि मुरके रुग्णालयात उपचार घेत असलेल्या काही नवजात बालकांची प्रकृती धोक्याबाहेर आल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे, तर उर्वरित बालकांवर विशेष डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.पाहणी दौऱ्याप्रसंगी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त मंगेश गोंदावले, पोलीस आयुक्त राकेश ओला आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



# पालक-विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेतून साकारले पर्यावरणपूरक गणपती!

## शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच भारतीय संस्कृती व परंपरेची जपणूक करण्याच्या उद्देशाने हरिकिसन मालू इंटरनॅशनल स्कूल , शेगाव-रहाटगाव रोड, अमरावती येथे शाडू मातीपासून गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या विशेष कार्यशाळेत पालकांनी आपल्या पाल्यांसोबत उत्स्फूर्त सहभाग घेतला. पालक व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे शाडू मातीला आकार देत आपल्या कल्पकतेतून सुंदर व आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती घडविण्याचा अनोखा आनंद विद्यार्थ्यांनी अनुभवला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, सर्जनशीलता, कलात्मक कौशल्य, सहकार्याची भावना आणि आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. रासायनिक रंग व प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी नैसर्गिक शाडू मातीचा वापर करून गणेशमूर्ती तयार करण्याचे महत्त्वही यावेळी समजावून सांगण्यात आले.पालक-विद्यार्थी सहभागामुळे संपूर्ण कार्यशाळेत उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या या अभिनव व पर्यावरणपूरक उपक्रमाचे पालकांनी मनापासून कौतुक केले.

# अनंत नांदूरकर 'खलिश' मुंबईच्या 'नआते पाक' मुशायऱ्यात

**अमरावती/का.प्र.**

'नदी, दर्या, चांद, सितारे,
जुगनू फुल सबमे हुजूर
जहाँ जहाँ ये कदम पडे है
पाक वो धूल सबमे हुजूर
गारे हिरा की सारी तजल्ली
कर दी हवाले दुनिया के
यहां वहां है कहां नही है
मेरे रसूल सबमे हुजूर' अशा दमदार ओळी मोहम्मद पैगंबर यांच्या श्रद्धेत पेश करतात इस्लामिक जीमखाना मरीन लाईन्सचा अवघा हॉल वाहवा आणि सुभान अल्लाच्या उत्स्फूर्त दादेने दुमदुमला!



निमित्त होते, आपसी सौहार्द, बंधूता आणि सामाजिक सलोखा याकरिता गेल्या पाच वर्षांहून अधिक काळापासून हजरत मोहम्मद पैगंबर यांच्यावर लिहिलेला 'नआते पाक' या कार्यक्रमाचे. यात अमरावती येथील प्रख्यात मराठी उर्दू शायर अनंत नांदूरकर खलिश यांना दरवर्षी सन्मानाने निमंत्रित केले जाते.आयोजनाचे हे पाचवे वर्ष होते.मोहम्मद पैगंबर यांचे मानवतावादी विचार,परस्पर सौहार्द, सामाजिक उत्थान, देश विकासात सर्वधर्मीय सहभाग, गरजूंना मदत इत्यादी अनेक मुख्य उद्देश या आयोजनामागे असल्याचे नआते पाक मुशायऱ्याचे आयोजन फरीद खान यांनी केले होते तर अध्यक्ष यूसुफ इब्राहनी होते.यावेळी आयोजित उर्दू भाषिक मुशायऱ्यात गज़लकार इरफान जाफरी, ओबेद आजम आजमी या मातब्बर शायरांसोबत अनेक स्थानिक शायरांनी आपला श्रद्धापूर्वक सहभाग नोंदविला.मुशायऱ्याच्या अध्यक्षस्थानी उस्ताद जनाब सागर त्रिपाठी होते.गैर उर्दूभाषिक गज़लकारांच्या मुशायऱ्यात विशेषत्वाने विदर्भाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अमरावतीचे अनंत नांदूरकर 'खलिश', बुलढाण्याचे डॉ. गणेश गायकवाड यांच्यासह जनाब लक्ष्मण शर्मा वाहिद, हुकुमचंद कोठारी,डॉ. सोनल चौधरी, अनुष्का निकम इत्यादी शायरांनी आपल्या नआते पाक गज़ल सादर केल्या. या भागाचे निवेदन माधव बर्वे 'नूर' यांनी केले तर उर्दू शायरांच्या मुशायऱ्याचे निवेदन शायर इरफान जाफरी यांनी केले.

# अमरावतीच्या कैलास फार्म हाऊसमध्ये फुलले 'कृष्णाचे आवडते' कदंबाचे झाड!

## कौडण्यपूर तीर्थक्षेत्रातील कदंबाची परंपरा आता अमरावती मार्गावरही पाच-सहा वर्षांत झाडाने धरली बहराची वाट

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

श्रीकृष्णाच्या बाललीला आणि पौराणिक कथांशी जोडलेला कदंब वृक्ष आता अमरावती रोडवरील कुऱ्हा ते अमरावती मार्गावरील कैलास फार्म हाऊस परिसरातही बहरताना दिसत आहे. विशेष म्हणजे या झाडाला तब्बल पाच ते सहा वर्षे पूर्ण झाली असून, सध्या त्याची चांगली वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.



अमरावती जिल्ह्यातील प्रसिद्ध कौडण्यपूर तीर्थक्षेत्राच्या परिसरातही कदंबाचे झाड असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या या वृक्षाची लागवड अमरावती परिसरात होत असल्याने पर्यावरणप्रेमी आणि भाविकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.कदंब वृक्षाला श्रीकृष्णाच्या कथांमध्ये विशेष महत्त्व आहे. कृष्णाच्या बाललीला, यमुना तीर आणि ब्रजभूमीच्या धार्मिक परंपरेत कदंब वृक्षाचा उल्लेख आढळतो. कदंबाच्या फुलांना आणि फळांना देखील या सांस्कृतिक परंपरेत विशेष स्थान असल्याचे सांगितले जाते.

याबाबत कैलास फार्म हाऊसचे संचालक कैलास गिळकर यांनी माहिती देताना सांगितले की,'आमच्या फार्म हाऊस परिसरात कदंबाचे झाड पाच-सहा वर्षांपूर्वी लावण्यात आले. आता या झाडाची चांगली वाढ झाली असून त्याला फुले व फळेही येत आहेत. श्रीकृष्णाच्या लीलांशी या वृक्षाचा संबंध असल्याने या झाडाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व विशेष आहे.'कदंबाच्या झाडाच्या निमित्ताने पौराणिक वारसा, निसर्गसंवर्धन आणि धार्मिक श्रद्धेचा अनोखा संगम कैलास फार्म हाऊस परिसरात पाहायला मिळत आहे. त्यामुळे या वैशिष्ट्यपूर्ण वृक्षाला पाहण्यासाठी नागरिकांमध्येही आकर्षण निर्माण झाले आहे.

# संक्षिप्त

## १२ सप्टेंबरला 'सात्त्विक गणपती' उपक्रमांतर्गत कार्यशाळा

**अमरावती**-पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'सात्त्विक गणपती' या उपक्रमांतर्गत मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता सांस्कृतिक भवन, अमरावती येथे ही कार्यशाळा होणार आहे.'सात्त्विक गणपती' कु.मयुरी दिपक खताडे यांच्या उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यशाळेला अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती महानगरपालिका तसेच 'माझी वसुंधरा' अभियानाचे सहकार्य लाभणार आहे. मा.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या सहमती व मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.कार्यशाळेत नागरिकांना मातीपासून स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## वार्षिक सर्वसाधारण सभा १३ सप्टेंबरला

**अमरावती**-गुरू रविदास मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था, अमरावतीच्यावतीने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे अध्यक्ष श्री वासुदेव वानखडे यांचे अध्यक्षतेखाली १३ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी ५.०० वाजता गुरू रविदास भवन, वैशाली विहार, साई नगर परिसर, अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेमध्ये २४ ऑगस्ट, २०२५ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची कार्यवाही (इतिवृत्त) वाचून कायम करणे, सन २०२५-२६ च्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे, निव्वळ नफा विभागणीस मंजुरी देणे, २०२५-२६ करीता सादर केलेल्या नफा-तोटा, तेरीज पत्रक व अंदाजपत्रकास मान्यता देणे, अंकेक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे, अंकेक्षणाकरीता अंकेक्षकाची निवड करणे, सभासदाकडील थकीत कर्ज वसुली बाबत विचार करणे, सन्माननीय सभासदांकडून आलेल्या सूचना व ठरावांवर विचार करणे तसेच अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणा-या विषयांवर चर्चा करणे आदी विषयांवर चर्चा होईल. सभेला सर्व संबंधितांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला मंगळवारी

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. वासुदेवराव राजारामजी देशमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून 'प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमालेचे' मंगळवार ८ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथील स्व. शंकरलालजी राठी सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' या विषयावर नागपूरच्या सुप्रसिध्द वक्त्या डॉ. अलका इंदापवार ह्या अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत.

याप्रसंगी श्री गणेशदास राठी छायालय समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री वसंतकुमारजी मालपाणी व दानदात्यांचे प्रतिनिधी माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एल. भांगडीया यांनी केले आहे.

## डॉ. चंद्रकांत पोपट यांचा गौरव

**अमरावती**-व्यवसायाच्या धकाधकीत आणि रघुवीरच्या व्यस्त कारभारातूनही आपल्या गायनाच्या छंदाला सातत्याने जोपासत संगीतप्रेमी अमरावतीकरांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारे तसेच देहदान, अवयवदान व नेत्रदान जनजागृतीसाठी उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. चंद्रकांत पोपट यांच्या अष्टपैलू कार्याचा गौरव करण्यात आला.नुकतेच जोशी सभागृहात संगीत साधना कराओके क्लब, अमरावती व डिवाइन इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने देहदान, अवयवदान व नेत्रदान जनजागृतीसाठी 'क्या खूब लगती हो...' या कराओके गीतांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दहा उत्कृष्ट गायकांना पुरस्कार, दहा उत्कृष्ट वेशभूषा पुरस्कार तसेच दहा उत्कृष्ट प्रेक्षक वेशभूषा पुरस्कार प्रदान करण्यात आले.संचालन सुप्रसिद्ध निवेदक सय्यद मुश्ताक, कल्याणी मुदलियार व सुनीता व्यास यांनी केले.

# सप्तरंगी तर्फे निःशुल्क स्वरचित हिंदी काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

हिंदी भाषा आणि साहित्याच्या प्रचार-प्रसार आणि उन्नतीसाठी चार दशकांपासून सतत कार्यरत असणाऱ्या सप्तरंगी हिंदी साहित्य संस्था, अमरावती द्वारा या वर्षी 'हिंदी दिवस' चे औचित्य साधून १२ सप्टेंबर २०२६, शनिवार रोजी 'हिंदी स्वरचित काव्य वाचन स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपले नाव, मोबाइल क्रमांक, कार्यक्रम संयोजक पवन नयन जायसवाल (९४२१७ ८८६३०) आणि श्याम दम्मानी 'नीलेश' (९३७२७ ९३२५२) यांच्या मोबाइल व्हाट्सएप क्रमांकांवर पाठवावे. ही स्पर्धा नि:शुल्क आणि सर्वांसाठी खुली आहे. हिंदी कविता स्वरचित असणे आवश्यक आहे. कवितेसाठी विषयाचे कोणतेही बंधन नाही मात्र कविता व्यक्ती विशेष आरोप आणि विवादास्पद स्थिती निर्माण करणारी नसावी. निवड झालेल्या श्रेष्ठ तीन स्पर्धकांना प्रथम २१०१, द्वितीय १५०१ आणि तृतीय ११०१ रोख बक्षीस आणि स्मृति चिन्ह या द्वारे सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरवांकित करण्यात येईल. स्पर्धेत प्रशिक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम आणि सर्वमान्य राहील. तसेच स्पर्धेसंबंधी नियमांत बदल करण्याचा अधिकार आयोजकांनी राखून ठेवला आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाव कळविण्याची अंतिम तारीख ९ सप्टेंबर २०२६ आहे.

स्पर्धा महानगरपालिका उद्यान सभागृह, शारदा नगर, अमरावती येथे १२ सप्टेंबर २०२६, शनिवार रोजी दुपारी ०२ वाजता सुरू होईल. स्पर्धकांनी अर्धातास अगोदर आपली उपस्थिती देऊन आपले नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. कृपया लवकरात लवकर आपले सहभाग नोंदवून आपली प्रवेशिका निश्चित करावी अशी विनंती सप्तरंगी हिंदी साहित्य संस्था, अमरावती चे अध्यक्ष, नरेंद्र देवरणकर 'निर्दोष' आणि सचिव, बरखा शर्मा 'क्रांति' यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# शाळाबाह्य मुलांचा प्रश्न आणि उपाय

**देशातील प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण फारसे नसले, तरी माध्यमिक स्तरावरील गळतीच्या प्रमाणात झालेली वाढ चिंताजनक आहे. राज्यात शाळाबाह्य होण्याचे मुलांचे प्रमाण ९.८ टक्के, तर मुलींचे प्रमाण ८ टक्के इतके आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रासारख्या राज्यासाठी निश्चित भूषणावह नाही. एकीकडे शाळेत आलेली मुले दाखल करणे, टिकवणे आणि शिकवणे यासाठी सर्व शिक्षा अभियान सुरू झाले होते. त्याला आपल्या राज्यात काही प्रमाणात यश मिळाले असले तरी देश म्हणून आपल्याला फार समाधानकारक यश मिळू शकलेले नाही या वास्तवाकडेदेखील गंभीरपणे पाहण्याची गरज आहे.**

केंद्र सरकारच्या वतीने या वर्षीचा कामगिरी प्रतवारी निर्देशांक अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. तो अहवाल तयार करताना विविध स्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी युडायस प्लस या सरकारी पोर्टलच्या माहितीचाही उपयोग केला आहे. शाळा-विद्यार्थी, सुविधा, शिक्षक, योजनांची अंमलबजावणी अशा विविध स्वरूपाची माहिती आणि तिचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. या माहितीवरून आपल्याला अजूनही बरेच काही करण्याची गरज आहे हे अधोरेखित झाले आहे. कामगिरी प्रतवारी निर्देशांक अहवालातील एक हजार गुणांच्या मूल्यमापनानुसार चंदिगडने आघाडी मिळवत देशात प्रथम स्थान मिळवले आहे. केंद्र सरकारच्या या अहवालाने देशातील शिक्षण प्रक्रिया, सुविधा, गुणवत्ता यांचे वास्तवाचे दर्शन घडण्यास मदत होते आहे. देशातील प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण फारसे नसले तरी माध्यमिक स्तरावरील गळतीच्या प्रमाणात झालेली वाढ चिंताजनक आहे.

देशातील शालेय शिक्षण स्तरावर बालवाटिका ते बारावीपर्यंत साधारण २४ कोटी ७२ लाख १९ हजार ७६६ विद्यार्थी शिकत आहेत. प्राथमिक स्तरावरील शाळाबाह्य होण्याचे प्रमाण देशभरात ०.३ टक्के इतके आहे, तर उच्च प्राथमिक स्तरावरील हे प्रमाण ३.६ टक्के असून माध्यमिक स्तरावरील प्रमाणात झालेली वाढ अधिक चिंताजनक आहे. हे प्रमाण ९.५ टक्के आहे. याचा अर्थ देशात पहिलीत १०० मुले दाखल झाली, तर दहावीपर्यंत साधारण १५ विद्यार्थी दहावीपर्यंत शाळेच्या बाहेर पडत आहेत, हे प्रमाण अधिक चिंताजनक आहे.

त्याचवेळी देशभरात मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण मुलांपेक्षा कमी आहे. कधीकाळी मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण अधिक होते. मात्र आता दुर्दैवाने आता मुलांची शाळा सोडण्याच्या प्रमाणातील वाढ चिंताजनक आहे. त्यामुळे अधिक गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. आपल्या देशात अजूनही कुटुंब व्यवस्था पुरुषप्रधान आहे. त्यामुळे मुले शाळाबाह्य होणे किंवा शाळा सोडून जाणे याचा अर्थ त्या मुलांच्या भविष्यातील कुटुंबाच्या नशिबी दारिद्र्याचीच वाट ठरलेली आहे. दहावीच्या आत ही मुले शिक्षणाच्या बाहेर जात आहेत, त्याचा दुसरा अर्थ ही मुले उद्या कामगार म्हणून रोजगाराच्या रांगेत उभी राहिली, तर ही तरुणाई अप्रशिक्षित कामगार म्हणून उपयोगात आणली जातील. त्यामुळे त्यांचा उत्पन्नाचा स्रोत आटलेला असेल. एका अर्थाने ही मुले शाळाबाह्य होणे म्हणजे दारिद्र्याकडे जाण्याची ही नवी वाट आहे.




देशातील एकूण शिक्षणातील पटनोंदणीचा विचार करता पूर्वप्राथमिक स्तरावर देशातील १ कोटी ४९ लाख १२ हजार ९०९ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. प्राथमिक स्तर म्हणजे पहिली ते पाचवीच्या स्तरावर १० कोटी १९ लाख १५ हजार ८७४ विद्यार्थी दाखल झाले आहेत. सहावी ते आठवीच्या स्तरावर ६ कोटी ३२ लाख ४१ हजार ४२४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. पहिली ते आठवीचा विचार करता १६ कोटी ५१ लाख ५७ हजार २९८ विद्यार्थी शिकत आहेत. नववी ते दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३ कोटी ८२ लाख ९० हजार ४१३ आहे. उच्च माध्यमिक स्तरावर २ कोटी ८८ लाख ५९ हजार १४६ विद्यार्थी शिकत आहेत. देशातील विविध स्तरावरील विद्यार्थी संख्या लक्षात घेता पहिली ते पाचवीतील विद्यार्थ्यांचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण ०.३ टक्के आहे. यात ०.४ टक्के मुले, तर ०.१ टक्के मुलींचा समावेश आहे. उच्च प्राथमिक स्तरावर हे एकूण प्रमाण ३.६ टक्के आहे. यात ३.८ टक्के मुले, तर ३.४ टक्के मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण आहे. नववी ते दहावीच्या वर्गाचा विचार करता ९.५ टक्के विद्यार्थी शाळाबाह्य आहेत. येथे १०.९ टक्के मुले आणि ८.० टक्के मुली शाळाबाह्य आहेत. या टक्केवारीचा विचार करता प्रमाण कमी वाटत असले तरी संख्यात्मक विचार करता ही संख्या मोठी आहे हे लक्षात घ्यायला हवे. माध्यमिक स्तरावर एकूण जर ३ कोटी ८२ लाख ९२ हजार ४१३ विद्यार्थी शिकत आहेत, तर त्याच्या ९.५ टक्के मुले शाळा सोडतात. याचा अर्थ देशातील साधारण ३६ लाख ३८ हजार विद्यार्थी शाळाबाह्य आहेत. हे प्रमाण किती मोठे आहे हे सहजतेने लक्षात येईल.

देशातील अनेक प्रगत राज्यांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा विचार करता निम्म प्राथमिक स्तरावर हे प्रमाण शून्य टक्के आहे, तर सहा ते आठ इयत्तांमध्ये म्हणजे उच्च प्राथमिक स्तरावरील प्रमाणही शून्य टक्के आहे. याचा अर्थ राज्याने शिक्षण हक्क कायद्याची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी केली आहे अशी ही आकडेवारी सांगते आहे. मात्र माध्यमिक स्तरावर एकूण शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण ९.० टक्के आहे. हा टक्का राष्ट्रीय सरासरीच्या जवळ जाणारा आहे. राज्यात शाळाबाह्य होण्याचे मुलांचे प्रमाण ९.८ टक्के, तर मुलींचे प्रमाण ८ टक्के इतके आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रासारख्या राज्यासाठी निश्चित भूषणावह नाही. मुले शाळा सोडतात यामागे जी कारणे आहेत, त्यात पालकांची आर्थिक स्थिती हे एक महत्त्वाचे कारण आहे. जेव्हा पालकांचे दारिद्र्य असते तेव्हा शाळांमधून मुले काढून घेण्याचे प्रमाण वाढते. गरीबांना जोवर मोफत, सक्तीचे, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही, तोवर दारिद्र्य संपुष्टात येणार नाही. अमेरिकन विचारवंत गीलबर्थ म्हणत असे की, गरिबी संपवण्यासाठीच्या योजना फक्त तात्पुरत्या स्वरूपात काम करतील. मात्र शिक्षण हाच जगातील गरिबी संपवण्याचा कायमस्वरूपी उपाय आहे. आज त्या उपायांसाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागेल. त्याशिवाय आपल्याला या समस्येवर पूर्णतः मात करता येणार नाही. मुलांच्या शाळाबाह्य प्रश्नांच्या मुळाशी शिक्षण-अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापनाची प्रक्रियादेखील आहे. मुळात अलीकडच्या काळात बुद्धिशास्त्राशी संबंधित मोठ्या प्रमाणावर संशोधने झाली आहेत. अभ्यासक्रम विकसित होत असताना त्याचा विचार केला जायला हवा. वर्गात असणारी मुले विविध बुद्धिमत्तेची असतात. अशा वेळी त्या प्रत्येक मुलाला शिक्षणात टिकून ठेवण्यात यश मिळेल अशी अभ्यासक्रमाची रचना असायला हवी. वर्गातील अध्ययन, अध्यापनाच्या प्रक्रियेतदेखील सातत्याने वैविध्य असायला हवे. त्याचबरोबर मुलांची भाषा, स्थानिक परिसर, सामाजिक वातावरण, आर्थिक परिस्थिती, भाषा या सर्वांचा विचार करून अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया करण्याची गरज आहे.

**संदीप वाकचौरे**

## त-ड-का

### पटले तर घ्या... !

दिनचर्या आहे व्यस्त
लोक आहेत त्रस्त
शार्ट बट स्विट मॅसेज
पाठविणेच आहे रास्त .. !

गृप झालेत भक्कम
वेळेचा आहे वाणवा
पॉईंटेड लीखानाची
अंगी सवय बानवा .. !

वाचन मनन चिंतन
निरीक्षण जो करते
त्याच्याच लेखणीतून
अंतरीचे बोल प्रसवते.. !



**प्रा अशोक सारडा, मेहकर**
९४२१३९४३३९

# ढोल-ताशा, भजन-कीर्तन सोडून 'डीजे'चा अट्टहास कशासाठी?

**गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया। या जयघोषातच महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची खरी ओळख दडलेली आहे. ढोल-ताशांचा निनाद, लेझीमचा ताल, आरतीचे सूर, भजन-कीर्तनाची परंपरा आणि समाजप्रबोधनाचे कार्यक्रम यामुळे गणेशोत्सव धार्मिक उत्सवाच्या पलीकडे जाऊन, तो समाजाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा बनतो. मग या समृद्ध परंपरेला बाजूला सारून गणेशोत्सवाची ओळख कर्णकर्कश 'डीजे'च्या दणदणाटाशी जोडण्याचा अट्टहास नेमका कशासाठी?**



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची मुहूर्तमेढ रोवली, ती मिरवणुका काढण्यासाठी किंवा मनोरंजनासाठी नव्हे. समाजाला एकत्र आणणे, सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणणे, जनजागृती करणे आणि राष्ट्रीय भावनेला बळ देणे, हा त्यामागचा व्यापक विचार होता.काळ बदलला, उत्सवाचे स्वरूपही बदलले; पण त्यामागचा हेतू आणि संस्कृतीशी असलेली नाळ तुटण्याचे कारण नाही.

आज गणेशोत्सवाच्या नावाखाली काही ठिकाणी ध्वनिप्रदूषणाचा इतका कहर होतो, की बाप्पाच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांपेक्षा आजूबाजूच्या घरांतील नागरिकांचा त्रास अधिक चर्चेत येतो. आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी यांचा विचार करायचा नाही का? एखाद्या घरात रुग्ण उपचार घेत असेल, एखाद्या विद्यार्थ्यांची परीक्षा जवळ आली असेल किंवा एखादा ज्येष्ठ नागरिक विश्रांती घेत असेल, तर त्याच्या दारात तासनतास आवाजाचा धडाका देणे ही उत्सवाची भक्ती कशी ठरू शकते? गणेशोत्सव आनंदाचा असावा, त्रासाचा नाही. उत्सवात उत्साह हवा, उन्माद नको. भक्ती हवी, बेभानपणा नको आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इतरांसारखे धर्माच्या नावावर धर्मालाच कमीपणा आणणारे प्रकार नकोत.

डीजेचा मुद्दा हा फक्त आवाजाच्या पातळीपुरता मर्यादित नाही. उत्सवाचे स्वरूप आपण कोणत्या दिशेने नेत आहोत, हा त्यामागचा मोठा प्रश्न आहे. ढोल-ताशा वाजविण्यात, लेझीम खेळण्यात, पारंपरिक वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढण्यात आणि गणरायाच्या आरतीत जो उत्साह आहे,तो कोणत्याही आधुनिक ध्वनियंत्रणेच्या दणदणाटात नाही.गणेशोत्सवाची शक्ती त्याच्या आवाजाच्या तीव्रतेत नाही, तर त्यामागील श्रद्धा, शिस्त आणि सामूहिक भावनेत आहे. पुण्यासारख्या सांस्कृतिक राजधानीने तर याबाबत दिशादर्शक भूमिका घेतली पाहिजे. कारण, पुण्याच्या गणेशोत्सवाने संपूर्ण हिंदुस्थानातील सार्वजनिक उत्सवाला विचारांची आणि समाजप्रबोधनाची परंपरा दिली. त्यामुळे पुण्याने 'कोणत्या मंडळाचा किती मोठा आवाज?' याची स्पर्धा करण्याऐवजी 'माझ्या मंडळाचा किती मोठा सामाजिक संदेश?' याची स्पर्धा सुरू केली तर तो खरा पुणे पॅटर्न ठरेल. आजही अनेक गणेश मंडळे कोणत्याही दिखाव्याच्या मागे न लागता उत्तम सामाजिक उपक्रम राबवतात. व्याख्यानमाला, रक्तदान, आरोग्य शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवरील देखावे अशा माध्यमातून समाजाशी जोडली जातात. अशा मंडळांनी गणेशोत्सवाची प्रतिष्ठा टिकवून ठेवली आहे. त्यांच्या वाटेवर इतर मंडळांनीही चालण्याची गरज आहे. आवाजाची मर्यादा पाळण्याचे आवाहन झाले की काही मंडळे नाराज होतात;परंतु नियम हे उत्सव बंद करण्यासाठी नसतात, उत्सव अधिक शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक करण्यासाठी असतात. प्रशासनानेही या बाबतीत दुहेरी भूमिका घेऊ नये. नियम असतील तर त्यांची अंमलबजावणी सर्वांवर समान झाली पाहिजे. लोकप्रतिनिधी कोणत्याही पक्षाचा असो किंवा मंडळाचा प्रभाव कितीही असो, नियमभंगाला पाठीशी घालण्याची परंपरा रुजू नये.

उत्सवाच्या नावाखाली प्रचंड ध्वनिवर्धक, डोळ्यांना त्रासदायक प्रकाशयोजना, लेझर आणि अन्य साधनांचा अनावश्यक वापर करण्यापेक्षा आपल्या परंपरेतील साधेपणातला उत्साह जपला, तर गणेशोत्सव अधिक अर्थपूर्ण होईल. ढोल-ताशा, लेझीम, भजन-कीर्तन, आरती, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजप्रबोधन यांच्यातूनही उत्सवाचा जल्लोष कमी होत नाही. उलट, त्याला संस्कारांची किनार लाभते.

गणराया हा बुद्धीचा आणि विवेकाचा देव मानला जातो. मग त्याच गणरायाच्या उत्सवात विवेकाला जागा नसावी का? भक्ती दाखवण्यासाठी ध्वनीची पातळी वाढवण्याची आवश्यकता नाही. श्रद्धेची खोली डेसिबलमध्ये मोजता येत नाही. बाप्पाप्रती असलेली आस्था स्पीकरच्या क्षमतेवर अवलंबून नसते. महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाने देशाला दिशा दिली आहे. आज पुन्हा एकदा महाराष्ट्रानेच एक आदर्श घालून देण्याची वेळ आली आहे. 'कमी आवाज, अधिक संस्कार; कमी दिखावा, अधिक समाजप्रबोधन' अशी उत्सवाची नवी ओळख निर्माण झाली, तर गणेशोत्सवाची परंपरा अधिक समृद्ध होईल. गणेश मिरवणुकीचा आनंद प्रत्येकाला मिळायला हवा. त्या आनंदात भक्ती असावी, संस्कृती असावी, शिस्त असावी आणि समाजाचा विचार असावा. ढोल-ताशांचा नाद महाराष्ट्राच्या परंपरेचा आहे; भजन-कीर्तनाची भक्ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे. मग या सगळ्यांना मागे सारून कर्णकर्कश आवाजालाच गणेशोत्सवाचे प्रमाणपत्र देण्याचा हट्ट कशासाठी?

**सुहास शेलार**

# शेतकरी नवरा नको?

कृषिप्रधान देशामध्ये शेतकऱ्यांविषयी नकारात्मक भावना वाढीस लागली आहे की काय, अशी शंका निर्माण होत आहे. कारण राज्यातील अनेक भागात सध्या हजारो शेतकरी तरुणांना लग्नासाठी मुली न मिळणे ही एक ज्वलंत सामाजिक समस्या झाली आहे. मग तो शेतकरी बागायतदार किंवा शेतमजूर असो. ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये लग्नाचे वय उलटून गेलेले तरुण दिसून येत आहे. आपल्या मुलीला सुयोग्य जोडीदार शोधण्यासाठी पालक प्रयत्नशील असले तरी त्यांचाही ओढा शहरातील सोयरीक करण्याकडे आढळत आहे. एकीकडे समाजातील स्त्री जन्माचे प्रमाण वेगाने घटत आहे, तर दुसरीकडे उपवर मुलांना उपवर मुली मिळणे अवघड झाले आहे. यावरून शेतकरी वर्गाच्या समस्यां कितीपटीने वाढत चालल्या आहेत याची कल्पना येते.नैसर्गिक संकटामुळे शेतीचे उत्पन्न सतत घटत चालले आहे. त्याचबरोबर उत्पन्न झाले तरी त्याला बाजारपेठेत योग्य दर मिळेलच याची खात्री राहिलेली नाही. म्हणून बेभरवशाचे शेतकरी जीवन मुलींना नकोसे वाटणे साहजिक बाब आहे. यासाठीच शेतकरी नवरा नाकारला जात आहे.

प्रत्येक मुलीला आज शहरात राहणारा नोकरदार मुलगा पाहिजे आहे. शासकीय आणि खासगी क्षेत्रातील नोकऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटलेले असताना सर्वानाच नोकऱ्या मिळणे अशक्य झाले आहे. त्यामुळे एखादा मुलगा जर स्वतःच्या पायावर उभा राहून घर चालवत असेल तर अशा स्वावलंबी युवकांची निवड करायला हरकत नाही. २०१२ मध्ये राज्यातील एका शहरात युवकांनी मुली देता का हो मुली अशी मागणी करत मोर्चा काढला होता. मुख्यमंत्र्यांनीही या लग्नाळू तरुणांनी जाहीर आवाहन केले होते. शेतकरी आई-बापाच्या पोटी जन्म घेणे चूक आहे का, असाही सवाल सध्या उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांविषयी नकारात्मक भावना केवळ मुलींचीच नाही तर त्यांच्या पालकांचीही झाली आहे. शेती व्यवसायात लाखो रुपये कमावणाऱ्या कुटुंबातही मुली देण्यास पालक वर्ग कचरत आहे. एकेकाळी उत्तम शेती, माध्यम नोकरी, कनिष्ठ व्यापार अशी आपल्या समाजाची धारणा होती. मात्र, आता शेती कनिष्ठच नव्हे तर टाकाऊ झाल्याचे विदारक चित्र आहे. या समस्येकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक ठरेल, अन्यथा समाजाचा ऱ्हास होणे अटळ आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

# स्क्रीनच्या जाळ्यात बालपण

बालपण म्हणजे अंगणातली धावपळ, मातीचे खेळ, मित्रांसोबतची धमाल, गोष्टी ऐकताना मोठे झालेले डोळे, पुस्तकांच्या पानांमधून उघडणारे कल्पनाविश्व आणि संध्याकाळ झाली की आईच्या हाकेसोबत घरी परतणे. आता या चित्रात एक नवा घटक कायमचा सामील झाला आहे मोबाईल. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत त्याची सोबत. नाश्ता करताना चित्रफीत, जेवताना चित्रफीत, रडताना फोन, कंटाळा आला की पुन्हा तोच पडदा आणि झोपताना शेवटची नजरही त्याच्यावर.

मुलांच्या हातात मोबाईल येणे ही आता अपवादाची गोष्ट राहिलेली नाही. उलट, अनेक घरांमध्ये तो दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मुलाला शांत करण्यासाठी फोन देणे पालकांसाठी सोपे झाले आहे. काही मिनिटांसाठी त्याचं लक्ष दुसरीकडे वळते, घरात शांतता निर्माण होते आणि मोठ्यांना आपली कामे करता येतात. मात्र ही शांतता जितकी सोयीची वाटते, तितकाच तिच्यामागचा परिणाम गंभीर असू शकतो. मुलाला शांत बसण्याची सवय लागते; त्याच वेळी उत्सुकता, हालचाल, संवाद आणि स्वतःहून काहीतरी शोधण्याची वृत्ती कमी होण्याची शक्यता असते. आजची चिमुकली मुले समाजमाध्यमांवरील प्रत्येक नवा कल काही क्षणांत आत्मसात करतात. एखाद्या लोकप्रिय गाण्याची चाल, एखादा संवाद, एखादी नृत्याची हालचाल किंवा एखाद्या व्यक्तीची नक्कल ते इतक्या सहजतेने करतात की मोठ्यांनाही आश्चर्य वाटते. त्यांच्या स्मरणशक्तीचे आणि निरीक्षणशक्तीचे कौतुक होते. पण या कौतुकाच्या पलीकडे एक वेगळीच वस्तुस्थिती उभी राहते. लहान वयातच त्यांची कल्पनाशक्ती तयार करून देणाऱ्या डिजिटल विश्वावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढते. स्वतःचा खेळ शोधण्याऐवजी तयार मनोरंजन पाहण्याची सवय लागते आणि प्रत्यक्ष अनुभवांपेक्षा पडद्यावर दिसणाऱ्या जगाला अधिक महत्त्व मिळू लागते.

बालपणाला मोकळीक हवी असते. त्याला कंटाळा हवा असतो; त्यातूनच कल्पना जन्माला येतात. त्याला माती लागते, त्यातून जगाशी नाते तयार होते. त्याला धावायचे असते, पडायचे असते, पुन्हा उठायचे असते. मित्रांसोबत भांडायचे आणि काही वेळाने पुन्हा खेळायचे असते. या सगळ्या अनुभवांतून व्यक्तिमत्त्व घडते. सतत पडद्यासमोर बसलेले आयुष्य मात्र या नैसर्गिक अनुभवांपासून हळूहळू दूर जाऊ शकते. याचा परिणाम केवळ शारीरिक हालचालींवर होत नाही. मानसिक जगावरही डिजिटल साधनांचा प्रभाव पडतो. सतत बदलणाऱ्या चित्रांमुळे आणि झपाट्याने मिळणाऱ्या



मनोरंजनामुळे एकाग्रतेची सवय बदलू शकते. अभ्यास, पुस्तक वाचन किंवा एखादे काम शांतपणे करण्यासाठी लागणारा संयम कमी होऊ शकतो. झोपेच्या वेळेवर परिणाम होण्याची शक्यता असते. प्रत्यक्ष संवादाची जागा आभासी संवाद घेऊ लागतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तुलना, मान्यता आणि लोकप्रियतेची एक नवी स्पर्धा अगदी लहान वयातच मनात प्रवेश करू शकते.

मुलांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न त्यामुळे अधिक गंभीर बनतो. आज मानसिक ताण, अस्वस्थता, एकटेपणा आणि भावनिक असुरक्षितता यांसारख्या समस्या केवळ मोठ्यांपुरत्या मयादित राहिलेल्या नाहीत. त्यांच्या जगातही अनेक प्रकारचे मानसिक दबाव प्रवेश करत आहेत. त्यात डिजिटल विश्वाचा अतिरेक आणखी एक घर जोडतो. हातात फोन असताना मूल व्यस्त दिसते, पण व्यस्त असणे आणि आनंदी असणे यात मोठा फरक आहे. पडद्यावरच्या चित्रफिती हसवू शकतात; मात्र आई-वडिलांचा संवाद, मित्रांची साथ आणि माणसांचा सहवास देऊ शकत नाहीत.

आजच्या काळात तंत्रज्ञानापासून मुलांना पूर्णपणे दूर ठेवणं शक्यही नाही आणि योग्यही नाही. शिक्षण, माहिती, सर्जनशीलता आणि नव्या संधींसाठी डिजिटल साधनांचा योग्य वापर निश्चितच उपयुक्त आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेपासून ऑनलाइन शिक्षणापर्यंत अनेक गोष्टी त्यांच्या ज्ञानविश्वाला विस्तार देऊ शकतात. मात्र साधन आणि सवय यांच्यातला फरक जपणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान त्यांच्या विकासासाठी वापरले गेले पाहिजे; त्यांचा वेळ, लक्ष आणि भावविश्व त्याच्या हवाली केले जाऊ नये.

यासाठी सर्वांत मोठी जबाबदारी पालकांची आहे. मुलाच्या हातातून फोन हिसकावून घेण्यापेक्षा त्याच्या आयुष्यात त्यापेक्षा अधिक सुंदर पर्याय निर्माण करावे लागतील. घरात संवाद वाढवावा लागेल. मुलांसोबत खेळावे लागेल. पुस्तके वाचावी लागतील. त्यांना निसर्गाच्या जवळ न्यावे लागेल. त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टी ऐकून घ्याव्या लागतील. स्वतःची कल्पना मांडण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतःहून काहीतरी करण्याची संधी त्यांना द्यावी लागेल.

यात पालकांचे स्वतःचे वर्तनही तितकंच महत्त्वाचे आहे. मोठी माणसे सतत फोनमध्ये गुंतलेली असतील आणि मुलांना पडद्यापासून दूर राहण्याचा सल्ला देतील, तर तो फार काळ टिकणार नाही. मुले सूचना ऐकण्यापेक्षा अनुकरणातून अधिक शिकतात. त्यामुळे घरात 'स्क्रीनची शिस्त' निर्माण करण्याची सुरुवात मुलांपासून नव्हे, तर मोठ्यांपासून व्हायला हवी.

आजची पिढी डिजिटल युगात जन्माला आली आहे. तिच्या हातात मोबाईल असणारच; पण त्या मोबाईलसोबत तिच्या हातात पुस्तकही असावे, खेळण्याची मोकळीकही असावी, मातीचा स्पर्शही असावा आणि माणसांच्या नात्यांची ऊबही असावी. तिच्या डोळ्यांत स्क्रीनचा प्रकाश असण्यापेक्षा जग पाहण्याची चमक असावी. कारण बालपण पुन्हा मिळत नाही.

मोबाईलवरची चित्रफीत पुन्हा पाहता येते, एखादी रील पुन्हा बनवता येते, लोकप्रिय कल पुन्हा करता येतो; पण अंगणात धावत गेलेले बालपण, आईच्या मांडीवर ऐकलेली गोष्ट, मित्रांसोबत खेळलेली संध्याकाळ आणि निरागसपणे जगलेले ते क्षण पुन्हा निर्माण करता येत नाहीत. म्हणून मुलांच्या हातातला मोबाईल काढून घेण्याची नव्हे, त्यांच्या आयुष्यात त्यापेक्षा मोठे आणि सुंदर जग उभे करण्याची गरज आहे. तंत्रज्ञान त्यांच्या भविष्यासाठी साधन ठरावे; त्यांच्या बालपणाचा मालक नाही.

स्क्रीनचा प्रकाश त्यांच्या डोळ्यांपर्यंत पोहोचू दे, पण त्यांच्या मनावर सावली होऊ देऊ नका. उद्याची सक्षम, संवेदनशील आणि आनंदी पिढी घडवायची असेल, तर आज तिचे बालपण जपणे हीच आपली सर्वांत मोठी जबाबदारी आहे.

**साक्षी माने**

# पीआरसी आज जिल्हा परिषदेत धडकणार; ‘फाईल’ उघडणार, जबाबदारी ठरणार?

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पंचायती राज समितीचा तीन दिवसीय अकोला दौरा बुधवारपासून सुरू होत असून, जिल्हा परिषदेच्या कारभाराची झाडाझडती घेतली जाणार आहे. समितीचे अध्यक्ष आमदार संतोष दानवे यांच्यासह सदस्य व मंत्रालयीन अधिकारी अकोल्यात दाखल झाले आहेत. समितीच्या दौऱ्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाची गेल्या काही दिवसांपासून जोरदार तयारी सुरू असून, कोणत्या विभागावर आणि कोणत्या प्रकरणावर समितीची नजर पडते, याची धाकधूक अधिकाऱ्यांना लागली आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीच्या सन २०२१-२२ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालासह सन २०२४-२५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या अनुषंगाने समिती जिल्हा परिषदेला भेट देणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांची साक्ष घेण्यात येणार आहे. त्यानंतर समितीची दोन ते तीन पथके तयार करून पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा परिषद शाळा आणि ग्रामपंचायतींची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. बुधवारी सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे विधानसभा व विधान परिषद सदस्यांशी अनौपचारिक चर्चा होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली जाणार असून, पंचायत समित्यांनाही भेटी दिल्या जाणार आहेत. गुरुवारी विविध पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायतींची पाहणी केली जाईल. शुक्रवारी वार्षिक प्रशासन अहवालाच्या अनुषंगाने पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष होणार आहे.

## काळेगाव–भोकर रस्ता प्रकरण ऐरणीवर; तृतीय तपासणी अहवालामुळे अधिकाऱ्यांची धाकधूक



### समितीत कोण कोण?

पीआरसीचे अध्यक्ष आमदार संतोष दानवे असून समितीत आमदार सुरेश धस, महेश लांडगे, प्रताप अडसड, सुनील कांबळे, अभिमन्यू पवार, संजय पुराम, गोपीचंद पडळकर, शिवाजी पाटील, दीपक केसरकर, निलेश राणे, संजय गायकवाड, रमेश बोरनारे, विजय सिंह पंडित, नितीन पवार, दिलीप सोपल, नितीन देशमुख, संजय मेश्राम, संदीप क्षीरसागर, डॉ. परिणय फुके, डॉ. मनीषा कायंदे, विक्रम काळे व जयंत आसगावकर यांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब देशमुख, योगेश टिळेकर आणि सदाशिव खोत हे निमंत्रित सदस्य आहेत.

### ‘त्या’ फाईलवर समितीची नजर पडणार?

पीआरसीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाकडून विविध विभागांच्या नोंदी, अहवाल व कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. मात्र, केवळ कागदोपत्री माहितीवर समिती समाधान मानणार की प्रत्यक्ष पाहणीदरम्यान वस्तुस्थिती तपासणार, याकडे लक्ष लागले आहे. विशेषतः काळेगाव-भोकर रस्ता प्रकरणातील तृतीय तपासणी अहवाल समितीसमोर मांडला जातो का, संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होतात का आणि प्रशासनाने केलेल्या कारवाईची माहिती मागविली जाते का, याची उत्सुकता आहे. तीन दिवसांच्या या दौऱ्यात जिल्हा परिषदेच्या कारभारातील कोणते ‘गुपित’ समोर येते आणि कोणाची जबाबदारी निश्चित होते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### काळेगाव- भोकर रस्ता प्रकरण चर्चेत

गेल्या दोन महिन्यांपासून जिल्हा परिषदेत गाजत असलेल्या काळेगाव-भोकर रस्ता प्रकरणामुळे पीआरसीच्या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रकरणाचा तृतीय तपासणी अहवाल नुकताच प्राप्त झाला असून, रस्त्याच्या कामात अनियमितता आढळल्याचा दावा तक्रारदार अरविंद पाटील यांनी केला आहे.

या प्रकरणी संबंधित कनिष्ठ अभियंता व उपअभियंत्यांना जिल्हा परिषदेने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. त्यांची मुदतही आता संपली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले खुलासे प्रशासनाकडे सादर केले असले तरी त्यावर अद्याप काय निर्णय घेण्यात आला, हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे तपासणी अहवाल, अधिकाऱ्यांचे खुलासे आणि प्रशासनाची कारवाई याबाबत पीआरसीकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तक्रारदार अरविंद पाटील यांनी या प्रकरणासंदर्भातील अहवाल व तक्रार पंचायती राज समितीकडे सादर केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी तसेच संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# अतिरिक्त तहसीलदारांच्या शासकीय वाहनाला वाळू माफियांच्या ट्रकची धडक



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

अवैध वाळू उपशावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकाच्या अंगावरच वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकने वाहन घातल्याची धक्कादायक घटना लोणसना शिवारात घडली. अतिरिक्त तहसीलदारांच्या शासकीय वाहनालाच थेट धडक देत ट्रक चालकाने घटनास्थळावरून पोबारा केल्याने अवैध वाळू वाहतूकदारांची मुजोरी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे.

अतिरिक्त तहसीलदार गिरीजादेवी लोखंडे यांना गोपनीय सूत्रांकडून कोळसरा व लोणसना परिसरात नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी दोन तलाठी आणि एका शिपायाचे पथक तयार केले. लोखंडे स्वतः शासकीय वाहन क्रमांक एमएच-३० सीबी-२८८४ मधून रात्रीच्या वेळी पथकासह परिसराची पाहणी करीत होत्या. दरम्यान, लोणसना शिवारात विना क्रमांकाचा ट्रक वाळूची वाहतूक करताना आढळून आला. महसूल पथकाने ट्रक थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने वाहन न थांबविता भरधाव वेगाने पुढे नेत थेट अतिरिक्त तहसीलदारांच्या शासकीय वाहनाला समोरून धडक दिल्याचा आरोप आहे. धडकेनंतर चालकाने ट्रकसह घटनास्थळावरून पळ काढला.

## कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकावर हल्ल्याचा प्रयत्न; माना पोलिसांत गुन्हा दाखल, चालक फरार

महसूल विभागाचे पथक अवैध वाळू वाहतुकीवर कारवाईसाठी गेले असताना शासकीय वाहनालाच धडक देण्याच्या या प्रकारामुळे प्रशासनाच्या कारवाईला थेट आव्हान देण्याची मानसिकता असल्याची चर्चा सुरू झाली आहे. अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांनाच जर अशा प्रकारे लक्ष्य केले जात असेल, तर सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त तहसीलदार लोखंडे यांनी माना पोलिसांना कळविले. त्यानंतर संबंधित ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार चालकाचा शोध सुरू आहे.

### या घटनेची पुसटशीही कल्पना का नाही?

या घटनेनंतर महसूल विभागातील अंतर्गत कारभाराबाबतही चर्चा रंगली आहे. एरवी कारवाईची माहिती ‘टाईप केलेली बातमी’ म्हणून पाठविण्यात येते. मात्र, शासकीय अधिकाऱ्याच्या वाहनालाच ट्रकने धडक दिल्याची गंभीर घटना घडूनही तिची पुसटशी कल्पनाही देण्यात आली नाही, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती दडविण्यामागे नेमके कारण काय, असा सवालही उपस्थित केला जात आहे. अवैध वाळू वाहतुकीविरोधातील कारवाईदरम्यानच महसूल अधिकाऱ्यांच्या वाहनाला धडक देण्याचा प्रकार घडल्याने आता प्रशासन फरार चालकासह संबंधित ट्रक व त्यामागील यंत्रणेपर्यंत पोहोचते का, याकडे लक्ष लागले आहे.

# अकोला जिल्ह्यात प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध



■ प्रतिनिधी | अकोला ■

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ अंतर्गत अकोला जिल्ह्यातील प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. अकोट, बाळापूर, अकोला (पश्चिम), अकोला (पूर्व), मुर्तिजापूर या पाच विधानसभा मतदारसंघांतील एकूण १३ लाख १८ हजार ६५२ मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश आहे. प्रारूप मतदार यादीतील नोंदींबाबत दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व पात्र मतदारांनी उपरोक्त कालावधीत दावे व आक्षेप संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक नोंदणी अधिकारी यांच्याकडे नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

**मतदारसंघनिहाय मतदार संख्या**

प्रारूप मतदार यादीनुसार अकोट विधानसभा मतदारसंघात १ लाख ३९ हजार ७५७ पुरुष, १ लाख २५ हजार ७०२ महिला आणि ४ इतर असे एकूण २ लाख ६५ हजार ४६३ मतदार आहेत. बाळापूर विधानसभा मतदारसंघात १ लाख ४१ हजार ४३९ पुरुष, १ लाख ३० हजार ३५९ महिला आणि ०१ तृतीयपंथी, असे एकूण २ लाख ७१ हजार ७९९ मतदार आहेत. अकोला (पश्चिम) विधानसभा मतदारसंघात १ लाख २१ हजार ४१० पुरुष, १ लाख १७ हजार १९९ महिला आणि १३ तृतीयपंथी, असे एकूण २ लाख ३८ हजार ६२२ मतदार आहेत. अकोला (पूर्व) विधानसभा मतदारसंघात १ लाख ४२ हजार १८५ पुरुष, १ लाख ३२ हजार ७०८ महिला, आणि १२ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ७४ हजार ९०५ मतदार आहेत.

मुर्तिजापूर विधानसभा मतदारसंघात १ लाख ३८ हजार ६१४ पुरुष, १ लाख २९ हजार २४७ महिला आणि २ तृतीयपंथी असे एकूण २ लाख ६७ हजार ८६३ मतदार आहेत.

जिल्ह्यात एकूण ६ लाख ८३ हजार ४०५ पुरुष, ६ लाख ३५ हजार २१५ महिला आणि ३२ तृतीयपंथी, असे एकूण १३ लाख १८ हजार ६५२ मतदार प्रारूप मतदार यादीत समाविष्ठ आहेत.

# एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सची चमकदार कामगिरी

## सीएटीसी- ११४ कॅम्पमध्ये तब्बल आठ पदकांची कमाई



■ प्रतिनिधी | अकोला ■

११ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, अकोला यांच्या वतीने आयोजित सीएटीसी-११४ कॅम्पमध्ये एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सनी उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल आठ पदकांची कमाई केली. २१ ते ३० ऑगस्टदरम्यान आयोजित या कॅम्पमध्ये १२ शाळा व सात महाविद्यालयांतील सुमारे ३५० कॅडेट्स सहभागी झाले होते. बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विकास शर्मा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कॅम्पमध्ये ऑब्स्टकल, फायरिंग, ड्रिल, प्रश्नमंजुषा, वादविवाद, निबंध, चित्रकला यासह विविध सांस्कृतिक व कौशल्याधारित स्पर्धा घेण्यात आल्या. एल.आर.टी. महाविद्यालयाचा सिनियर अंडर ऑफिसर आदित्य टाले याने कंपनी कमांडर आणि बेस्ट कॅडेट या दोन्ही विभागांत सुवर्णपदक पटकावले. कॅडेट जय तायडे याने प्रश्नमंजुषेत सुवर्ण, तर ड्रिल कमांडरमध्ये रौप्यपदक मिळविले. कॅडेट आदित्य मोते याने निबंध स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

याशिवाय कॉर्पोरल निखिल मोरया याने मेस कमांडर स्पर्धेत, कॅडेट आयुष कुलकर्णी याने वादविवादात आणि कॅडेट प्रथमेश वसतकार याने चित्रकला स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. कॅडेट्सच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. यशस्वी कॅडेट्सचा महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे आणि एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कॅडेट्सच्या या यशाबद्दल दि. बी.जी.ई. सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. मोतीसिंहजी मोहता, मानद सचिव डॉ. पवनजी माहेश्वरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी अभिनंदन केले.

# श्री नागनाथ महाराजांचा आज यात्रा महोत्सव

**अकोला :** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कुंभारी गावातील अतिशय प्राचीन व जागृत देवस्थान श्री नागनाथ महाराज संस्थानच्या यात्रा महोत्सवाचे आयोजन २ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडविणाऱ्या या यात्रा महोत्सवाची ग्रामस्थांसह परिसरातील भाविकांना उत्सुकता लागली आहे.

यात्रेनिमित्त दिवसभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता ध्वजारोहण, त्यानंतर विधिवत पूजन व सामूहिक आरती करण्यात येणार आहे. भक्तिमय वातावरणात पार पडणाऱ्या या धार्मिक सोहळ्यानंतर दुपारी १२.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.

दरम्यान, श्री नागनाथ महाराज भजन मंडळ, कुंभारी यांच्या वतीने बहारदार भक्तिगीतांचा कार्यक्रम सादर केला जाणार असून, भक्तिरसात चिंब होण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.


## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४२८/२०२६ — प्रोसेस नं.१०७८३/२०२६
चौ.ता. ०७/१०/२०२६ — दिनांक : २१/०८/२०२६

**अर्जदार :** १. राजेश बलवंतसिंग निंबे रा. रूईकर मंडप जवळ, देशमुख फैल, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. रेखा गुलाबचंद निम रा. २६९, बलदा कॉलनी, इंदौर सिटी, मध्यप्रदेश. ३. सौ. लता हरीष यादव रा. १६९बी, गुरूशंकर नगर, लाल बाउंड्री, इंदौर, मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मीबाई बळवंतसिंग निंबे
**पत्ता :-** रा. नवीन तारफैल, रूईकर मंडप जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मीबाई बळवंतसिंग निंबे यांचे दि. १५/०४/२०२३ रोजी नविन तारफैल, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५३३/२०२४ — प्रोसेस नं.११०६४/२०२६
चौ.ता. ११/०९/२०२६ — दिनांक : ३१/०८/२०२६

**अर्जदार :** १. सुनिल मदनलाल चिराणीया, वय अं. ५० वर्षे, धंदा- व्यापार, रा. लक्कड गंज माळीपुरा, अकोला, ता. जि. अकोला.
२. सौ. पिंकी पंकज अग्रवाल (लग्नापुर्वीचे नाव- पिंकी मदनलाल चिराणीया) वय अं. ४६वर्षे, धंदा- घरकाम, रा. सराफ गल्ली, खामगांव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मदनलाल श्रीगोपाल चिराणीया २. पुष्पलता मदनलाल चिराणीया
**पत्ता :-** रा.लक्कड गंज माळीपुरा, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क्र.१. मदनलाल श्रीगोपाल चिराणीया यांचे दि.१९/०६/१९८६ रोजी अकोला येथे व मयत क.२. पुष्पलता मदनलाल चिराणीया यांचे दि.१८/०९/२०२३ रोजी अकोला येथें निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, प्रदीप रामचंद्र राठी रा. मु. रामदासपेठ अकोला, ता., जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की त्यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. २०३ /१९८३ दिनांक २१/०१/१९८३ या क्रमाकाचे मूळ खरेदी खत खामगाव ला कुठेतरी गहाळ झाले आहे. या बाबत ची तक्रार प्रदीप रामचंद्र राठी यांनी पो. स्टेशन खामगाव शहर/ग्रामीण येथे दि. २८/०८/२०२६ रोजी दिली आहे. प्रदीप रामचंद्र राठी यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- प्लॉट. क्र. १३४ ते १३६ आणि १४५ ते १४७, गट नो. १०४, मौजे - कोक्ता, ता. खामगाव, जी. बुलढाणा ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ ८५३.७५ चौ. मीटर, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चीमेस – ६ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. १३७ आनी १४४, दक्षिणेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता, या वर्णनाची मालमत्ता प्रदीप रामचंद्र राठी यांचे मालकीची आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून प्रदीप रामचंद्र राठी हे पूनावाला फाईनकॉर्प ली. कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- ०१/०९/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**अ‍ॅड. अजय. वा. गोडे**
शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला,
ता. जि. अकोला, मो.क्र. ९१७५९३८२४२

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१९/२०२६ — प्रोसेस नं.१०१९३/२०२६
चौ.ता. १७/०९/२०२६ — दिनांक : ०७/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती जया अरूण सोनटक्के २. निखिल अरूण सोनटक्के दोघेही रा. संताजी नगर, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. प्राजक्ता प्रविण जावरे रा. अब्दुल हमिद चौक, कालीपुरा, ता. मलकापूर, जि. बुलढाणा. ४. रामकुमार अरूण सोनटक्के रा. संताजी नगर, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ५. श्रीमती. सिमा सुभाष सोनटक्के ६. आकाश सुभाष सोनटक्के क्र. ५ व ६ रा. संताजी नगर, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ७. सौ. अश्विनी गौरव झागडे रा. देशमुख पुरा, बेलोरा, जि. अमरावती. ८. सौ. मिनाबाई किशोर भिरड रा. बाळापूर रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ९. सौ. संध्या देविदास बोबडे रा. बाभुळगाव जहागिर, अकोला. ता. जि. अकोला. १०. सौ. प्रभा संतोष बोरखाडे रा. बानोसा, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामदास गोविंद सोनटक्के २. सरस्वती रामदास सोनटक्के
**पत्ता :-** रा. संताजी नगर, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास गोविंद सोनटक्के यांचे दि. ३१/१२/२००८ रोजी व मयत सरस्वती रामदास सोनटक्के यांचे दि. ०४/०१/२०१७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकंत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## Change In Name

I have change my name From
" IRSHAD AHMED
(As per Old Passport Name/ Wrong ame)
-TO- IRSHAD AHMED ZAHEER AHMED
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar) “S/O ZAHEER BHAI JELABI WALE TELIPURA ROAD AKOLA Passport No. "M6739418" FILE NO. NG1068355812014"



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com



## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ११७/२०२६ — प्रोसेस नं.११७२/२०२६
चौ.ता. ०९/१०/२०२६ — दिनांक : ३१/०८/२०२६

**अर्जदार :** १. सुधाकर मोतीराम राऊत, वय ६४ वर्ष, धंदा शेती, रा. गंवडाळा, ता. खामगाव, जि. बुलढाणा ह.मु. मळसुर, ता. पातूर, जि. अकोला २. दिलीप मोतीराम राऊत, वय ६२ वर्ष, धंदा -शेती, ३. गजानन मोतीराम राऊत, वय - ६८ वर्ष, धंदा - शेती, ४. किशोर मोतीराम राऊत, वय - ६० वर्ष, धंदा — शेती, ५. कौसल्याबाई मोतीराम राऊत, वय ८७ वर्ष, धंदा शेती, अनुक्रमांक २ ते ५ रा. मौजा मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
मयताच्या घराचा पत्ताः- मय्यतः - मोतीराम नामदेव राऊत,
पत्ताः- रा. मौजा मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोतीराम नामदेव राऊत यांचा मृत्यु दि.२०/०८/२०२१ रोजी मळसुर ता. पातुर, जिल्हा अकोला येथे झाला. मयताची आई ही सुध्दा मयत आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- ३१/०८/२०२६
पातुर

शिक्का — **आदेशानुसार** सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४६१/२०२६ — प्रोसेस नं.११०६६/२०२६
चौ.ता. १७/१०/२०२६ — दिनांक : ३१/०८/२०२६

**अर्जदार :** १. सुमन प्रल्हाद माहुरे २. जिजा दादाराव माहुरे दोन्ही रा. मु. चंद्रपूर, पो. खल्लार, ता. दर्यापूर, जि. अमरावती. ३. श्रीमती. किरण प्रकाश ढवळे ४. मंगेश प्रकाश ढवळे ५. पवन प्रकाश ढवळे ६. इंदुबाई अर्जुन ढवळे ७. रमेश अर्जुन ढवळे क्र. ३ ते ७ रा. मु. वल्लभ नगर, पो. सांगवी खुर्द, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. विनोद मेंबर ढवळे रा. मु. वल्लभ नगर, पो. सांगवी खुर्द, ता. जि. अकोला. २. सुशिलाबाई शेषराव ढवळे ३. भिमराव शेषराव ढवळे ४. आकाश शेषराव ढवळे ५. सुरज शेषराव ढवळे क्र. २ तें ५ रा. हिंगणा तामसवाडी, पो. निंभोरा, ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : राधाबाई काशिराम ढवळे
**पत्ता :-** रा. मु. वल्लभ नगर, पो. सांगवी खुर्द, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राधाबाई काशिराम ढवळे यांचे दि. २९/०८/२०१९ रोजी राहते घरी, वल्लभ नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४५०/२०२६ — प्रोसेस नं.१०९५७/२०२६
चौ.ता. १७/१०/२०२६ — दिनांक : २७/०८/२०२६

**अर्जदार :** १. संध्या लक्ष्मण गढे २. तुषार लक्ष्मण गढे दोघेही रा. पोस्टल कॉलनी, व्ही. एच. बी. कॉलनी जवळ, पो. गांधीनगर, मलकापूर, अकोला. ३. रश्मी मनिष भावसार रा. एलआयसी–६२०, ९बी, कस्तुरबा हॉस्पिटल जवळ, साकेत नगर, हुझूर, भोपाळ, एच. ई. हॉस्पिटल ४६२०२४ मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण जानकीरामसा गढे
**पत्ता :-** रा. पोस्टल कॉलनी, व्ही. एच. बी. कॉलनी जवळ, पो. गांधीनगर, मलकापूर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे. की, मयत लक्ष्मण जानकीरामसा गढे यांचे दि. १९/०३/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७ / १० / २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# ८० वर्षांची इमारत विद्यार्थ्यांच्या जीवावर उठली

## आर्वीच्या कन्या शाळेची दुरवस्था १५०० विद्यार्थ्यांची संख्या थेट १५५ वर

### टिनाचे छप्पर गंजले, भिंती जीर्ण, फरशीला भेगा, पावसात वर्गखोल्यांत पाणी, गरीब विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**आर्वी/जनमाध्यम**

शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या आर्वीतील जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाची इमारतच आता विद्यार्थिनींच्या सुरक्षेला धोका ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तब्बल ८० वर्षे जुन्या आणि जीर्ण झालेल्या या इमारतीची अवस्था गंभीर असून नवीन इमारतीचे बांधकाम तातडीने हाती घेण्याची मागणी आता थेट मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

आर्वी तालुक्यातील नांदपूर येथील नागरिक अरविंद लिल्लोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी आर्वी यांच्यामार्फत निवेदन देऊन शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम प्रथम प्राधान्याने सुरू करण्याची मागणी केली आहे.



**छप्पर गंजले, भिंती जीण, फरशीला भेगा**

शाळेचे टिनाचे छप्पर गंजलेल्या अवस्थेत आहे. पावसाचे पाणी थेट वर्गखोल्यांमध्ये शिरते. भिंती जीर्ण झाल्याने बाहेरील प्राणी वर्गखोल्यांमध्ये शिरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. फरशीला मोठमोठ्या भेगा पडल्या असून जुने फर्निचरही जर्जर अवस्थेत आहे.एकंदर परिस्थिती पाहता ही इमारत विद्यार्थिनींसाठी सुरक्षित राहिलेली नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**जीव धोक्यात का**

शासनाकडून शिक्षणासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविल्या जात असताना ८० वर्षे जुन्या शाळेच्या इमारतीकडे दुर्लक्ष का, हा प्रश्न गंभीर आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरही नवीन इमारतीसाठी प्रतीक्षा का करावी लागत आहे, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

**मुख्यमंत्र्यांकडे आता अपेक्षा**

नवीन इमारतीचे बांधकाम प्रथम प्राधान्याने सुरू करून विद्यार्थिनींना सुरक्षित आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी अरविंद लिल्लोरे यांनी केली आहे.एकीकडे मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या घोषणा होत आहेत. दुसरीकडे मुलींना शिक्षण देणारी शाळाच धोकादायक अवस्थेत असेल तर या घोषणांचे वास्तव काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आता मुख्यमंत्री आणि संबंधित प्रशासन या गंभीर प्रश्नावर तातडीने निर्णय घेणार का, याकडे आर्वीकरांचे लक्ष लागले आहे.

**विद्यार्थी संख्या घटली**

दहा वर्षांपूर्वी या शाळेत जवळपास १५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. आज ही संख्या थेट १५५ वर आली आहे. शाळेची जर्जर इमारत हेच विद्यार्थ्यांची संख्या घटण्यामागील प्रमुख कारण असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.परिसरातील अनेक विद्यार्थी सुरक्षित आणि चांगल्या सुविधा असलेल्या शाळांकडे वळत आहेत. मात्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना पर्याय नसल्याने याच धोकादायक इमारतीत शिक्षण घ्यावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

---

### अतिवृष्टीचा तडाखा ; ६६१ शेतकरी भरपाईसाठी पात्र

## ४४७.८७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान; ३८.८७ लाखांचा निधी मंजूर

**वर्धा/जनमाध्यम**

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने दडी मारल्यानंतर जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा फटका बसला. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील ४४७.८७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. या नुकसानीसाठी ६६१ शेतकरी भरपाईसाठी पात्र ठरले असून, शासनाने त्यांच्या मदतीसाठी ३८.८७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

खरीप पिकांची वाढीची अवस्था असतानाच अतिवृष्टीचा तडाखा बसल्याने अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झाले. काही भागांत शेतजमीन खरडून गेल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट निर्माण झाले. सुरुवातीला पावसाने ओढ दिल्याने पेरणीला विलंब झाला होता. त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे उगवलेली पिके बाधित झाली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार महसूल व कृषी विभागाच्या यंत्रणेकडून नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये नुकसानग्रस्त क्षेत्र आणि पात्र शेतकऱ्यांची संख्या निश्चित करण्यात आली. शासनाकडे निधीची मागणी केल्यानंतर ३८.८७ लाख रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी लवकरच पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

अतिवृष्टीचा फटका आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादकांना बसला आहे. तसेच सेलू तालुक्यातील केळी आणि ऊस पिकांचेही नुकसान झाले आहे. या नुकसानीची नोंद घेऊन पात्र शेतकरी आणि नुकसानग्रस्त क्षेत्राचा तपशील यंत्रणेकडून निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे फळबाग उत्पादकांनाही शासकीय मदतीची अपेक्षा आहे.

दरम्यान, एका हंगामात एकाच नुकसानीसाठी निर्धारित दरानुसार दुसऱ्यांदा मदत दिली जाणार नाही, अशी शासनाची अट आहे. ज्या शेतकऱ्यांना याच खरीप हंगामातील आधीच्या पीक नुकसानीपोटी मदत मिळाली आहे, त्यांनी पुन्हा प्रस्ताव सादर केला तरी त्यांना त्याच हंगामासाठी दुसऱ्यांदा लाभ मिळणार नाही. त्यामुळे पात्रतेनुसार मदत वाटप करताना प्रशासनाला या निकषांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागणार आहे.३८.८७ लाखांचा निधी मंजूर झाला असला तरी नुकसानाच्या तुलनेत ही मदत कितपत पुरेशी ठरणार, याकडे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

## संक्षिप्त

### सिगारेटचा धूर उडवण्यास हटकले; युवकाला मारहाण

**सेलू-** सिगारेटचा धूर अंगावर उडवण्यास हटकले म्हणून युवकाला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. ही घटना सेलू येथील मच्छी मार्केट परिसरात घडली. खुशाल हळदे वय २९ रा. जुवाडी हल्ली सेलू हे मित्रासह कामावरून घरी जात होते. यावेळी मच्छी मार्केट परिसरात गर्दी दिसल्याने ते थांबले. तेथे धनराज पचारे आणि त्याचा मित्र अविनाश उर्फ लानच्या हे सिगारेट ओढत उभे होते. धनराज याने खुशाल यांच्याकडे सिगारेटचा धूर उडविला. यावर खुशाल यांनी त्यास हटकले. त्यावरून वाद वाढून दोघांनी खुशाल यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. या घटनेत ते जखमी झाले. तक्रारीवरून सेलू पोलिसांनी धनराज पचारे व अविनाश उर्फ लानच्या यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### जनावरे बांधण्यावरून वाद; मुलाकडून वडिलांना मारहाण

**वर्धा-** घराच्या जागेत जनावरे बांधण्याच्या कारणावरून मुलाने वडिलांशी वाद घालत शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव येथे घडली. प्रकाश तडस यांनी तीन मुलांमध्ये शेती व घराची वाटणी केली आहे. सध्या ते लहान मुलासोबत राहतात. मांडगाव येथील वडिलोपार्जित घरातील अर्धा हिस्सा लहान मुलाला दिल्याने तेथे जनावरे बांधली जातात. देवळी येथे राहणारा मोठा मुलगा सचिन तडस हा घराच्या दुसऱ्या भागात राहतो. जनावरे बांधण्यावरून सचिनने वडिलांशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यास हटकले असता त्याने मारहाण केली. यावेळी एका अल्पवयीनानेही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी सचिन तडस व अन्य एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### हिंगणघाटात चोरट्यांचा धुमाकूळ

**हिंगणघाट-** शहरातील नांदगाव येथील ओमकार नगर परिसरात चोरट्यांनी तीन घरांना लक्ष्य करीत रोख रकमेसह ५१ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. शितल सेंगर या आईकडे गेल्याने त्यांचे घर कुलूपबंद होते. शेजाऱ्यांना घराच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसल्यानंतर त्यांनी त्यांना माहिती दिली. घरी परतल्यानंतर घरातील साहित्य अस्ताव्यस्त असल्याचे आढळले. चोरट्यांनी घरातून ३० हजार रुपये लंपास केले. त्यानंतर शेजारी राहणाऱ्या कल्पना पाटणे यांच्या घरातून ५ हजार रुपये, तर रंजना मेश्राम यांच्या घरातून १६ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. एकाच परिसरातील तीन घरे फोडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### रस्त्याच्या कडेला उभा ट्रक चोरीला

**हिंगणघाट-** रस्त्याच्या कडेला उभा केलेला दहा लाख रुपये किमतीचा ट्रक अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना हिंगणघाट येथील शिवाजी मार्केट परिसरात उघडकीस आली. मनदीपसिंग मजितसिंग रतन यांच्या मालकीचा एमएच ४४ ८९७७ क्रमांकाचा ट्रक शिवाजी मार्केट परिसरात रस्त्याच्या कडेला उभा करण्यात आला होता.

---

# वाघाच्या भीतीत डाकसेवेचा प्रवास; थारला स्वतंत्र डाकघराची हाक

### चार गावांसाठी स्वतंत्र डाकघराची मागणी, वन्यप्राण्यांच्या धोक्यात आठ किलोमीटरचा प्रवास, खा.अमर काळेंकडे साकडे

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

घनदाट जंगलात राहायचे, वन्यप्राण्यांचा धोका पत्करायचा आणि साध्या डाकसेवेसाठीही गाव सोडून मैलोनमैल भटकायचे, अशी अवस्था थारसह परिसरातील ग्रामस्थांची झाली आहे. थार येथे स्वतंत्र डाकघर सुरू करून थार, बोरखेडी, बांबरडा आणि चामला या चार गावांना डाकसेवेचा थेट लाभ द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी खा.अमर काळे यांच्याकडे केली आहे.

थार हे आष्टीपासून अवघ्या आठ किलोमीटरवर असले तरी हा प्रवास नागरिकांसाठी नेहमीच सोयीचा नाही. परिसरात वाघ, अस्वल आणि बिबट्यांचा वावर वाढल्याने महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकऱ्यांना आष्टीला ये-जा करताना जीव मुठीत धरावा लागतो. अशा परिस्थितीत टपाल, बचत खाते, शासकीय कागदपत्रे आणि अन्य डाकविषयक कामांसाठी वारंवार आष्टी गाठण्याची वेळ येत आहे.

डाकसेवेसाठी आठ किलोमीटरचा जीवघेणा प्रवास कशासाठी, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.दरम्यान, चर्चेदरम्यान थार गाव ममदापूर डाकघराला जोडण्यात आल्याचे पोस्टमास्तरांनी सांगितले.

मात्र, ममदापूरही थारपासून सुमारे दहा किलोमीटरवर असल्याने समस्या कायम असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. थार येथे स्वतंत्र डाकघर सुरू करण्यासाठी खासदारांनी केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

### भक्तिसुरांनी दरवळणार देवळी; स्व. गायत्रीदेवी अग्रवाल स्मृती भजन संध्या ४ सप्टेंबरला

## राधाकृष्ण मंदिरात कृष्णजन्म सोहळ्यासह भक्तिगीतांची मैफल

**देवळी/जनमाध्यम**

जन्माष्टमीच्या पावन पर्वावर काळाच्या पडद्याआड गेलेल्या स्व. गायत्रीदेवी मोहनलाल अग्रवाल यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी देवळीत ४ सप्टेंबर रोजी भावभक्तीचा सुरेल जागर रंगणार आहे. देवळी बसस्थानकासमोरील श्री राधाकृष्ण मंदिरात स्व. गायत्रीदेवी अग्रवाल स्मृती भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही अग्रवाल परिवारातर्फे हा भक्तिमय सोहळा आयोजित करण्यात आला असून, देवळीचे सुरसंगम म्युझिकल ग्रुप भगवान गोपाळ कृष्णाच्या जन्मसोहळ्यासह त्यांच्या विविध लीलांवर आधारित हिंदी, मराठी आणि राजस्थानी भक्तिगीते व भजने सादर करणार आहे.



स्व. गायत्रीदेवी अग्रवाल यांचे २००५ मध्ये जन्माष्टमीच्या पर्वावर वृंदावन, जि. मथुरा येथे यमुना नदीत नाव उलटल्याच्या दुर्दैवी घटनेत आकस्मिक निधन झाले.

या हृदयद्रावक घटनेनंतर त्यांच्या पवित्र स्मृती जपण्यासाठी अग्रवाल परिवाराने सुरू केलेली ही भक्तिपरंपरा आज २१ वर्षांनंतरही अखंड सुरू आहे. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ धार्मिक सोहळा न राहता कुटुंबीयांच्या श्रद्धा, प्रेम आणि स्मृतींचा भावस्पर्शी जागर ठरत आहे.

रात्री ९ ते १२ या वेळेत होणाऱ्या कार्यक्रमात राधाकृष्ण नृत्य, रासगरबा, झुला दर्शन, आरती, प्रसाद व अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले आहे. तबल्यावर प्रशांत खाडे, ऑक्टोपॅडवर श्रीहरी भगत, ऑर्गनवर सतीश खांडेकर, तर गायक कलाकारांची बाजू प्रभाकर वराडे सांभाळणार आहेत. गायिका दिव्या शिंदे आणि संध्या रोहनकर, कळंब यांचीही भक्तिगीतांची मैफल रंगणार आहे.या भक्तिमय सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भगवान श्रीकृष्णाच्या भक्तिरसाचा आनंद घ्यावा, असे आवाहन गायत्रीदेवी अग्रवाल सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

---

## आईला शिवीगाळ करताना हटकले; मुलाचा वडिलांवर कैचीने वार

**समुद्रपूर-** आईला शिवीगाळ करून धमकी देणाऱ्या मुलाला हटकणे वडिलांना महागात पडले. मुलाचे वडिलांवर कैचीने वार केल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील डोंगरगाव येथे घडली. सुनील भटकर यांचा मुलगा राम भटकर हा आईला शिवीगाळ करीत धमकी देत होता. यावेळी सुनील भटकर यांनी मुलाला हटकले. त्याचा राग आल्याने राम याने वडिलांवर कैचीने वार केला. या हल्ल्यात सुनील भटकर जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी राम भटकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कौटुंबिक वादातून घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात चर्चा रंगली. प्रकरणाचा पुढील तपास समुद्रपूर पोलिस करीत आहेत.

---

## हर हर महादेवच्या जयघोषात कावड यात्रा भक्तिभावात

### एकांतश्वर मंदिरातून यात्रेला उत्साहात प्रारंभ

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

भगवे ध्वज, सजविलेल्या कावडी आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने सिंदी रेल्वे शहरातील वातावरण भक्तिमय झाले. येथील एकांतश्वर मंदिरातून कावड यात्रेला उत्साहात प्रारंभ झाला. मंदिर समितीचे कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत यात्रेचा भक्तिभाव वाढविला. मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ बावनकर, नैनेश्वर महाकाळकर यांच्यासह विविध प्रभागांतील पुरुष व महिला या यात्रेत सहभागी झाले होते.



पारंपरिक वेशभूषा, भगवे ध्वज आणि आकर्षक कावडींमुळे यात्रेने शहराचे लक्ष वेधून घेतले. धार्मिक घोषणांनी परिसर दुमदुमून गेला एकांतश्वर मंदिरातून निघालेली कावड यात्रा मुख्य मार्गाने बाजार चौक, बसस्थानक, सोना माता मंदिर आणि साईबाबा मंदिर मार्गे मार्गक्रमण करीत पुन्हा एकांतश्वर मंदिरात पोहोचली. यावेळी मार्गावर नागरिकांनी यात्रेचे स्वागत केले.यात्रेच्या सांगतेनंतर मंदिर परिसरात भजनासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भक्तिगीत आणि भजनांच्या सुरांनी वातावरण अधिकच प्रसन्न झाले. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत धार्मिक परंपरेचा जागर केला.

---

**नावात बदल**

माझे पूर्वी SHAIKH SAFINA MOHD JAFAR असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील SHABINA SAJID SHEIKH नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: - शास्त्री नगर हिंगणघाट जिल्हा वर्धा ४४२३०१**

**नावात बदल**

माझे पूर्वी MUSTAFA HAJI YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील GULAM MUSTAFA YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : शास्त्री नगर आर्णी जिल्हा, यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पूर्वी NAUSHIN MUSTAFA NAGANI असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील NAUSHIN GULAM MUSTAFA NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर L5135596 वरील माझे NOORJAHAN BEGUM ABDUL RAJJAK असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील NURJAHA ABDUL RAJJAK नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : सिंदी रेल्वे ता सेलू जिल्हा वर्धा ४४२१०५**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर U9927885 वरील माझे MOHAMMAD HAIDAR MUSTAFA NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील HAIDAR GULAM MUSTAFA NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : शास्त्री नगर आर्णी**

---

# हिंगणघाटत तरुणांच्या हाताला काम कधी मिळणार

### उद्योग नाही, उच्च तंत्रशिक्षण नाही; शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली विकासाच्या घोषणांचा धुरळा, वास्तव मात्र भयावह

**हिंगणघाट/जनमाध्यम**

एकीकडे विकासाच्या घोषणा आणि दुसरीकडे बेरोजगारी, शिक्षणाची वानवा आणि निकृष्ट विकासकामांचा सामना करणारा हिंगणघाटचा युवा आज अस्वस्थ आहे. कामगार वर्ग रोजगाराच्या शोधात भटकत आहे, तर शेतकरी नापिकी आणि वाढत्या उत्पादन खर्चाने कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. हिंगणघाट विधानसभा मतदारसंघातील ही परिस्थिती सरकार आणि लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरत आहे.

लोकसंख्या वाढली, गरजा वाढल्या; मात्र त्या तुलनेत उद्योग आणि रोजगारनिर्मिती झाली नाही. गेल्या १२ वर्षांत एकही मोठा उद्योग हिंगणघाटमध्ये आणण्यात लोकप्रतिनिधींना यश आले नसल्याचा आरोप होत आहे. तरुणांच्या हाताला रोजगाराऐवजी आश्वासनेच मिळणार असतील, तर विकास नेमका कुणासाठी असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. उच्च तंत्रशिक्षणासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि पॉलिटेक्निकची मागणी वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. गरीब आणि शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना महागडे व्यावसायिक शिक्षण परवडत नसल्याने अनेकांना पारंपरिक अभ्यासक्रमांपुरतेच मर्यादित राहावे लागत आहे. सरकारच्या




योजना कागदावर आणि विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात, अशी अवस्था झाली आहे.दुसरीकडे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही विकासकामांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. नांदगाव उड्डाणपुलाला तीन वर्षांत सहा वेळा भगदाड पडल्याचा आरोप हा केवळ एका पुलाचा प्रश्न नसून सरकारी कामांच्या गुणवत्तेचा आरसा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील रस्ते, अमृत योजनेतील पाण्याच्या टाक्या आणि भूमिगत गटार योजनेबाबतही तक्रारी आहेत.

शेतकऱ्यांची परिस्थितीही चिंताजनक आहे. नापिकी, महागलेली शेतीची साधने आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी हतबल झाला आहे. ज्याच्या कष्टावर व्यवस्था उभी आहे, त्याच शेतकऱ्याच्या आयुष्यात अंधार का हा प्रश्न आता अधिक तीव्र होत आहे.

हिंगणघाटला उद्योग, रोजगार, दर्जेदार शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण विकासकामांची गरज आहे. राजकीय आरोप प्रत्यारोपांपलीकडे जाऊन सरकार आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन ठोस कृती करावी. हिंगणघाटच्या तरुणांच्या हातात रोजगार, विद्यार्थ्यांच्या हातात कौशल्य आणि शेतकऱ्याच्या हातात सुरक्षित भविष्य कधी येणार हा प्रश्न आता सरकारला जागे करण्यासाठी जनतेच्या आवाजात घुमू लागला आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जिल्हा सहकारी बँकेच्या आमसभेत पाच वर्षांचा लेखाजोखा

## -० टक्के व्याजाचे पिककर्ज, ओटीएसमधून कर्जमुक्ती

### -दिव्यांग-विधवांना ६टक्के व्याजाने कर्ज अन् शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा पाठपुरावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६५ वी वार्षिक साधारण सभा आज (दि.१) पार पडली. आगामी निवडणुकीपूर्वीची ही शेवटची आमसभा असल्याने तिला विशेष महत्त्व होते. अध्यक्ष आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू आणि उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांच्या नेतृत्वाखाली मागील पाच वर्षांत बँकेने केलेल्या कामाचा तसेच भविष्यातील शेतकरीहिताच्या निर्णयांचा लेखाजोखा सभेत मांडण्यात आला.



बँकेच्या ठेवींमध्ये सातत्याने वाढ होत २,४०० कोटींच्या पुढे ठेवी पोहोचल्या असून खेळते भांडवल ३,३४६ कोटी रुपयांवर गेले आहे. शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंतच्या नियमित पिककर्जावर ०% व्याजाची सवलत, तर थकीत कर्जदारांसाठी OTSच्या माध्यमातून कर्जमुक्तीचा मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.

आमसभेत आगामी काळातील काही महत्त्वपूर्ण निर्णयांचीही दिशा स्पष्ट करण्यात आली. पिककर्जाव्यतिरिक्त दिव्यांग व विधवा महिलांना ६% व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय, तसेच २०१९च्या महात्मा फुले कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवून देण्यासाठी शासनाकडे विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय दुग्ध व्यवसाय, बहुवार्षिक पिके, आधुनिक शेती आणि कडबाकुट्टी यंत्रांसाठी कर्ज तसेच आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बँकेच्या मुख्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा लवकरच स्थापन करण्यात येणार असल्याचेही यावेळी स्पष्ट



करण्यात आले. डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून IMPS, NEFT, RTGS, ATM तसेच ग्रामपंचायतींसाठी QR कोडसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या आमसभेला अध्यक्ष आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांच्यासह संचालक नरेशचंद्र ठाकरे, सुधाकर पाटील भारसाकडे, आनंद काळे, अजय मेहकरे, चित्राताई डहाणे, सुरेखाताई ठाकरे, जयप्रकाश पटेल, सुनील वऱ्हाडे, दयाराम काळे, बाळासाहेब अलोणे, बाबूजी गायगोले, हरिभाऊ मोहोड, व इतर संचालक उपस्थित होते.

### 'शेतकऱ्याच्या पाठीशी उभे राहणे हेच धोरण'

'ही बँक केवळ कर्ज देणारी संस्था नाही, तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात उभी राहणारी आपली हक्काची संस्था आहे. गेल्या पाच वर्षांत बँकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करताना शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवले. आता पुढील काळात शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत बँकेची मदत पोहोचवून त्याच्या शेतीला, व्यवसायाला आणि स्वप्नांना आर्थिक बळ देणे हेच आमचे ध्येय आहे. सभासदांचा विश्वास हीच आमची खरी ताकद असून, त्यांच्या सहभागातून जिल्हा बँकेला आणखी सक्षम करून शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विश्वासाचा आधार बनवू.'

**- आ.बच्चू कडू, अध्यक्ष**

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

# हरवलेले १७२ मोबाईल मूळ मालकांना परत

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील ग्रामीण भागात चोरीला गेलेले आणि हरवलेले मोबाईल शोधून काढण्यात ग्रामीण पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. विविध पोलीस ठाण्यांमध्ये नोंद असले १७२ मोबाईल शोधून त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. या मोबाईलची एकूण किंमत १७ लाख २० हजार रुपये आहे.ग्रामीण भागात चोरी आणि हरवलेल्या मोबाईलच्या तक्रारी वाढत होत्या. त्यामुळे ग्रामीण पोलिसांनी यासाठी विशेष मोहीम हाती घेतली. शासनाच्या सीईआयआर पोर्टलचा वापर करून आणि मोबाईलच्या ईएमइआय क्रमांकाच्या तांत्रिक पद्धतीने तपास करून हे मोबाईल शोधून काढण्यात आले. मोबाईल मिळाल्यानंतर रविवारी एका विशेष कार्यक्रमात पोलीस अधीक्षक निकेतल कदम यांच्या हस्ते मूळ मालकांना मोबाईल सुपूर्द करण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.या मोबाईल वाटप कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोडेवार, पोलीस निरीक्षक अशोक लांडे, सायबर सेलचे अधिकारी आणि संबंधित पोलीस ठाण्यांचे अधिकारी उपस्थित होते. मोबाईल परत मिळाल्यानंतर अनेक नागरिकांनी ग्रामीण पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक केले आणि आभार मानले.

## ई-निविदा
## निविदा सूचना क्र.०१/सन २०२६-२७
## कार्यालय सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अमरावती

खालील कामाची सिलबंद ई-निविदा ब-१ प्रपत्रामध्ये सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या वतीने योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषद कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदाचे मुल्य खाली दर्शविलेल्या तारखांना सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद अमरावती मध्ये निविदा फी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे भरता येईल. सदर ई-निविदा ही शासनाचे संकेतस्थळावर अटी व शर्तीसह प्रसिध्द करण्यात येईल व खालील नेमून दिलेल्या दिवशी निविदा उघडण्यात येईल. सविस्तर ई-निविदा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद अमरावती यांचे कार्यालयातील सूचना फलकावर पहावयास मिळेल.

| अ. क्र. | विभागाचे नांव | कामाचे नांव | कामाची किंमत (रु.लक्ष) | निविदा किंमत | बयाणा रक्कम | कामाची मुदत (महिने) | लेखाशिर्षक | कोऱ्या निविदा देण्याची तारीख व वेळ | भरलेली निविदा स्विकारण्याची तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | सामान्य प्रशासन विभाग, अमरावती (मुख्यालय) | मुख्यालया अंतर्गत सर्व कार्यालये,जिल्हा परिषद, अमरावती व शिक्षणाधिकारी/ समग्र शिक्षा अभियान/ कृषी/मा.मु.का.अ.निवास-स्थानामधील कार्यालय क्र.२ व परिसरातील साफसफाई करणे | ६०००००० | ६००० | ६०००० | दिनांक ०१.०९.२०२६ ते ३०.०९.२०२७ | जिल्हा निधी २५१५-१०१-५३ जिल्हा परिषद ईमारत परिसरात सुरक्षा रक्षक मानधन व परिसर स्वच्छता | दिनांक १.९.२०२६ ते १५.९.२६ पर्यत सकाळी १०.०० ते सायं.१७.४५ वा.पर्यत | दिनांक १.९.२०२६ ते १५.९.२६ पर्यत सकाळी १०.०० ते सायं.१७.४५ वा.पर्यंत | दिनांक १६.९.२६ कार्यालयीन वेळेत |

**अटी व शर्ती-**

१) कंत्राटदाराने जिल्हा परिषद नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करावे,
२) कंत्राटदाराचे सन २०२५-२६ जीएसटी क्रमांकाचे व आयकर प्रमाणपत्र सादर करावे.
३) निविदा संबंधाने आवश्यक इतर अटी व शर्ती उप मु.का.अ.(सा.) जि.प.अमरावती यांचे नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल,
४) २ टक्के अनामत रक्कम निविदा भरतेवेळी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांचे नांवे डी.डी.जमा करण्यात यावा,
५) १२.०२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार परफॉमन्स सिक्यूरीटी निविदेसोबत सादर करावे लागेल,
६) सफाई कामगार निविदा भरणाऱ्या पुरवठादाराने कामगार कायद्यातील सर्व अटी व शर्ती ची पुर्तता करणे आवश्यक आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांसाठी राज्य कामगार विमा योजना भविष्य विर्वाह निधी बोनस ॲक्ट ग्रॅच्युईटी ॲक्ट घरभाडे भत्त्ता ॲक्ट ई.कायदेशीर नियमांचे पालन करुन तरतुदीमधील नियमानुसार वेळोवेळी भरणा हा कंत्राटदार यांनी करावयाचा आहे.
७) सफाई कामगारांचे वेतन व भत्ते यांचा भार हा कंत्राटदाराचा असेल त्याबाबत संस्थेचा कोणताही संबंध राहणार नाही.
८) निविदाधारकास ई.पी.एफ. (EPF) (ESIC) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
९) कंत्राटदाराने सफाई कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले किमान मासिक वेतन द्यावे. सफाई कामगारांचे देण्यात येणाऱ्या किमान वेतनाची खात्री करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील. किमान वेतनापेक्षा कमी दर सादर केल्यास संबंधित निविदाकाराच्या निविदा रद्द करण्यात येतील.
१०) सफाई कामगार यांचे दैनिक हजेरी पुस्तक ठेवावे. सदर हजेरी पुस्तकाच्या छायांकित प्रती प्रत्येक महिन्याचे देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील.
११) कंत्राटदाराचे सफाई कामगार यांचा संस्थेचा कोणताही संबंध असणार नाही. तसेच या संस्थेत काम केल्यामुळे भविष्यात या संस्थेच्या आस्थापनेवर सामावून घेण्याकरीता सदर सफाई कामगारांचा कोणताही दावा करता येणार नाही.
१२) सफाई कामगार संबंधीचे विविध विवादासाठी कंत्राटदार स्वतः जबाबदार राहतील. कार्यालयाशी त्याचा कोणताही संबंध राहणार नाही.
१३) कामाच्या वेळेत सफाई कामगार झालेल्या ईजा व अपघातांसाठी कार्यालय जबाबदार राहणार नसून त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याकरीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. काम करतांना कामगारांना झालेल्या अपघातासाठी संस्था कोणतीही भरपाई देणार नाही.
१४) या ई-निविदा सोबतच लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावे.
१५) कोणत्याही वेळी निविदा रद्द करण्याचे सर्व अधिकार हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना राहतील.
१६) जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग (क्लास) नमुद करावा.
१७) सन २०२५-२६ मध्ये मागील वर्षी शासकीय/निमशासकीय कार्यालयात साफसफाई करणे बाबतचा अनुभवाचे प्रमाणपत्र निविदा सादर करते वेळी सादर करणे आवश्यक राहील.
१८) निविदाधारकाकडून साफसफाई करणारे कर्मचारी यांचा पत्ता/आधारकार्ड तसेच मोबाईल क्रमांकासह चांगल्या वर्तणुकीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**उप-मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)**
**जिल्हा परिषद, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७७८/२०२६
Lilabai Bharatlalji Gupta + 4 Versus NIL
पुढील ता.१२.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Lilabai Bharatlalji Gupta,** Aged 67 years. Occu.: Household, R/o. Behind Kadbi Bazar, Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
2. **Nitesh Bharatlalji Gupta,** Aged 52 years. Occu.: Business R/o. Behind Kadbi Bazar, Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
3. **Arvind Bharatlalji Gupta,** Aged 47 years. Occu.: Business R/o.Behind Kadbi Bazar,Gawallipura,Amravati, Tq. & Dist.Amravati
4. **Shelendra Bharatlalji Gupta,** Aged 49 years, Occu.: Business R/o.Behind Kadbi Bazar,Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
5. **Roshni Shivkumar Sahu,** Aged 51 years, Occu.: Household R/o. Chetandas Bagicha, Ratanganj, Tq. & Dist.Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bharatlal Ambadas Gupta** हे दि. १९.०५.२०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Lilabai Bharatlalji Gupta + 4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Lilabai Bharatlalji Gupta + 4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७९१/२०२६
**सैदा बी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०५.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Saida Bi W/o Shaikh Kareem, Age 76 Yrs. Occu.: Housewife R/o Near Afsar Kirana Shop, Alim Nagar, Amravati.
2. Khurshida Bi W/o Sheikh Shafi, Age 74 Yrs. Occu.: Housewife R/o Pinjar Post Pinjar Kardu, Tq.Barshitakli Akola
3. Rukhsana Bee W/o Abdul Hasan, Age 55 Yrs. Occu.: Household R/o Near Javed Kirana, Taj Nagar No.2, Amravati.
4. Faimida Bee W/o Saheb Khan, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Nawed Road, Ward No.4, Kholapur Bhatkuli, Amravati.
5. Farzana Begam W/o Asad-ullah Khan, Age 45 Yrs. Occu.: Household R/o Kalikabar, Darushafa, Chaderghat, Hyderabad Telangana
6. Younus Khan S/o Nazeer Khan, Age 41Yrs. Occu.: Labour R/o Near Farooque Bhai Chikan House, Muzaffir Pura, Amravati.
7. Yusuf Khan S/o Nazeer Khan, Age 37 Yrs. Occu.: Labour R/o Near Farooque Bhai Chikan House, Muzaffir Pura, Amravati.
8. Shabana Bano D/o Nazeer Khan, Age 35 Yrs. Occu.: Housewife R/o Galli No.2, Muzaffir Pura, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत नाझिरखान मोहम्मद खान आणि आरिफा बी नाझिर खान** हे अनुक्रमे दिनांक 17.10.1993 व 25.11.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सैयदा व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सैयदा व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२४९/२०२६ ने.ता.०५.१०.२०२६

**१. शबाना परवीन नासिर शहा**
**२. माहिर नासिर शहा**
दोन्ही रा.वार्ड नं.२, माहुली चोर,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत नासिर शहा बशीर शहा** यांचा **मृत्यू दि.०६.०३.२०२२** मध्ये **विनोबा भावे हॉस्पिटल, सावंगी मेघे, ता.जि.वर्धा** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

## जाहीर नोटीस

आम जनतेस सदरचे सुचना पत्राव्दारे अग्रेसित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **प्रफुल्ल गोविंदराव वाकोडे,** विद्यापीठ कॉलनी, अमरावती यांनी **अब्दुल जमील हाजी अब्दुल मन्नान,** रा.जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती यांचे पासून खालील वर्णनांकित मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला असून तिचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावती हददीतील मौजे-पिंप्री, अमरावती येथील शेत सर्वे नं.१३/२, भो.वर्ग १ क्षेत्रफळ ० हे ५१ आर आ.रु. २.७० पैसे शेत पुर्ण तदंगभूत वस्तुसह इतर झाडा झुडपासह माती गोटे यांचे सह तुम्हास विकण्याचा सौदा केला आहे, त्या शेताची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे - पुर्वेस -जवंजाळ यांचे शेत, पश्चिमेस - दादाराव यादगिरे यांचे शेत, उत्तरेस - शिव रस्ता, दक्षिणेस - मोतीलाल गडलिंग यांचे शेत.

येणेप्रमाणे माझे पक्षकार यांचेशी झालेल्या सौद्यानुसार पुर्ण रक्कमेची माझे पक्षकाराकडे पुर्तता झाली असून माझे पक्षकार येणा-या नजीकच्या भविष्यात वरील मालमत्तेची खरेदी त्यांच्या पक्षात दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती येथे नोंदवून घेतील. तत्पूर्वी जर उपरोक्त मालमत्तेवर कोणाचेही कर्ज, गहाण, ताबा, हक्क, बोजा, कुळ, बक्षीस इतर हक्क संबंध, वारसा हक्क वा इतर तस्सम व्यवहार व सावकारी, निमसरकारी वा सरकारी कर्ज वगैरे असेल तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ०७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासहित संपर्क साधावा अन्यथा काहीही तक्रार न आल्यास माझे पक्षकार नियमानुसार खरेदी करुन घेतील व त्यानंतर येणा-या तक्रार वा उजर चालणार नाही. करिता सदरचे सुचनापत्र.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- ०१.०९.२०२६**

**नोटीस जाहीर करणार**
**सही/-**
**(ॲड.एस.पी.वर्धे )**
**मो.८२७५३०९२६७**
**१६ भोवते ले आऊट, बेनोडा,**
**अमरावती, ता.जि.अमरावती**

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार नामे **रंजना सुनीलराव बनसोड, रा.ह.मु. शिरजगाव अर्डक, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सुचनेवरुन आम जनतेस स्थावर शेत मालमत्तेचे खरेदी-विक्री संदर्भात नोटीस देण्यात येते, त्या स्थावर मालाचे वर्णन खालीलप्रमाणे मौजे -शिरजगाव अर्डक, हददीतील शेत भूमापन क्र.१५/२/अ, आ.रु. १८.४०, भो.वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ ० हे ७४ आर, त्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस - श्री पुरुषोत्तम अर्डक यांचे शेत, पश्चिमेस - सरकारी रस्ता
उत्तरेस - श्री गणेश अर्डक यांचे शेत व दक्षिणेस - श्री पुरुषोत्तम अर्डक यांचे शेत

येणेप्रमाणे वरील वर्णनाची स्थावर शेतमालमत्ता मध्ये माझे वरील नामे पक्षकार यांचे हितसंबंध असल्यामुळे त्यांनी त्या मिळकतीचे बाबत मा.दिवाणी न्यायाधिश चांदूर बाजार, जि.अमरावती यांच्या न्यायालयात रे.दि.दा.क्र. ४०/२०२६ दाखल केला असून त्या मध्ये न्यायालयाने जैसे थे चा आदेश दिला आहे. सदर जमिनीबाबत कोणीही ईसारचिठ्ठी/खरेदीखत करु नये तसेच कोणतीही रक्कम देवू नये तसेच तृतीय पक्षाचा हक्क/हितसंबंध निर्माण करु नये.

माझे पक्षकाराला फसविण्याच्या वाईट हेतुने त्यांचे पती श्री सुनिल मारोतराव बनसोड व त्यांचे भाऊ श्री गोपाल मारोतराव बनसोड हे मुददाम पणे त्रयस्ताचे हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. करीता आम जनतेस सदर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, वरील स्थावर शेत मालमत्ते संदर्भात माझे पक्षकाराचे हितसंबंध गुंतले असल्यामुळे ते दुखावले जाऊ नये. सदर जमिनीबाबत कोणास हक्क, दावा, आक्षेप, इसारचिठ्ठी किंवा व्यवहार असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्तावर अधिव्यक्ता यांच्या शी ७ दिवसाच्या आत संपर्क साधावा. तसेच सदर शेतजमिनी संदर्भात आपण यांचेसोबत कुठलेही खरेदी-विक्री वा अन्य हस्तांतरणाचे व्यवहार करु नये. केल्यास आपण कोर्ट कार्यवाही व त्यापासून होणा-या परिणामास जबाबदार असाल. करिता जाहीर नोटीस.

**दिनांक २५.०८.२०२६**

**सही/-**
**(ॲड.अभिषेक म.निस्ताने )**
**कार्यालय-गगलानी नगर,**
**वडाळी नाका कॅम्प, अमरावती**
**मो.९८९०२८०१६६**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६६४/२०२६**
**सुधीर+३वि.निरंक**
**पुढील ता.१५.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **सुधीर पंजाबराव घुरडे,** वय ५२ वर्षे, व्यवसाय- नोकरी
२. **निलेश पंजाबराव घुरडे,** वय ४३ वर्षे, व्यवसाय-खाजगी नोकरी
३. **अनिल पंजाबराव घुरडे,** वय ४९ वर्षे, व्यवसाय-खाजगी नोकरी
१ ते ३ रा.पंजाबराव घुरडे, दूध डेअरी जवळ, दत्तविहार कॉलनी, नवाथे प्लॉट, ता.जि.अमरावती
४. **मोहिनी प्रमोदराव ढवले,** वय ५० वर्षे, व्यवसाय-गृहिणी रा.भक्तीधाम मार्ग, संताजी नगर, चांदूर बाजार, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पंजाबराव दौलतराव घुरडे** हे दिनांक **०१.०६.२०१३** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सुधीर पंजाबराव घुरडे + ३** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुधीर पंजाबराव घुरडे +३** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २०.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७६२/२०२६
Nitin+2 **-वि- निरंक**
पुढील ता.२४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Nitin Madhukar Chincholkar, Age 58 Yrs. Occu.: Service R/o B-701, Neelkanth Park, Plot No.18, Near CIDCO Garden, Sec.6 Khanda Colony, Panvel, Raigarh
2. Nilesh Madhukar Chincholkar Age 57 Yrs. Occu.: Service R/o Ashiyad Colony, Shegaon Road, Amravati.
3. Mangesh Madhukar Chincholkar, Age 55 Yrs. Occu.: Service R/o B-102, Sraddha Gardenia, Rahath Bagh, Old Madras Road, Nagavarapalya, Banglore North, C.V.Raman Nagar, Karnataka

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Madhukar Motiramji Chincholkar हे दिनांक **15.09.2017** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Usha Madhukarrao Chincholkar या दिनांक १३.०६.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार Nitin Madhukar Chincholkar+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Nitin Madhukar Chincholkar+2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर सुचना

माझे अशील **दिनेश शालिग्राम वासेवाय** यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदीखत दि.०७/०६/२०२६ र.द.क्र.२६२७ व दि.०७/०५/२०१८र.द.क्र.१८०९ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणाला सापडली असल्यास किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याव्दारे सर्वांना कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत वरील दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करु नये व केल्यास माझे अशील होणा-या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलेही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती १५ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

सदर मिळकत ही मनपा अमरावती व दु.नि.अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा **शे.स.क्र.१/२/A व १/२/B**, नझुल शिट क्र.----, **प्लॉट क्र.१८** याचे क्षेत्रफळ **१०१.२० चौ.मि.(१०८९.३९ चौ.फुट)** या वर रहाते.घर मौजे महाजनपुर प्रगणे बडनेरा, ता व जि.अमरावती याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - प्लॉट क्र.१७ , पश्चिमेस - प्लॉट क्र.१९
उत्तरेस- प्लॉट क्र.१४ व १५ व दक्षिणेस - रोड

**सही/-**
**(ॲड.वैभव न.काकिर्डे )**
**१९, हरिओम कॉलनी, संताजी नगर,**
**अमरावती, मो. ९६७३८२१००१**

---

Appendix E, No.7
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.V.Kadam
10th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**NOTICE TO SHOW CAUSE WHY EXECUTION SHOULD NOT ISSUE (0.21, R. 16)**

Spl.Dkst.107/2023
विकम चंद्रकिशोर अग्रवाल -वि- गजानन विठ्ठलराव निंभोरकर
**Next Date 28.09.2026**

To,
Gajanan Vitthalrao Nimbhorkar
C/o Pande House, Krushnakunj Vihar
Bhaktidham Mandir, Chandur Bazar,
Dist.Amravati (Maharashtra)

**Second Address-** Sai Nagar, Akoli Road, Near Railway Crossing, Khandelwal Building, Near Hanuman Mandir Amravati, Maharashtra

Whereas **Vikram Chandrakishor Agrawal** has made application to this Coujrt for execution of decree in Suit No., on the allegation that the said decree has been transferred to him by assignment or without assignment, this is to give you notice that you are to apear before this Court 10th Jt.Civil Judge, Sr.Dn., Amravati on the 28.09.2026, to show cause why execution should not be granted.

Given under my hand and the seal of the Court, this 25.08.2026

शिक्का **11th Jt.Civil Judge, Sr.Dn.,Amravati**

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### कावळ यात्रा व देवीची महापूजा उत्साहात

**आसेगाव पूर्णा-**अचलपूर तालुक्यातील सावळापूर पूर्णा येथे पारंपरिक धार्मिक परंपरेनुसार श्रावण महिन्यानिमित्त भोले सरकार कावळ यात्रा व देवीची महापूजा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात झाली. या धार्मिक सोहळ्यात गावातील महिला, पुरुष तसेच विविध संप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी देवीची विधिवत पूजा-अर्चा, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.पारंपरिक पद्धतीने येलकी येथील शिव मंदिरापासून सावळापूर येथील सावळेश्वर मंदिरापर्यंत कावळ यात्रेचे आयोजन करण्यात आले. यात्रेदरम्यान भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेतल्याने संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यात्रेनिमित्त भाविकांनी देवीचे दर्शन घेत सुख-समृद्धी, आरोग्य तसेच गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली. धार्मिक परंपरेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ व आयोजकांनी परिश्रम घेतले.



### जनता विद्यालयात एचआयव्ही-एड्स, टीबीबाबत जनजागृती

**अंजनगाव बारी-**जनता विद्यालय अंजनगाव बारी येथे एचआयव्ही-एड्स व टीबी आजाराबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील आयसीटीसी समुपदेशक श्याम वाहणे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एचआयव्ही व एड्समधील फरक, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय आणि विविध गैरसमज याबाबत माहिती देण्यात आली. एचआयव्ही बाधित व्यक्तींशी भेदभाव न करता त्यांना सन्मानाने वागणूक देण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अर्चना पोकळे यांनी केले. योग्य माहिती, जागरूकता आणि प्रतिबंध हाच एचआयव्हीविरुद्ध प्रभावी मार्ग असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.



### उपराई कावड यात्रा उत्साहात

**खल्लार-**श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी उपराई ते शुक्लेश्वर मंदिर कावड यात्रेचे आयोजन केले होते. कावड यात्रेची सुरुवात श्री डोमनशेष संस्थान उपराई येथून करण्यात आली. दर्यापूर मतदार संघाचे आ. गजानन लवटे यांच्या हस्ते कावड चा शुभारंभ करण्यात आला.यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर,शिवसेना जिल्हा समन्वयक गुणवंत पाटील गावंडे,अनिकेत पाटील खाडे,दिपक बगाडे उपस्थित होते. उपराई येथिल महादेव मंदिर, शादल बाबा देवस्थान येथे कावड यात्रेचे पूजन करण्यात आले,यानंतर हनुमान मंदिर उपराई येथे शिवसेना जिल्हा समन्वयक गोपाल पाटील अरबट यांनी भेट देऊन पूजन केल.यावेळी त्यांच्यासमवेत अतुल पाटील सगणे, राहुल भुंबर उपस्थित होते. मार्कंडा येथेही मार्कंडेश्वर मंदिरात कावड यात्रेमधिल शिवभक्तांना चहा नाश्ता देण्यात आला.डोंगरगाव येथिल शंभूशेष मंदिर, टाकरखेडा येथिल शिव मंदिर येथेही कावडचे पूजन करण्यात आले. शुक्लेश्वर मंदिराकडे प्रस्थान करून महाप्रसादाने या कावड यात्रेची सांगता झाली.

अमरावती राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयात ‘महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५’ या कायद्याची जनजागृती

# सेवामिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क; माहिती फलकाचे लोकापर्ण

**अमरावती/का.प्र.**

नागरिकांना शासकीय सेवा विहित कालावधीत, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने मिळाव्यात, यासाठी लागू करण्यात आलेल्या ‘महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५’ या कायद्याची व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहिती फलकाचे लोकार्पण अमरावती परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.महेश पाटील आणि राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही पारदर्शक प्रशासन आणि सुशासनासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल्या या माहिती फलकामध्ये नागरिकांना शासकीय सेवा मिळविण्याची संपूर्ण प्रक्रिया फ्लोचार्टच्या माध्यमातून सोप्या व सुटसुटीत पद्धतीने समजावून सांगण्यात आली आहे. पात्र व्यक्तीने अर्ज केल्यानंतर सेवा नाकारली गेल्यास किंवा विहित कालावधीत सेवा मिळाली नाही, तर संबंधित व्यक्तीस ३० दिवसांच्या आत प्रथम अपील दाखल करता येते. प्रथम



अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयावर समाधान न झाल्यास पुढील ३० दिवसांत द्वितीय अपील, तर त्यानंतर ६० दिवसांच्या आत तृतीय अपील राज्य सेवा हक्क आयोगाकडे दाखल करण्याची तरतूद आहे.

शासकीय सेवा देण्यास विनाकारण विलंब करणाऱ्या अथवा सेवा नाकारणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यावर रु. ५०० ते रु. ५ हजारांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. ‘सेवा मिळणे हा नागरिकांचा कायदेशीर हक्क असून, सेवा देणे ही केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून कायदेशीर कर्तव्य आहे,’ हा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला. जातप्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, विविध परवाने तसेच शासकीय मंजुरी यांसह अनेक सेवा ‘आपले सरकार’ पोर्टलद्वारे नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. राज्यसेवा हक्क आयुक्त कार्यालय अमरावतीच्या वतीने जुलै महिन्यात ‘लोकसेवा हक्क कायदा’ या माहिती पुस्तिकेचे मुख्य राज्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांच्या हस्ते मुंबई येथे विमोचन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव, अपर आयुक्त (महसूल) अनिल खंडागळे, उपजिल्हाधिकारी विवेकानंद काळकर, राज्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाचे उपसचिव (प्र.) देवेंद्र चव्हाण, कक्ष अधिकारी क्षितिज लेंडे, सहायक कक्ष अधिकारी द्विपाल वानखडे, महसूल सहायक सुजित सरोदे व प्रिती शिंगाडे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## रिद्धी राऊतला कूडोमध्ये राज्यस्तरीय सुवर्णपदक

**अमरावती -** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावतीच्या इयत्ता ५वी तील विद्यार्थिनी रिद्धी राऊत हिने कूडो क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक (Gold Medal) पटकावले.रिद्धीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक तसेच शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्य सोनल निस्ताने, डॉक्टर अंकुश राजगिर, शिल्पा वानखडे तसेच क्रीडा शिक्षक यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रिद्धीने आपल्या मेहनत, जिद्द आणि उत्कृष्ट क्रीडाकौशल्याच्या जोरावर हे यश



संपादन केले असून तिच्या या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.


## कलाकार निवड समिती’वर कलावंत संघटनांचा आक्षेप

### पालकमंत्र्यांनी ‘मान्यवर कलाकार’च नेमण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ‘राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजने’च्या जिल्हा निवड समितीत ‘शासन निर्णया’तील निकषांना बगल देत, पालकमंत्री महोदयांनी नियमानुसार ९ ज्येष्ठ मान्यवर कलावंतांऐवजी कलाक्षेत्रातील अनुभव नसलेल्या व राजकीय पक्षांतील कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या केल्याने जिल्ह्यातील शेकडो कलावंतांसह स्थानिक कलावंत संघटनांनी एकत्रित बैठक घेऊन तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

शासन निर्णयानुसार समितीत ९ ज्येष्ठ मान्यवर कलाकार व १ मान्यवर साहित्यिक असणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट नमूद असताना, पालकमंत्री महोदयांनी निवड समितीवर नेमलेले अर्ध्याहून अधिक सदस्य राजकीय क्षेत्रातील व कलाक्षेत्राचा अनुभव नसलेले आहेत, असा आरोप कलावंतांनी केला आहे. त्यामुळे ‘अपात्र सदस्य योग्य कलाकारांची निवड कशी करणार?’ असा प्रश्न उपस्थित करत, त्यांचा बायोडाटा व कलाक्षेत्रातील पात्रता तपासून, त्यांतील अपात्र सदस्यांच्या नियुक्त्या तातडीने रद्द करून केवळ मान्यवर कलाकारांचाच या निवड समितीत समावेश करावा; जेणेकरून पारदर्शक पद्धतीने योग्य कलाकारांची निवड होईल व खऱ्या कलाकाराला न्याय मिळेल. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्ह्यातील शेकडो कलावंतांच्या वतीने अ.भा. कलावंत न्याय हक्क समिती, कलावंत-साहित्यिक आधार, संघ व कलारसिक संस्था, अमरावतीचे पदाधिकारी यांनी दिला आहे.




## शेतकरी, शेतमजूरांच्या पाल्याना खाजगी शाळांत सवलत द्या

### राष्ट्रवादी कॉंग्रेसचे निवेदन

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर तालुक्यातील शेतकरी व शेतमजुरांच्या पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शैक्षणिक शुल्कात किमान पाच हजार रुपये सवलत देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (अजित पवार) वतीने करण्यात आली असूम त्याबाबतचे निवेदन गट शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

दर्यापूर तालुक्यात यंदा पावसाचे असमान व अनियमित स्वरूप राहिल्याने अनेक भागात पावसाचा मोठा खंड पडला आहे.त्याचा परिणाम शेतीपिकांच्या वाढीवर झाला असून अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटल्याचे दिसून येत आहे. परिणामी शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून



शेतमजुरांची परिस्थितीही बिकट झाली आहे. शेतीच्या उत्पन्नात घट झाल्याने कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविण्यासोबतच पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च करणे शेतकरी व शेतमजूर कुटुंबांसाठी कठीण झाले आहे.दर्यापूर तालुक्यातील अनेक कुटुंबे आपल्या पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण देत आहेत. मात्र सध्याच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत शाळांची शैक्षणिक फी भरणे अनेक पालकांच्या आवाक्याबाहेर जात आहे. त्यामुळे पात्र शेतकरी व शेतमजूर कुटुंबांच्या पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रति विद्यार्थी किमान पाच हजार शैक्षणिक शुल्क सवलत देण्यात यावी. तसेच संबंधित खासगी शाळा व्यवस्थापनांना याबाबत आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात यावे,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी प्रशासनाने या मागणीचा तातडीने व सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी अपेक्षा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष निलेश पाटील मोपारी यांनी व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष निलेश पाटील मोपारी, शहराध्यक्ष अमोल गहरवार, जिल्हा सरचिटणीस कुलदीप पाटील काळे, तालुकाध्यक्ष नितिन गावंडे उपस्थित होते.

## भटके-विमुक्त सप्ताहात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

**आसेगाव पूर्णा-**चांदूरबाजार तालुक्यातील आसेगाव पूर्णा येथील राष्ट्रसंत गुरुकुल प्राथमिक आश्रमशाळेत भटके-विमुक्त सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन, चित्रकला, रांगोळी, वकृत्व तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धाही घेण्यात आल्या. सप्ताहाच्या समारोपानिमित्त वकृत्व स्पर्धेसह वेशभूषा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आशिषजी ढोके, समाजसेवक नंदकिशोरजी कुईटे,राजेंद्रजी पारिसे तसेच पालक प्रतिनिधी लच्छु बारस्कर उपस्थित होते. त्यानंतर



विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा सादर करीत सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. सप्ताहादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून भटके-विमुक्त समाजाचे सामाजिक व ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन भविष्यात समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक आशिष ढोके यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प.शि.वाटाणे यांनी केले. संचालन प्रिया मोरे यांनी केले, तर वानखडे यांनी आभार केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कृष्णजन्माच्या मंगलक्षणासाठी सजले इस्कॉन

**अमरावती/का.प्र.**

भक्तीचा महासागर, मंत्रमुग्ध करणारे भजन, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शास्त्रीय नृत्य, नाट्याविष्कार आणि मध्यरात्री होणारा भगवान श्रीकृष्णांचा जन्मोत्सव... अशा बहुरंगी आणि भक्तिमय वातावरणात इस्कॉन संस्थापकाचार्य श्रील ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे शिष्य, इस्कॉन पदयात्रा मंत्री, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे जीवनगौरव सन्मानाने गौरविण्यात आलेले विश्वविख्यात कीर्तन सम्राट व त्रिदंडी संन्यासी परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने सरस्वती कॉलनी येथील श्री रुक्मिणी द्वारकाधीश आध्यात्मिक संस्कार केंद्र, इस्कॉन अमरावती येथे शुक्रवार,४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जन्माष्टमी निमित्त ३ ते ५ सप्टेंबर पर्यत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. भगवान श्रीकृष्णाच्या सेवेला समर्पित भावनेने दिवस-रात्र परिश्रम घेणाऱ्या या सर्व सेवाभावी भक्तांचे योगदान या महामहोत्सवाच्या यशामागील महत्त्वाचा आधार आहे. यामध्ये प्रामुख्याने सचिकुमार प्रभूजी, डॉ. सचिन साकरकर, मृदुल कृष्णी, समिक्षा कडू, शुभम कपिले, कौस्तुभ भूषण, गोविंद यादव, अनुराधा लीला, द्वारकानाथ, इंगळे, मयूर भोयर, कृष्णा काकडे, मयूर दरेकर, मुरारी चैतन्य, कौशिक



चांडक, शुभम कुरवाडे, मेघश्याम, राहुल चौहान, संकेत बोन्द्रे, शुभम बोडखे, सूरज, तांबुसकर, टहेरे, वृषाली साखरकर, संतोष गुप्ता, मेथानी परिवार, रजत ठाकुर, जयभद्रा, झाकर्डे, झाकर्डे, अभय गोविंद, गोविंद गादे, मयूर भोजने, रोशन चौहान, सागर बरडे, मोहनलाल जायसवाल, रुद्रेश, त्रिपाठी परिवार, पाटील परिवार, रामावतार आणि परिवार, आकाश चिखलकर यांच्यासह इस्कॉन अमरावतीतील सर्व भक्त, स्वयंसेवक, माता-भगिनी, युवक-युवती आणि सेवक मंडळी या महामहोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध प्रकारे सेवा देत आहेत. हा अद्भुत सोहळा अनुभवण्यासाठी अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच भगवान श्री राधा-कृष्ण यांचे दर्शन घेऊन त्यांच्या विशेष कृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन अमरावतीचे अध्यक्ष श्रीमान अद्वैत आचार्य प्रभु यांनी केले आहे.

## वनस्पतीशास्त्र विभागत ‘बोटॅनिकल सोसायटी’चे उद्‌घाटन समारंभ

**चांदुर रेल्वे-**वनस्पतीशास्त्र विभागाने ‘सिम्बायोसिस २०२६-२०२७’ (Symbiosis २०२६-२०२७) या नावाने विद्यार्थी संघटनेची स्थापना केली. या संघटनेत बी.एस्सी. (B.Sce.) भाग १, २ आणि ३ मधील विद्यार्थ्यांची अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष आणि कार्यक्रम संयोजक अशा विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि एकत्रितपणे काम करण्याची संस्कृती विकसित करणे हा या संघटनेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. वाडनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले, तर IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे



म्हणून उपस्थित होते.प्राचार्यांनी निसर्ग संवर्धनाबाबत भावी वनस्पतिशास्त्रज्ञांना मार्गदर्शन केले आणि विभागाद्वारे राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी यांनीही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

सोसायटीच्या अध्यक्षपदी भक्ती सूर्यवंशी (बी.एस्सी. भाग ३), उपाध्यक्षपदी परिणीता निहाटकर, सचिवपदी दिविका डोले, कोषाध्यक्षपदी दीक्षा डोंगरे आणि सहसचिवपदी उन्नती कोपरकर यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन तन्वी बनसोड यांनी केले, तर आभार प्राची कार्डे हिने केले.हा कार्यक्रम वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मीनल केचे यांनी आयोजित केला होता. याप्रसंगी सहाय्यक प्राध्यापिका डॉ. संपदा पाथर्कर आणि डॉ. प्रवीण सरदार हे देखील उपस्थित होते.

## श्रीराम प्राथमिक शाळेत राखी बनविणे स्पर्धा उत्साहात

**टाकरखेडा शंभू/वार्ताहर**

श्रीराम शिक्षण संस्था टाकरखेडा शंभू संचालित श्रीराम प्राथमिक शाळेत रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर शालेय स्तरावर राखी बनविणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत के.जी.-१ ते इयत्ता चौथीपर्यंतच्या सुमारे ९० ते १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवर आधारित आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या.मुख्याध्यापक प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक शिक्षक अतुल खांदे यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, पर्यावरण



संवर्धन, पानाफुलांपासून तयार केलेल्या राख्या, फळे, धान्य तसेच बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा संदेश देणाऱ्या विविध प्रकारच्या सुंदर राख्या तयार करून आणल्या.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून नवनियुक्त सहाय्यक शिक्षक, जिल्हा परिषद यवतमाळ आकाश जाधव, टाकरखेडा शंभू येथील पोलिस पाटील अजय मेहकर तसेच श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक उमेश सोलव उपस्थित होते. परीक्षकांनी राख्यांचे विषयानुरूप व कलात्मकतेच्या आधारे परीक्षण करून विजेत्यांची निवड केली.

**स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी:**

के.जी.-१ :प्रथम – सानवी ताजने,द्वितीय – अर्निका खांदे,तृतीय – साकेत भालचक्र चतुर्थ – विराज भडांगे

के.जी.-२ :प्रथम – लावण्या यावले, रुद्र कोठार,द्वितीय – आदर्श पाटील,तृतीय – मो. शरीक मो. शरीफ,चतुर्थ – शार्वी मनोज लवणकर

इयत्ता पहिली :प्रथम – विराज शेंडे,द्वितीय – यज्ञिका लोखंडे,तृतीय – किंजल माहोरे,चतुर्थ – प्रक्षिक वारके

इयत्ता दुसरी : प्रथम – यश मेश्राम,द्वितीय – कृष्णाल तायडे,तृतीय – तेजल खांदे,चतुर्थ – आराध्या निमकर

इयत्ता तिसरी :प्रथम – आस्था लवांड,द्वितीय – शिव भागवत,तृतीय – अन्वी सोळंके,चतुर्थ – शौर्य हाडके,पाचवा – श्लोक कोठार

इयत्ता चौथी :प्रियांशी गुल्हाने, निधी टवलारे, आनंदी भालचक्र, अथर्व वैद्य व ओवी नाचणकर यांनी स्पर्धेत यश संपादन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक प्रवीण पाटील, सहाय्यक शिक्षक अतुल खांदे, प्रमोद विघे, प्रशांत देशमुख,रेखा खटाळे,अश्विनी दिंडीलकर,गौरी जूनघरे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी पद्मा सवई यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, परीक्षक व शिक्षकवृंद यांनी कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, पर्यावरण संवर्धनाच्या भावनेला आणि बहीण-भावाच्या पवित्र नात्याला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम शाळेत उत्साहात पार पडला.

# जीव वाचविणाऱ्या व्हेंटिलेटरमध्येही 'कमिशन' ची दुर्गंधी !

## १३ लाखांचे व्हेंटिलेटर तब्बल २२.५५ लाखांत; ४.५ कोटींचा खर्च

### माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचा पुराव्यांसह गंभीर आरोप, -उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शासकीय मेडिकल कॉलेजची स्थापना कुठे होणार याबद्दल गोंधळ सुरू असतानाच या रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार सुरू झाला आहे. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी याबाबत सज्जड पुराव्यानिशी व्हेंटिलेटर खरेदीचा गैरप्रकार समोर आणला असून असाच मोठा भ्रष्टाचार संभाव्य खरेदीत होण्याची शक्यता वर्तविली आहे.



अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय अर्थात इर्विन रुग्णालयासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून २० हॅमिल्टन ए३ व्हेंटिलेटर खरेदी करण्यात आले. या खरेदीसाठी तब्बल ४.५ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचा दावा डॉ. देशमुख यांनी केला आहे. विशेष म्हणजे, अधिकृत पुरवठादाराकडून मिळालेल्या कोटेशननुसार याच व्हेंटिलेटरची जीएसटीसह किंमत सुमारे १३.१२ लाख रुपये असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे एका व्हेंटिलेटरच्या दरात तब्बल नऊ लाखांहून अधिक रुपयांची तफावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. देशमुख यांच्या म्हणण्यानुसार, मोठ्या संख्येने खरेदी केल्यास संबंधित अधिकृत वितरकाकडून आणखी १० ते २० टक्के सवलत मिळण्याची शक्यता होती. अशा परिस्थितीत २० व्हेंटिलेटरसाठी झालेल्या खरेदीत मोठी आर्थिक तफावत निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यांच्या मते, या दराने झालेल्या खरेदीमुळे शासनाच्या तिजोरीवर कोट्यवधींचा अतिरिक्त भार पडला असून, याची तातडीने चौकशी होणे आवश्यक आहे. या खरेदीचा पुरवठा वाशिम येथील निर्मल एजन्सीज या पुरवठादारामार्फत करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. करारनाम्यातील पत्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता संबंधित ठिकाणी एजन्सीचे प्रतिष्ठान आढळून आले नसल्याचा आरोप डॉ. देशमुख यांनी केला आहे. त्यामुळे एवढ्या महत्त्वाच्या आणि जीव वाचविणाऱ्या वैद्यकीय उपकरणांची खरेदी नेमकी कोणत्या प्रक्रियेतून झाली, पुरवठादाराची पात्रता कशी तपासली गेली आणि दर निश्चितीचा आधार काय होता, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. डफरीन रुग्णालयातील नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरच्या स्फोटानंतर झालेल्या अग्निकांडात तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही खरेदी अधिकच चर्चेत आली आहे. अशा संवेदनशील आरोग्य व्यवस्थेत उपकरणांच्या खरेदीत पारदर्शकता आणि दर्जाला सर्वोच्च प्राधान्य असणे अपेक्षित असताना खरेदी प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होणे गंभीर असल्याचे डॉ. देशमुख यांनी म्हटले आहे.

#### ■ 'आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय'

'अमरावतीत कोणीही या, ओरबाडून पैसे खा आणि निघून जा, अशीच अधिकाऱ्यांची मनोवृत्ती झाल्याचे दिसते. आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय, अशी अमरावतीची अवस्था झाली आहे,' असा घणाघाती आरोप डॉ. सुनील देशमुख यांनी केला. यापूर्वी अमरावती महापालिकेतील प्रशासकांच्या काळातील विविध निर्णयांचाही त्यांनी संदर्भ देत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर निशाणा साधला. दरम्यान, चालू आर्थिक वर्षात आयसीयूसाठी विविध महत्त्वाची वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी सुमारे ३.२७ कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आल्याचेही डॉ. देशमुख यांनी सांगितले. पॅरा मॉनिटर, सेंट्रल स्टेशन, पोर्टेबल अल्ट्रासाऊंड आणि डिफिब्रिलेटर यांसारख्या उपकरणांचा यात समावेश आहे. व्हेंटिलेटर खरेदीप्रमाणेच या खरेदीतही दरांमध्ये तफावत आहे का, याची चौकशी आताच करण्याची मागणी त्यांनी केली.

#### ■ पालकमंत्र्यांनी चौकशीचे आदेश द्यावेत

व्हेंटिलेटर खरेदीतील संपूर्ण प्रक्रिया तत्काळ तपासावी, संबंधित पुरवठादाराचे देयक थांबवावे आणि उच्चस्तरीय चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी डॉ. देशमुख यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. आरोग्य उपकरणांच्या खरेदीतील कथित गैरप्रकारांची चौकशी झाली नाही तर भविष्यातही अशाच पद्धतीने जनतेच्या पैशांची उधळपट्टी होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.




#### ■ 'शंभू मेडिकल'ची ओळखही संशयाच्या भोवऱ्यात?

या संपूर्ण खरेदी प्रक्रियेत 'शंभू मेडिकल'ची ओळखच वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. करारनाम्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये वाशिमचा पत्ता नमूद असून प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी संबंधित एजन्सीचे अस्तित्व आढळून न आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या शासकीय वैद्यकीय खरेदीचा पुरवठा करणाऱ्या संस्थेची पात्रता, प्रत्यक्ष व्यवसाय आणि कागदपत्रांची सत्यता तपासली होती का, असा सवाल उपस्थित होत आहे. याशिवाय या खरेदी प्रक्रियेत मेडिकल कॉलेजचे सुपरिटेंडंट (खरेदी) आणि पालकमंत्र्यांशी संबंधित एका कर्मचाऱ्याची भूमिका असल्याची चर्चा असून, संबंधित कर्मचाऱ्याची अमरावतीहून उचलबांगडी करण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. या दाव्याची अधिकृत पातळीवर पुष्टी होणे आवश्यक असून, या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी झाल्यास खरेदी प्रक्रियेतील नेमका 'खेळ' समोर येण्याची शक्यता आहे.

## सराईत गुन्हेगार 'निक्कु'वर एमपीडीएची कारवाई

### अमरावती मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कुख्यात व सराईत गुन्हेगार निखील ऊर्फ निक्कु राजू गायकवाड (वय २४, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती) याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व व्हिडिओ चाचेगिरी करणाऱ्या व्यक्तींच्या विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबतच्या कायद्यांतर्गत (एमपीडीए) स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार ३१ ऑगस्ट रोजी त्याला स्थानबद्ध करून अमरावती मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.



पोलिसांच्या माहितीनुसार, निखील ऊर्फ निक्कु गायकवाड हा २०२३ पासून गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय आहे. त्याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात जबरी चोरी, दरोडा, घरात अतिक्रमण, अपहरण, महिलेस विवाहासाठी सक्ती करण्याच्या उद्देशाने अपहरण किंवा प्रलोभन देणे, गैरकायदेशीर प्रतिबंध, विनयभंग व पाठलाग, मालमत्तेचे नुकसान, जीवे मारण्याची धमकी, गंभीर दुखापत, दरोड्याची तयारी, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान, अश्लील कृत्ये, दुखापत, लैंगिक अत्याचार, बालकांचा लैंगिक छळ, अवैध शस्त्र बाळगणे तसेच तडीपारी आदेशाचे उल्लंघन अशा स्वरूपाचे एकूण १६ गंभीर गुन्हे नोंद असल्याचे पोलिसांनी सांगितले. गायकवाड याच्याविरुद्ध यापूर्वी विविध प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या होत्या. त्याला तडीपारदेखील करण्यात आले होते. मात्र, या कारवायांनंतरही त्याच्या गुन्हेगारी कारवायांमध्ये सुधारणा न झाल्याने अखेर त्याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये ☞(पान २ वर)

## माझ्या वडिलांना न्याय द्या! शुक्लांच्या मुलीचा आक्रोश

### -प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर सवाल

### -११ पानी मृत्यूपूर्व पत्रातील आरोपांची चौकशी व चार वनाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** पुसद सामाजिक वनीकरण विभागातील वनमजूर संघटनेचे अध्यक्ष रमाशंकर शुक्ला यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी न्यायासाठी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. शुक्ला यांच्या मृत्यूपूर्वीच्या ११ पानी पत्रात उल्लेख असलेल्या चार वनाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून निष्पक्ष चौकशी करावी, या मागणीसाठी त्यांची मुलगी पलक पाठक, कुटुंबीय आणि वनमजूर संघटनेचे राज्याध्यक्ष



पंजाब भोकरे यांनी सोमवारी, ३१ ऑगस्ट रोजी यवतमाळात पत्रकार परिषद घेतली.

शुक्ला यांनी मृत्यूपूर्वी पत्रात लिहिलेल्या ओळींचा संदर्भ देताना पलक पाठक यांनी सांगितले.शुक्ला यांच्या आत्महत्येला विभागीय ☞(पान २ वर)


## तडीपार 'डॉन' चाकू घेऊन दहशत माजविताना जेरबंद

### महादेवखोरीत गुन्हे शाखेची धडक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** तडीपार असतानाही शहरात परतून हातात धारदार चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या श्रवण ऊर्फ डॉन राजेश बनारसे (वय १९, रा. महादेवखोरी, अमरावती) याला गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी, १ सप्टेंबर रोजी जेरबंद केले. त्याच्याकडून सुमारे १ हजार २०० रुपये किमतीचा लोखंडी चाकू जप्त करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी शहरात अवैधरीत्या घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली पथक शहरातील विविध भागांत गस्त घालत असताना गुप्त सूत्रांकडून माहिती मिळाली... कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला. गाडगेनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे आणि पोलिस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक १ यशवंत सोळंके यांच्या माध्यमातून ☞(पान २ वर)

## चाकू घेऊन दहशत निर्माण करणारा गजाआड



**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूर बाजार परिसरात चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या एका आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्याच्याकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे. पोलिस १ सप्टेंबर रोजी चांदूर बाजार पोलीस बस स्टँड परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्याच वेळी एक इसम मोटार सायकलवर बसून हातात चाकू घेऊन दहशत निर्माण करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तो येणाऱ्या-जाणाऱ्यांना चाकू दाखवून धमकवत होता. ही बाब लक्षात येताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करीत आरोपीला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक मोठा धारदार चाकू आढळून आला, तो पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल रोशन चव्हाण, घनश्याम जामोद, ज्ञानेश्वर गवई, वैभव आकोटकर, मंगेश साव, राम दंदगाड ☞(पान २ वर)

## रानडुकरावर झाडली गोळी, शेतकरी गंभीर

### -दोन शिकारी पोलिसांच्या जाळ्यात

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** रानडुकराच्या शिकारीसाठी बंदुकीतून झाडलेली गोळी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यासाठी जीवघेणी ठरता ठरता बचावल्याची घटना चिंचोली काळे शिवारात घडली.

गोळीतील छरे जमिनीवर आदळून उडाल्याने ते शेतकऱ्याच्या मांडीला लागले. या प्रकरणाचा छडा लावत चांदूर बाजार पोलिसांनी तिवसा तालुक्यातील दोन शिकाऱ्यांना जेरबंद केले आहे.

चरणसिंग अजितसिंग बावरी (४०) व मुन्नासिंग रामसिंग बावरी (६२, दोघे रा. आनंदवाडी, ता. तिवसा) अशी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. प्रशांत गोवर्धन मोहोड (४५, रा. चिंचोली काळे) हे शेतात काम करीत असताना हा प्रकार घडला. मोहोड यांच्या शेत परिसरात दोन अनोळखी व्यक्ती संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. काही वेळातच शिकारीसाठी छऱ्याच्या बंदुकीतून गोळी झाडण्यात आली. ही गोळी जमिनीवर आदळल्यानंतर छरे उडून मोहोड यांच्या मांडीला लागले आणि ते जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच चांदूर बाजार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे फिरविली. गुप्त माहितीच्या आधारे संशयित शिकारी तिवसा तालुक्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी☞(पान २ वर)

## शेख कासीम हत्याकांडात आणखी ४ आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा येथील शिवाजी चौक देशी दारूच्या दुकानात झालेल्या वादातून गुलिस्ता नगर येथील शेख कासीम याच्या हत्येप्रकरणी बडनेरा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात आणखी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून, आता अटकेतील आरोपींची एकूण संख्या ५ झाली आहे.अन्सार खान रोशन खान (वय ४०, रा. लकडगंज, बडनेरा),इरफान खान रोशन खान (वय३५), मोहम्मद जिया मोहम्मद सलीम (वय२२),अब्दुल अरबाज अब्दुल अतीक (वय २२, रा. कुरेशी नगर, बडनेरा),फराज खान युनूस खान (वय २५) अशी अटक आरोपींची नावे आहे.या हत्याकांडाचे सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहे. माहितीनुसार रविवार, ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ८ वाजता, बडनेरा शहरातील नवी वस्ती भागातील शिवाजी चौक येथे राहुल प्रकाश श्रृंगारे यांच्या देशी दारूच्या दुकानात ही घटना घडली.तक्रारदार शहजेब मियाँ यांना मृतक शेख



कासीम याने फोन करून सांगितले की, तो बडनेरामध्ये आपल्या मावशीकडे आला आहे. त्यानंतर तक्रारदार राजकमल चौकात पोहोचला असता, गंभीर जखमी शोएब शाह उर्फ गुड्डू सरदार शाह याचा फोन आला. त्याने सांगितले की, आठवडी बाजार परिसरातील देशी दारूच्या दुकानात त्याचे भांडण झाले असून तिथे येण्यास सांगितले.त्यानंतर तक्रारदार, मृतक शेख कासीम आणि शेख अरबाज असे चौघे जण शोएब शाह उर्फ गुड्डू याला सोबत घेऊन दारूच्या दुकानाकडे रवाना झाले. सायंकाळी ८ वाजता ते दुकानात पोहोचले असता वाद वाढला. शोएब शाह उर्फ गुड्डू आणि मृतक शेख कासीम यांनी तिथे पडलेल्या काचेच्या बाटल्या फोडल्या.हे पाहून दुकानाच्या काउंटरवर असलेल्या ☞(पान २ वर)

## ग्रामपंचायत युनियनचे जिल्हा परिषदेवर धरणे आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी आज मंगळवार १ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, शिरवे-पारोळा घटनेच्या दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. त्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या समाज कंटकांवर हत्येचा गुन्हा दाखल करून अटक करावी आणि हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा. महाराष्ट्र ग्रामपंचायत



अधिनियमात सुधारणा करून वारंवार होणाऱ्या ग्रामसभेच्या बदल्यात वर्षातून एकदाच आर्थिक नियोजन व आढावा सभा घेण्यात यावी,☞(पान २ वर)

## सहकारी शेतकी खरेदी विक्री समितीची वार्षिक आमसभा उत्साहात




**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती नांदगाव खंडेश्वर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण आमसभा संस्थेचे अध्यक्ष परीक्षित ढेकेकर यांचे अध्यक्षतेखाली ३१ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडली. संस्थेचे वयोवृद्ध ☞(पान २ वर)

## म्हशींना वाचवण्याच्या प्रयत्नात ट्रक पलटीं

### -चक्रधर पेट्रोल पंपाजवळ अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय महामार्गावर चक्रधर पेट्रोल पंपाजवळ मंगळवारी मोठा अपघात टळला.अचानक आलेल्या म्हशीला वाचवण्याच्या प्रयत्नात एक भरधाव ट्रक अनियंत्रित होऊन हायवेवर पलटी झाला. या ☞(पान २



## लोंबकळणा-या फायबर केबलमुळे अपघात, महिला जखमी

### राजकमल उडाणपुलावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात इंटरनेट आणि केबल टीव्ही सेवेसाठी टाकण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबलच्या बेशिस्त जाळ्यामुळे आता नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.उडान पुलावर अनेक ठिकाणी केबल लोंबकळतांना दिसत आहे. याच लोंबकणाऱ्या फायबर केबलमुळे सोमवारी सायंकाळी राजकमल उड्डाण पुलावर मोठी दुर्घटना झाली. यात एक महिला जखमी झाली आहे. माहिती नुसार सोमवारी सायंकाळी राजकमल उड्डाण पुलावर राजापेठ कडून



इरविनच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर इलेक्ट्रिक पोलवरून लटकणारी फायबर केबल रेलिंगच्या बाहेर येऊन थेट रस्त्यावर आली होती. याच मार्गावरून एमएच ☞(पान २ वर)